मे २०१८/पाने ६०/किंमत ₹१०

# लोकराज्य




## ४ वर्षे भारताच्या नवनिर्माणाची
## सर्वांची साथ : सर्वांचा विकास



# श्रीमहाराष्ट्र देशा

मंगल देशा! पवित्र देशा! महाराष्ट्र देशा!
प्रणाम घ्यावा माझा हा, श्रीमहाराष्ट्र देशा ।।ध्रु.।।
राकट देशा, कणखर देशा, दगडांच्या देशा।
नाजुक देशा, कोमल देशा, फुलांच्याहि देशा।।

अंजनकांचनकरवंदीच्या कांटेरी देशा।
बकुलफुलांच्या, प्राजक्तीच्या दळदारी देशा।।

भावभक्तिच्या देशा, आणिक बुद्धीच्या देशा।
शाहीरांच्या देशा, कर्त्या मर्दांच्या देशा।
ध्येय जे तुझ्या अंतरी, निशाणावरी नाचते करी।।
जोडी इहपरलोकांसी व्यवहारा परमार्थासी
वैभवासी वैराग्यासी।।

जरिपटक्यासह भगव्या झेंड्याच्या एकचि देशा।।
प्रणाम घ्यावा माझा हा, श्रीमहाराष्ट्र देशा ।।१।।

– गोविंदाग्रज



महाराष्ट्र दिन आणि कामगार दिनाच्या हार्दिक शुभेच्छा..

# अंतरंग




लोकसभा निवडणुकीमध्ये ३० वर्षांनी स्पष्ट बहुमत मिळवून नरेंद्र मोदी यांच्या नेतृत्वात केंद्रातील नव्या सरकारचा शपथविधी झाला. त्या ऐतिहासिक क्षणाला येत्या २६ मे रोजी ४ वर्षे पूर्ण होत आहेत. ही ४ वर्षे देशाला ४० वर्षे पुढे नेणारी ठरली आहेत. देशाच्या इतिहासावर ‘नमोमुद्रा’ उमटवणाऱ्या कार्यकर्तृत्वाने एक नव्या भारताची निर्मिती होत आहे.

**महामार्गांचा कायापालट १०**



देशाच्या कुठल्याही कानाकोपऱ्यात गेले तरी नवीन रस्त्यांचे जाळे पसरलेले दिसते. संयुक्त पुरोगामी आघाडी सरकारच्या काळात देशात दररोज ७-८ किमी. महामार्ग बांधले जायचे. केंद्रीय भूपृष्ठ वाहतूक मंत्रालयाची या कामातील गती तीनपट अधिक आहे.


**उच्च शिक्षणाची ‘स्वयम’ सिद्धता १४**

शालेय व उच्च शिक्षणाचे नियमन मनुष्यबळ विकास मंत्रालयातर्फे केले जाते. मोफत शालेय शिक्षणापासून कुणीही वंचित राहू नये. तसेच विद्यार्थ्यांना उच्चशिक्षणाच्या असंख्य संधी सहज उपलब्ध व्हाव्यात यासाठी या विभागामार्फत विविध नावीन्यपूर्ण उपक्रम राबवले जात आहेत. ‘स्वयम’, मध्यान्न भोजन योजना, ‘दीक्षा’, स्वच्छ विद्यालय अभियान आदींच्या माध्यमातून शिक्षण घेण्याची प्रक्रिया सोपी केली जात आहे.



**थिंक ग्लोबली – ॲक्ट लोकली! १८**

देशाचे आयात निर्यात धोरण व जागतिक व्यापारउदीम हे मुख्य कार्यक्षेत्र असलेले वाणिज्य व व्यापार मंत्रालय हे अर्थव्यवस्थेच्या साखळीतील महत्त्वाचे मंत्रालय. या मंत्रालयाचा कार्यभार स्वीकारल्यावर वाणिज्यमंत्री सुरेश प्रभू यांनी त्यांच्या कार्यपद्धतीनुसार वेगाने चक्रे फिरवली.



**गतिमान, आधुनिक आणि सुरक्षित २०**



राष्ट्राच्या विकासाला योगदान देण्यासाठी भारतीय रेल्वेची सुरक्षा, गती आणि ग्राहकांना सेवा देण्यासाठी केंद्र शासन वचनबद्ध आहे. प्रधानमंत्री नरेंद्र मोदी यांच्या ‘नवा भारत’ या उपक्रमात भारतीय रेल्वे महत्त्वाची भूमिका बजावत आहे. भारतीय रेल्वेच्या परिवर्तनासाठी महत्त्वाची पावले उचलण्यात आली आहेत.


| | |
|---|---|
| नव्या भारताची ‘नमोमुद्रा’ | ५ |
| महामार्गांचा कायापालट | १० |
| उच्च शिक्षणाची ‘स्वयम’सिद्धता | १४ |
| थिंक ग्लोबली – ॲक्ट लोकली! | १८ |
| गतिमान, आधुनिक आणि सुरक्षित | २० |
| उद्योगांचे सक्षमीकरण | २४ |
| सामाजिक न्याय आणि समन्वय | २६ |
| मेक इन इंडियातून संरक्षण सामग्री | २८ |
| महामानवाचे राष्ट्रीय स्मारक... | ३० |
| विकासाची नवी चाहूल | ३२ |
| महिला शक्ती, राष्ट्रशक्ती | ३४ |
| उंचावलेली प्रतिमा | ३६ |
| महिला व बालहक्कांचे संरक्षण | ३८ |
| आपले सरकार, आपले ॲप्स | ४२ |
| योजना : परिवर्तन घडवणाऱ्या | ४४ |
| डिजिटल भारतात महाराष्ट्राची आघाडी | ४८ |
| विधायक निर्धार | ५३ |
| राहण्याची चिंता मिटली... | ५४ |
| एकलव्यांची इंग्रजी | ५५ |
| सर्वसमावेशक ‘सहभाग’ | ५६ |
| येथे कर माझे जुळती... | ५८ |

वर्ष ६९ वे | अंक ११ | मे २०१८

माहिती व जनसंपर्क महासंचालनालय,
महाराष्ट्र शासन

लोकराज्य

- मुख्य संपादक — ब्रिजेश सिंह
- संपादक मंडळ — अजय अंबेकर, शिवाजी मानकर
- संपादक — सुरेश वांदिले
- उपसंपादक — गजानन पाटील, राजाराम देवकर
- प्रशासन अधिकारी — मीनल जोगळेकर
- वितरण अधिकारी — मंगेश वरकड
- वितरण सहायक — अश्विनी पुजारी
- साहाय्य — स्वप्नाली जाधव, भारती वाघ
- मुखपृष्ठ — सीमा रनाळकर, धनश्री पाठारे
- मांडणी, सजावट — शैलेश कदम
- मुद्रितशोधन — उमा नाबर
- मुद्रण — प्री मीडिया सर्व्हिसेस प्रा. लि. महापे, नवी मुंबई.

माहिती व जनसंपर्क महासंचालनालय,
नवीन प्रशासन भवन, १७वा मजला,
मंत्रालयासमोर, हुतात्मा राजगुरू चौक,
मुंबई-४०० ०३२.
Email : lokrajya.dgipr@maharashtra.gov.in

वर्गणीदार व तक्रार निवारण: ०२२ - २२८१८३१२
Email : lokvitaran.dgipr@maharashtra.gov.in

ई - लोकराज्य http://dgipr.maharashtra.gov.in

या अंकात प्रकाशित लेखातील मतांशी
शासन सहमतच असेल असे नाही.

## संपादकीय

# स्मार्ट, संवेदनशील आणि पारदर्शक

केंद्रातील राष्ट्रीय लोकशाही आघाडीच्या सरकारला या महिन्यात चार वर्षे पूर्ण होत आहेत. गेल्या चार वर्षात प्रधानमंत्री नरेंद्र मोदी यांनी नवभारताच्या निर्माणासाठी जे अथक प्रयत्न केले, त्याची दृश्यफळे आता दिसू लागली आहेत. प्रत्येक जागतिक व्यासपीठावर भारताची नाममुद्रा ठसवण्यात प्रधानमंत्र्यांना यश प्राप्त झाले आहे.

गेल्या चार वर्षात भारतीय जनमानसाला नवा आत्मविश्वास, नवे आत्मभान प्राप्त झाले आहे. आधुनिक डिजिटल युगाला सुसंगत अशी विविध धोरणे, निर्णय आणि योजना राबवण्यात येत आहेत. संबंध देशामध्ये डिजिटल कनेक्टिव्हिटी वाढवण्यासाठी प्राधान्याने लक्ष पुरवण्यात आल्याने; प्रशासन अधिक स्मार्ट, संवेदनशील आणि पारदर्शक होण्यास साहाय्य झाले आहे. डिजिटल ट्रान्सफॉर्मेशन (रूपांतरण) होण्याच्या दिशेने या चार वर्षात भारताने उत्तुंग झेप घेतली आहे. याचा निश्चितच परिणाम नागरिकांचे जीवनमान अधिक दर्जेदार, गुणवत्तापूर्ण होण्यावर झाला आहे. विज्ञान, तंत्रज्ञान, उद्योग या क्षेत्रांवर भर देण्यात आल्याने रोजगार-स्वयंरोजगाराच्या विविध संधी निर्माण होत आहेत. कौशल्य विकास कार्यक्रमाला गती देण्यात आल्याने तरुण-तरुणींची प्रगती व विकासाची नवी द्वारे उघडी झाली आहेत. मेक इन इंडिया, स्टार्ट अप आणि स्टॅण्ड अप इंडिया, जनधन योजना, मुद्रा योजनांमुळे देशातील उद्योजकतेला वाव मिळत आहे. स्पर्धात्मता वाढीस लागून उत्कृष्ट दर्जाची व निर्यातक्षम उत्पादने भारतात तयार होऊ लागली आहेत. संरक्षण क्षेत्रासाठी आवश्यक असणारी शस्त्रास्त्रे, उपकरणे आदींच्या निर्मिततही 'मेक इन इंडिया'ची संकल्पना अंतर्भूत करण्यात आली आहे. त्यानुसार महाराष्ट्रासह अनेक राज्यात शस्त्रनिर्मितीचे उद्योग उभारण्याचे नियोजन करण्यात आले आहे.




यंदाच्या अर्थसंकल्पात कृषी क्षेत्रावर सर्वाधिक भर देण्यात आल्याने या क्षेत्रातील विकास दर वाढण्यास मदत होईल, शिवाय शेतकऱ्यांना मोठा दिलासा मिळेल.

या सरकारने नावीन्यपूर्णतेवर (इनोव्हेशन) लक्ष केंद्रित केले आहे. त्यामुळे वेगळ्या धाटणीची विकास कामे हाती घेतली जात आहेत. विविध क्षेत्रात कल्पक, सर्जनशील आणि नव्या विचाराने प्रेरित व्यक्तींना स्वयंप्रगतीच्या संधी मिळण्यासोबतच, त्यांना देश विकासातही स्वत:चा वाटा उचलता येत आहे. गेल्या चार वर्षात केंद्र सरकारकडून महाराष्ट्राला अनेक क्षेत्रात मोठी मदत झाली आहे. महाराष्ट्रातील पहिल्या रेल्वे कोच निर्मिती कारखान्याचे भूमिपूजन नुकतेच लातूर येथे झाले. यामुळे लातूर व मराठवाड्याच्या औद्योगिक विकासाला चालना मिळेल. या कालावधीत महाराष्ट्राला नवे महामार्ग मिळाले, मुंबई पोर्ट ट्रस्टच्या विकासाला गती मिळाली. जलसंधारणाची कामे सुरू झाली. मुंबईच्या विविध पायाभूत सुविधांना निधी प्राप्त झाला. ही कामे गतीने सुरू झाली. महाराष्ट्र हे देशाचे विकास इंजिन आहे. देशाने प्रगती व समृद्धीच्या दिशेने उंच झेप घेतली असताना, त्या गतीस आणखी बळ देण्याचे कार्य महाराष्ट्र करत आहे. लोकराज्यच्या या अंकात आम्ही केंद्र शासनाने आणि विशेषत: महाराष्ट्रातील मंत्रिमहोदयांनी जी कामगिरी बजावली, त्याचा विस्तृत लेखाजोखा घेतला आहे. हा अंक आपणास आवडेल, अशी खात्री आहे.

आमचे वाचक, लेखक, वर्गणीदार व वितरक या सर्वांना महाराष्ट्र दिन आणि कामगार दिनाच्या हार्दिक शुभेच्छा..

**ब्रिजेश सिंह**
**(मुख्य संपादक)**



# नव्या भारताची 'नमोमुद्रा'

**लोकसभा निवडणुकांमध्ये तब्बल ३० वर्षांनी स्पष्ट बहुमत मिळवून नरेंद्र मोदी यांच्या नेतृत्वात केंद्रातील नव्या सरकारचा शपथविधी झाला, त्या ऐतिहासिक क्षणाला येत्या २६ मे रोजी ४ वर्षे पूर्ण होत आहेत. एखाद्या देशाच्या उभारणीत ४ वर्षे हा तसा अगदी अल्प कालावधी, पण मोदीजींच्या झंझावाती, कल्पक, राष्ट्रवादी, विकासाभिमुख नेतृत्वात ही ४ वर्षे देशाला ४० वर्षे पुढे नेणारी ठरली आहेत. देशाच्या इतिहासावर 'नमोमुद्रा' उमटवणाऱ्या कार्यकर्तृत्वाने एका नव्या भारताची निर्मिती होत आहे.**

लोकांच्या अनेक आशाआकांक्षा-अपेक्षा घेऊन नरेंद्र मोदी यांच्या नेतृत्वात केंद्र सरकारने गेल्या ४ वर्षांच्या कालावधीत समाजातील सर्वच घटकांच्या हिताचे अनेक निर्णय घेतले, योजना आणल्या. राष्ट्रीय चारित्र्य निर्माण करून एक सशक्त शक्ती म्हणून भारताची नवी ओळख जगाला करून दिली. स्वतंत्र भारताच्या इतिहासात कधीही घेतले नव्हते असे ऐतिहासिक निर्णय घेऊन अमलात आणले. या सरकारच्या अशा महत्त्वपूर्ण कामगिरीची नोंद सर्व जगाने घेतली आहे. अंतर्गत व बाह्य देशांकडून सुरक्षितता, राजनैतिक-आर्थिक स्थैर्य, शेती व उद्योगांना प्रोत्साहन, शिक्षण व आरोग्य सुधार, आधुनिक तंत्रज्ञानाच्या आधारे जीवनमान उंचावणे, महिलांना माणूस म्हणून जगण्याची समान संधी, समाजातील शेवटच्या वंचित घटकापर्यंत फायदे पोहोचवणे, देश म्हणून शेजारी राष्ट्रांना आपला भक्कम आधार वाटेल असा शेजारधर्म निर्माण करणे, जागतिक बलाढ्य राष्ट्रांना आपली दाखल घेण्यास भाग पडावे अशी कामगिरी करणे इ. बहुविध पैलूंनी गेली चार वर्षे भारताचा आसमंत उजळून निघाला आहे.

पाकिस्तान-म्यानमारमधील सर्जिकल स्ट्राईक असो, की संपूर्ण देशात एकच कररचना आणणारा वस्तू व सेवा कर असो, तिहेरी तलाक रद्द कारण्याचा निर्णय असो... प्रत्येक धाडसी निर्णय राष्ट्रनिर्माणाची प्रबळ राजकीय इच्छाशक्ती दर्शवणारा आहे.



## अभिनव योजना

प्रधानमंत्री जनधन योजना (PMJDY), सुकन्या समृद्धी योजना (SSY), प्रधानमंत्री फसल बिमा योजना, प्रधानमंत्री ग्राम/कृषी सिंचाई योजना, प्रधानमंत्री गरीब कल्याण योजना, स्टार्टअप इंडिया, मृद स्वास्थ योजना, प्रधानमंत्री मुद्रा योजना, ई-नाम तथा मंडी योजना, बेटी बचाओ बेटी पढाओ, राष्ट्रीय डिजिटल साक्षरता अभियान, मेक इन इंडिया, स्वच्छ भारत अभियान, प्रधानमंत्री उज्ज्वला योजना, नमामि गंगे प्रकल्प, सेतू भारतम प्रकल्प, प्रधानमंत्री जीवन ज्योती योजना, प्रधानमंत्री सुरक्षा बिमा योजना, प्रधानमंत्री आवास योजना (ग्रामीण/शहरी), अटल पेन्शन योजना, सांसद आदर्श ग्राम योजना, उडाण, राष्ट्रीय कौशल्य विकास योजना, पंडित दीनदयाळ उपाध्याय ग्रामीण कौशल्य विकास योजना, दीनदयाळ उपाध्याय अंत्योदय योजना, स्मार्ट सिटी योजना, एलईडी संवितरण उजाला योजना, राष्ट्रीय आयुष मिशन, मिशन इंद्रधनुष्य अशा अनेक महत्त्वाच्या योजना, अभियान, उपक्रमांची अंमलबजावणी देशातील प्रत्येक घटकाला न्याय देण्याच्या उद्देशाने प्रभावीपणे सुरू आहे. श्री. मोदींचे परराष्ट्र धोरण, आर्थिक धोरण आणि कृषी धोरण हे स्वातंत्र्योत्तर काळातील सर्वात धाडसी व नवभारताच्या निर्मितीसाठी उपयुक्त ठरणारे आहेत.

## आर्थिक विकासाचे इंजिन

जानेवारी २०१८च्या दुसऱ्या आठवड्यात स्वित्झर्लंडमधील दावोस शहरात दरवर्षीप्रमाणे जागतिक आर्थिक शिखर परिषदेच्या बैठकीसाठी

जगभरातील व्यवसाय, राजकारण, कला, शिक्षण आणि इतर क्षेत्रातील जवळपास २५०० प्रभावशाली निमंत्रितांत ७० पेक्षा अधिक देशांच्या अध्यक्षांची आणि प्रधानमंत्र्यांची उपस्थिती होती. भारताच्या दृष्टीने महत्त्वाची बाब म्हणजे तब्बल दोन दशकानंतर, जगातील या सर्वाधिक महत्त्वाच्या वार्षिक परिषदेत भारताचे प्रधानमंत्री उपस्थित राहून संबोधित करणार होते. जगातील सर्वात मोठी लोकशाही आणि सातवी सर्वात प्रबळ अर्थव्यवस्था असलेल्या भारताचे प्रधानमंत्री काय भूमिका मांडतात, याकडे देशी-विदेशी उद्योजक आणि गुंतवणूकदारांचे लक्ष लागले होते.

दावोस परिषदेच्या आठवडाभर आधी प्रधानमंत्र्यांच्या नेतृत्वात केंद्र सरकारने अनेक क्षेत्रात परकीय गुंतवणुकीस उत्तेजनाचा निर्णय घेतला असल्याने दावोसमध्ये भारताविषयी अनुकूल वातावरणनिर्मिती झाली होती. आपल्या अतिशय स्फूर्तिदायक भाषणातून प्रधानमंत्र्यांनी गुंतवणूकयोग्य भूमी म्हणून भारताचे उत्तम मार्केटिंग करत उद्योगांच्या बाबतीत 'रेड टेप'कडून 'रेड कार्पेट'कडे भारताचे गेल्या चार वर्षांच्या काळात जे यशस्वी स्थित्यंतर झाले, त्याचे प्रभावी चित्र उभे केले. सध्या जगासमोर असलेल्या तापमानवाढ, दहशतवाद आणि संकुचिततावाद या तीन आव्हानांचा उल्लेख करत त्यावर मात करण्यासाठी प्राचीन भारतीय ज्ञानापासून ते आधुनिक सायबर सिक्युरिटीपर्यंत उपाययोजना भारताकडून कशाप्रकारे केल्या जात आहेत, याचे सविस्तर विवेचन केले. 'संपूर्ण जगाच्या आर्थिक विकासाचे इंजिन होण्याची क्षमता भारतामध्ये आहे. भारताच्या विकासात सर्वांनी सहभागी व्हावे आणि भारत सर्वांच्या विकासात योगदान देईल, हा त्यांच्या भाषणाचा मुख्य गाभा होता. धनसंपदेसोबतच आरोग्यदायी व परिपूर्ण आयुष्य जगणे, तसेच शांततेसाठी भारतात या,' असे आवाहन त्यांनी जगभरातील बड्या कंपन्यांच्या सीईओंना केले. या भाषणाचे राजकीय नेते, उद्योजक यांनी भरभरून स्वागत केले. भारताच्या प्रधानमंत्र्यांच्या भूमिकेकडे, एका जागतिक महत्त्वाच्या नेत्याची भूमिका म्हणून मान्यता मिळताना बघणे फारच सुखावह होते. प्रधानमंत्र्यांनी त्यांच्या भाषणातून मांडलेल्या उद्योजकांसाठी स्वागतोत्सुक देश या भूमिकेचे सकारात्मक फलित म्हणजे उद्योजकांनी देशात आणि मुख्यत्वेकरून महाराष्ट्रात गुंतवणुकीसाठी मोठ्या प्रमाणात रस घेणे, हे होय. महाराष्ट्रासाठी विशेष आनंदाची बाब म्हणजे मुंबईत जागतिक आर्थिक परिषदेचे केंद्र विकसित करण्यास मान्यता मिळाली. विविध तज्ज्ञांचा सहभाग असलेल्या परिषदेच्या मुंबईतील या नव्या केंद्रातून, ज्ञानाचे आदानप्रदान करण्याबरोबरच विज्ञान-तंत्रज्ञानाधारित धोरणांची अंमलबजावणी करणे अधिक सुकर होईल. या केंद्राच्या माध्यमातून रोबोटिक्स, आर्टिफिशियल इंटेलिजन्स, शेतीसाठी ड्रोनसारख्या तंत्राच्या वापरावर भर देण्यात येणार आहे. याचा लाभ महाराष्ट्रसह संपूर्ण देशाला होणार आहे.



**'नव भारताच्या विकासगाथेत प्रत्येक राज्य आपापले योगदान देत आहे. मला खात्री आहे की, मा. प्रधानमंत्र्यांचे ५ ट्रिलियन डॉलर अर्थव्यवस्थेचे स्वप्न साकार करण्यात महाराष्ट्राचा सर्वात मोठा आणि मोलाचा वाटा असेल.'**

**- देवेंद्र फडणवीस, मुख्यमंत्री**

### विकासदराची झेप

देशाच्या आर्थिक आघाडीवर आणखी दिलासादायक बाब म्हणजे जागतिक बँकेने अलीकडेच घोषित केलेल्या आकडेवारीनुसार चालू आर्थिक वर्षात (२०१८-१९) भारताचा विकास दर ७.३ टक्के राहण्याचा अंदाज व्यक्त केला आहे. आर्थिक वर्ष २०१९-२० आणि २०२०-२१ मध्ये अर्थव्यवस्थेतील विकासाचा दर हा अनुक्रमे ७.४ व ७.५ टक्क्यांपर्यंत पोहोचू शकतो, असेही अहवालात म्हटले आहे. अर्थव्यवस्थेतील सुधारणांमुळे दक्षिण आशियाई क्षेत्रात भारताने,

### गुंतवणूकस्नेही धोरणरचना

दावोसमध्ये भारताची गुंतवणूकस्नेही अशी जी प्रतिमा निर्माण झाली. तिचा इच्छित लाभ फेब्रुवारी महिन्यात मुंबईत आयोजित केलेल्या मॅग्नेटिक महाराष्ट्र परिषदेत प्रत्ययाला आला. महाराष्ट्राच्या आर्थिक स्थितीवर देशाच्या आर्थिक आलेखाची उंची अवलंबून असते. तेव्हा ती वाढावी यासाठी महाराष्ट्र सरकारने वस्त्रोद्योग, अवकाश व संरक्षण साधन उत्पादने, हातमाग, लघू आणि मध्यम उद्योग, वित्तसेवा, वित्तव्यवस्थापन तंत्रज्ञान, विजेवर चालणाऱ्या मोटारी आदी अनेक क्षेत्रांसाठी नवीन धोरणे या परिषदेपूर्वी जाहीर केली होती. ही धोरणरचना महाराष्ट्राबरोबरच देशासाठीदेखील तितकीच महत्त्वाची आणि निकडीची आहे कारण देशाची आर्थिक राजधानी महाराष्ट्रात असल्याने अशा धोरण पुढाकाराचे नैसर्गिक नेतृत्व महाराष्ट्राने करायला हवे याची जाणीव सरकारला आहे.



प्रधानमंत्र्यांच्या उद्योग तसेच आर्थिक कार्यक्रम पत्रिकेत महाराष्ट्राला मानाचे स्थान आहे, हे 'मेक इन इंडिया' सप्ताहाच्या वेळीही प्रकर्षाने जाणवले होते. यंदाच्या मॅग्नेटिक महाराष्ट्र परिषदेच्या उद्घाटन प्रसंगी केलेल्या भाषणात, छत्रपती शिवाजी महाराजांच्या या महाराष्ट्र भूमीतील अर्थव्यवस्था वन ट्रिलियन डॉलर करण्याचे उद्दिष्ट महाराष्ट्र सरकार नक्की गाठेल, असा विश्वास व्यक्त करून महाराष्ट्राने उत्तम पद्धतीने राबवलेल्या 'ईझ ऑफ डुईंग बिझनेस' या धोरणामुळे; गेल्या वर्षी देशात आलेल्या एकूण परकीय गुंतवणुकीपैकी ५१ टक्के गुंतवणूक महाराष्ट्रात आली, याचीही नोंद प्रधानमंत्र्यांनी घेतली.

जगातील सर्वांत वेगाने वाढण्याचा दर्जा पुन्हा एकदा मिळवला आहे. भारतीय उपखंडातच नव्हे तर संपूर्ण दक्षिण आशियात एक शक्तीशाली अर्थव्यवस्था म्हणून भारताचा दबदबा प्रस्थापित होण्यासाठी प्रधानमंत्र्यांनी नियोजनबद्ध पद्धतीने उचललेली पावले, साहाय्यभूत ठरली आहेत. आर्थिक विषयांचा अभ्यास करून त्यावर प्रधानमंत्र्यांना सल्ला देण्यासाठी गेल्या वर्षी सप्टेंबर महिन्यात नीती आयोगाचे सदस्य डॉ. विवेक देबरॉय यांच्या अध्यक्षपदाखाली; अर्थ क्षेत्रातील दिग्गजांचा समावेश असलेली पाच सदस्यीय आर्थिक सल्लागार परिषदेची स्थापना केली होती. प्रधानमंत्री नरेंद्र मोदी यांनी याच वर्षी जानेवारी महिन्यात देशातील ४० पेक्षा जास्त अर्थतज्ज्ञ आणि इतर क्षेत्रातील तज्ज्ञांशी त्यांनी भविष्यातील आर्थिक धोरण या विषयावर संवाद साधला. या संवादात सहभागी झालेल्या तज्ज्ञांनी सूक्ष्म-अर्थव्यवस्था, कृषी आणि ग्रामीण विकास, रोजगार, आरोग्य आणि शिक्षण, उत्पादन आणि निर्यात, शहरी विकास, पायाभूत सुविधा आदी अर्थव्यवस्थेच्या विविध पैलूंबद्दल दृष्टिकोन मांडला, सूचना केल्या. देशाचा अर्थसंकल्प तयार करण्यापूर्वी अशा प्रकारे विविध क्षेत्रांतील तज्ज्ञांचे मत विचारण्याचा प्रधानमंत्र्यांनी पाडलेला हा पायंडा स्तुत्य असाच आहे.

## तेजस्वी परराष्ट्र धोरण

प्रधानमंत्री नरेंद्र मोदींनी परराष्ट्र धोरणाला सर्वोच्च प्राधान्य देऊन परराष्ट्र धोरणाच्या अंमलबजावणीसाठी आणि त्यातील उद्दिष्टांची पूर्तता होण्यासाठी अथक परिश्रम केल्याचे गेल्या चार वर्षात दिसून आले आहे. त्यांचे परराष्ट्र धोरण प्रामुख्याने पुढील तीन उद्दिष्टांवर आधारित असल्याचे दिसते.



- **समृद्धी:** परराष्ट्र धोरणाच्या मदतीने देशाची समृद्धी म्हणजेच सर्वांगीण आर्थिक विकास साधणे.
- **स्वाभिमान:** आंतरराष्ट्रीय राजकारणातील भारताची पत वृद्धिंगत करत असतानाच जगभरात एक उदयमान महासत्ता म्हणून भारताची मान उंचावताना स्वाभिमान कायम राहील, यासाठी प्रयत्न करणे. त्याचबरोबर जागतिक स्तरावर आसपास घडणाऱ्या घटनांना आपल्या हितसंबंधाच्या अनुषंगाने कसे वेगळे वळण देता येऊ शकेल, याबाबत प्रयत्न करणे. या घटनांना प्रभावित करण्यासाठी प्रयत्न करणे.
- **सुरक्षितता:** परराष्ट्र धोरणाच्या माध्यमातून देशाची अंतर्गत आणि बाह्य दोन्ही सुरक्षा मजबूत बनवणे.

वरील उद्दिष्टांच्या आधारे त्यांनी परराष्ट्र धोरणात एक स्वयंस्पष्टता आणली. गेली अनेक वर्षे पाकिस्तान व चीन केंद्रित परराष्ट्र धोरणामुळे भारताचे शेजारी राष्ट्रांकडे दुर्लक्ष झाले होते. या पार्श्वभूमीवर श्री. मोदींनी सर्वात प्रथम शेजारी देशांना महत्त्व दिले. प्रधानमंत्रिपदाची शपथ घेताना सार्क समूहातील सर्व राष्ट्रप्रमुखांना शपथग्रहण सोहळ्यासाठी निमंत्रित करून एक वेगळा पायंडा पाडून आपले परराष्ट्र धोरण कसे असणार याची चुणूक त्यांनी दाखवून दिली होती. प्रधानमंत्रिपदाची धुरा सांभाळल्यानंतर मोदींनी पहिला परदेश दौरा भूतानचा केला. शेजारी देशांना महत्त्व देत मैत्री जपण्यासाठी त्यांनी छोट्या देशांपासून सुरुवात केली. यानंतर नेपाळ व श्रीलंकेला भेट देऊन शेजारसंबंध वाढवण्यावर भर दिला. नेपाळमध्ये १७ वर्षांत, श्रीलंका, फिलिपाईन्समध्ये २७ वर्षांत, कॅनडात ४२ वर्षांत तर युएईमध्ये ३४ वर्षांत भारताच्या प्रधानमंत्र्यांचा दौरा झाला नव्हता. महत्त्वाचे म्हणजे आजपर्यंत भारत ज्या देशांपर्यंत पोहोचला नव्हता अशा देशांपर्यंत प्रधानमंत्री पोहोचले. 'रिचिंग अनरिच्ड' असे हे धोरण आहे. भारतीय हितसंबंधांचा विचार करून अनेक देशांशी द्विपक्षीय संबंध प्रस्थापित केले. पाकिस्तानशी पुन्हा चर्चा व्हावी यासाठी त्यांनी पुढाकार घेतला. संवादाचे हे एक सकारात्मक पाऊल टाकून, त्यांनी आपली विदेश नीती कशी सुसंवादी व समन्वयवादी राहणार आहे, याची नांदी दिली. २०१७ मध्ये डोकलाम वाद निवळल्यानंतर भारतासोबतचे राजनैतिक संबंध पुन्हा सुधारण्याची आता चीनची इच्छा दिसत आहे. पाकच्या भारतविरोधी कारवाया जगाच्या लक्षात आणून देण्यात भारताला यश आले आहे. संयुक्त राष्ट्रात, आंतरराष्ट्रीय न्यायालयात पाकला तोंडघशी पाडण्यात मोदींजींनी महत्त्वाची भूमिका बजावली. पाकिस्तानचा दहशतवादी चेहरा जगाच्या लक्षात आणून दिला.

## इमर्जिंग पॉवर

मोदीजींनी परराष्ट्र धोरणातील प्रादेशिक अस्मिता बाजूला सारल्या. देशाची उद्दिष्टे डोळ्यांसमोर ठेवून ठोस पावले उचलली. मुख्यत्वेकरून आर्थिक हितसंबंधांच्या रक्षणाच्या दृष्टीने परराष्ट्र व्यवहार पाहण्यास सुरुवात केली. याच काळात जगातील महासत्तांबरोबर असलेले भारताचे संबंध सुधारले. मोदींजींनी अमेरिकेबरोबरचे संबंध घनिष्ठ करून, त्या माध्यमातून दोन्ही देशांमधील बरेच प्रश्न सोडवण्याचा आणि या संबंधांना नवा आयाम देण्याचा प्रयत्न केला. त्याचेच फलित म्हणून नागरी अणुकरार पूर्ण झाला. त्याशिवाय आण्विक पुरवठादारांच्या गटामध्ये सदस्यत्व मिळावे म्हणून अमेरिकेने भारताला पाठिंबा दिला. त्याचबरोबर एमटीसीआर (क्षेपणास्त्र तंत्रज्ञान नियंत्रण कायदा) चे सदस्यत्वही भारताला अमेरिकेच्या पाठिंब्यामुळे मिळाले. इतर ५० क्षेत्रांमध्ये अमेरिकेबरोबर सहकार्यासाठी प्रयत्न सुरू झाले. घनिष्ठ लष्करी संबंधही गेल्या चार वर्षांमध्ये प्रस्थापित झाले. अमेरिकेचे अध्यक्ष डोनाल्ड ट्रम्प यांनी डिसेंबरमध्ये जाहीर केलेल्या राष्ट्रीय सुरक्षा धोरणात प्रामुख्याने आशिया खंडात भारताला इमर्जिंग पॉवर म्हणजे



उदयमान सत्ता म्हणून मान्यता दिली.

अमेरिका, जपान, ऑस्ट्रेलिया हे देश भारताबरोबर एकत्र येऊन आशिया-प्रशांत क्षेत्रात संयुक्त रणनीती तयार करणार आहेत. अमेरिकेसोबत संबंध दृढ करताना भारताचा पारंपरिक मित्र असणाऱ्या रशियाबरोबर संबंध स्थिर करण्याचे प्रयत्न केले. भारत आणि युरोपियन महासंघादरम्यान १४ वी वार्षिक शिखर परिषद ऑक्टोबर २०१७ मध्ये नवी दिल्लीत आयोजित करण्यात आली. भारत-युरोपियन महासंघ धोरणात्मक भागीदारींतर्गत व्यापक सहकार्याचा नेत्यांनी आढावा घेतला. भारत आणि युरोपियन महासंघ हे नैसर्गिक भागीदार आहेत. हे लक्षात घेऊन नेत्यांनी लोकशाही, स्वातंत्र्य, कायद्याचे नियम आणि मानवाधिकारांबद्दल आदर आणि राज्यांच्या प्रादेशिक एकात्मता या समान मूल्ये आणि तत्त्वांवर आधारित भारत-युरोपियन महासंघ धोरणात्मक भागीदारी अधिक वृद्धिंगत आणि बळकट करण्याची वचनबद्धता पुन्हा व्यक्त केली.

गेल्या चार वर्षात जपानच्या प्रधानमंत्र्यांनी तीन वेळा भारताला भेट दिली. जपानसोबतचा अणुकरार पूर्णत्वास गेला. ही मोठी उपलब्धी आहे. परराष्ट्र धोरणातून स्वतःच्या राष्ट्राचे हित जोपासतानाच मानवतावादी दृष्टिकोनाची कास मोदीजींनी सोडली नाही. येमेनमधून पाच-सहा हजार भारतीयांना सुखरूप परत आणले. त्याचबरोबर इतर देशांच्या नागरिकांसाठी केलेले प्रयत्न जगभरात कौतुकास्पद ठरले. सिरियात अडकलेल्या भारतीय परिचारिकांची यशस्वी मुक्तता केली. म्यानमारमध्ये रोहिंग्यांची समस्या निर्माण झाली. तेव्हा बांग्लादेशमध्ये आश्रयासाठी आलेल्या रोहिंग्यांसाठी भारताने अन्नपुरवठा केला.

## जागवला आत्मविश्वास

मोदीजींनी देशांतर्गत उद्दिष्टे सध्या करण्यासाठी पराराष्ट्र धोरणांचा सुयोग्य वापर करून घेतला. भारत एक महासत्ता बनू शकतो, असा आत्मविश्वास त्यांनी भारतीयांमध्ये निर्माण केला. आपल्या परदेश दौऱ्यांमधून त्यांनी बदलत्या समर्थ भारताची प्रतिमा जगात ठसवली. यामुळे अनिवासी भारतीयांचा, त्यांच्या देशात प्रभाव वाढला असून आता अनेक देशात भारतीय समाज राजकीयदृष्ट्याही महत्त्वाचा ठरू लागला आहे. परदेशात जाऊ इच्छिणाऱ्या भारतीयांच्या सोयी-सुविधांचाही विचार केला जात आहे. आधी देशात २६ पासपोर्ट कार्यालये होती, आता ती ९०च्या आसपास असून २०१९ पर्यंत ती २०० पर्यंत जातील. पासपोर्ट बनवण्याची प्रक्रिया वेगवान झाली असून अनेकांना ४८ तासांत पासपोर्ट घरपोच मिळत आहेत.

मोदीजींनी परराष्ट्र धोरणामध्ये गतिमानता व विविधता आणली, निश्चितता आणि ठामपणा आणला, पूर्वी अर्धवट राहिलेले काही करार पूर्णत्वास नेले. सर्वांत महत्त्वाचे म्हणजे भारतामध्ये भव्य, उच्च स्वप्ने पाहण्याची महत्त्वाकांक्षा निर्माण केली. 'उदासीन सत्ताकेंद्र' अशी ओळख पुसून 'उत्सुक महाशक्ती' अशी नवी ओळख निर्माण केली. भारताने आता नेतृत्व केले पाहिजे, या जाणिवेतून परराष्ट्र धोरणाची व्याप्ती वाढवत एक नवी उंची मोदीजींच्या नेतृत्वाने परराष्ट्र धोरणाला गाठून दिली आहे.

## कृषी क्षेत्रात नवे युग

आपला देश कृषीप्रधान असल्याने ग्रामीण अर्थव्यवस्था शेती व शेतीपूरक उद्योगांवर अवलंबून असते. देशातील बहुतांश शेती मौसमी पावसावर अवलंबून असून, पावसाच्या लहरीपणाचा फटका शेतीला वारंवार बसत असतो. गेल्या काही वर्षात नैसर्गिक आपत्ती आणि कर्जाच्या विळख्यात सापडल्यामुळे बळीराजा अत्यंत हालात दिवस काढत होता. मोदीजींनी महात्मा गांधींच्या स्वप्नातील भारत निर्माण करण्यासाठी कटिबद्ध असल्याने, शेतकऱ्यांना दिलासा देण्याचा प्रयत्न केंद्र सरकारने सुरुवातीपासूनच केला आहे. महाराष्ट्रातील






संकटात सापडलेल्या शेतकऱ्यांसाठी छत्रपती शिवाजी महाराज सन्मान योजना लागू करण्यात केंद्राच्या आर्थिक पाठबळाचा मोठा हातभार आहे.

गेल्या चार वर्षात केंद्र सरकारने सातत्याने कृषी क्षेत्राकडे लक्ष दिले असून चांगले निर्णय घेतले आहेत. त्यातील काही महत्त्वाचे निर्णय म्हणजे सर्वप्रथम केंद्र सरकारने सिंचनावर व्यापक भर देऊन त्यासाठी अर्थसंकल्पात भरीव तरतूद केली. 'पर ड्रॉप मोअर क्रॉप' हे उद्दिष्ट ठेवले. त्यानंतर दर्जेदार बियाणे उपलब्ध करून देण्यावर आणि पोषक घटकांच्या वापराच्या क्षमतेवर भर दिला. मृदा आरोग्य पत्रिकेची तरतूद केल्यामुळे प्रत्येक शेतजमिनीच्या गरजेनुसार त्यामध्ये मिसळणे आवश्यक असलेल्या घटकांची अचूक निवड करता येणे शक्य झाले. यामुळे उत्पादनाचा खर्च कमी होऊन एकूण उत्पन्नात वाढ झाली. गोदामांच्या पायाभूत सुविधा आणि शीतगृहांची साखळी यामध्ये मोठ्या प्रमाणावर गुंतवणूक तसेच कृषीविषयक पायाभूत सुविधांसाठी वाढीव तरतूद केली. अन्न प्रक्रियेच्या माध्यमातून मूल्यवर्धनाला प्रोत्साहन दिले, राष्ट्रीय कृषी बाजारपेठ निर्माण केली. देशभरातील ५८५ नियंत्रित घाऊक बाजारपेठांमध्ये सामाईक इलेक्ट्रॉनिक प्लॅटफॉर्म तयार केला. शेतमालाच्या अंतिम विक्रीकिमतीचा सर्वाधिक वाटा दलालांकडे न जाता, शेतकऱ्याला मिळाला पाहिजे, या उद्देशाने देशी खाद्य उत्पादनांच्या पणन व्यवस्थेमध्ये थेट परकीय गुंतवणुकीची संकल्पना सादर केली. सर्वसमावेशक, देशव्यापी अशी प्रधानमंत्री पीक विमा योजना सुरू केली.



### शेतकऱ्यांना संरक्षण

शेतकऱ्यांना आपत्तींपासून अतिशय कमी मोबदल्याच्या बदल्यात संरक्षण मिळणार आहे. वाईट हवामानाच्या काळात त्यांच्या उत्पन्नाचे रक्षण होईल, याची हमी त्यांना मिळणार आहे. पूरक उद्योगांच्या माध्यमातून उत्पन्न वाढवणार आहे. कुक्कुटपालन, मधमाशी पालन, शेततळी आणि मत्स्यपालन या पूरक उद्योगांच्या माध्यमातून उत्पन्न वाढवण्याचे प्रयत्न करण्यात येत आहेत.या सर्वांच्या एकत्रीकरणातून, शेतकऱ्यांचे उत्पन्न दुप्पट करण्याचे लक्ष्य निर्धारित करण्यात आले आहे.

यंदा कृषी केंद्रित अर्थसंकल्प सादर करून केंद्र सरकारने बळीराजाला मोठा दिलासा दिला आहे. कृषी, ग्रामीण आणि कृषी पूरक व्यवसायासाठी १,८१,२२३ कोटी रुपयांची तरतूद करण्यात आली आहे. मागील वर्षाच्या तुलनेत या निधीत २४% वाढ करण्यात आली आहे. शेतकऱ्यांची स्थिती मजबूत करण्याच्या आणि त्यांचे उत्पन्न वाढवण्याच्या दिशेने या अर्थसंकल्पात अनेक उपाययोजना सुचवण्यात आल्या आहेत. अन्नधान्य आणि फलोत्पादनात वाढ करण्यावर सरकार भर देणार असून उत्पादन खर्चापेक्षा दीड पट जास्त हमीभाव देण्याची घोषणा 'ई–नाम'ने करण्यात आली आहे. ५८५ बाजार समित्यांपैकी आतापर्यंत ४७० बाजार समित्या जोडण्यात आल्या आहेत. उर्वरित मार्च २०१८ पर्यंत जोडल्या जातील. अल्प उत्पादक शेतकऱ्यांचा 'ई–नाम'मध्ये समावेश करण्यासाठी २२ हजार छोट्या बाजार समित्यांची निर्मिती करण्यात येईल. मोठ्या आणि छोट्या बाजार समित्यांचे उन्नतीकरण, अन्नप्रक्रिया उद्योग, नाशवंत भाजीपाल्यांची साठवणूक, शीतगृहांची निर्मीती– यासाठीच्या ऑपरेशन ग्रीनसाठी, मत्स्यपालन, शेतीतील पायाभूत सुविधा आणि पशुपालन, बांबू मिशन या योजनांसाठी मोठी तरतूद करण्यात आली आहे. शेतमालाच्या निर्यातीला प्रोत्साहन देण्यासाठी ४२ फूड पार्क तयार करण्यात येणार आहेत. २०२२ सालापर्यंत शेतकऱ्यांचे उत्पन्न दुप्पट करण्याचे उद्दिष्ट निश्चित करण्यात आले आहे. शिवाय अल्प उत्पादक शेतकऱ्यांसाठी शेती क्षेत्रात आणि त्याव्यतिरिक्त रोजगार उपलब्ध करून देण्यावर भर देण्यात येणार आहे.

शेतीला सर्वोच्च प्राधान्य देणारा अर्थसंकल्प मोदीजींनी सादर केल्याबद्दल हरितक्रांतीचे जनक डॉ. एम. एस. स्वामिनाथन यांनी प्रधानमंत्र्यांचे आभार मानले आहेत. शेतीमधील उत्पन्नावर लक्ष केंद्रित करण्याच्या निर्णयाचे त्यांनी स्वागत केले असून, 'शेती क्षेत्राचा कायापालट घडवण्यासाठी आणि या क्षेत्राकडे तरुणांना आकर्षित करण्यासाठी आणि त्यामध्ये त्यांना टिकवून ठेवण्याची बीजे अर्थसंकल्पातून रोवण्यात आली आहेत. सुधारित बियाणे, आरोग्य कार्ड, सुधारित विमा, शेतकऱ्यांचे पुनर्वसन, सिंचन क्षेत्रातील वाढ या सगळ्या धोरणांबाबत केंद्र सरकार सकारात्मक आहे, ही बाब निश्चितच चांगली आहे. कृषी विद्यापीठे आणि खासगी क्षेत्रांनी ग्रामीण विकासासाठी ५० टक्के योगदान दिले आहे. ही बाबही प्रशंसा करण्यासारखीच आहे, असेही स्वामिनाथन यांनी म्हटले. कृषी क्षेत्रातील एका नव्या युगाची पहाट दृष्टिक्षेपात आहे,' अशा शब्दात त्यांनी केंद्र सरकारचे कौतुक केले आहे. डॉ. एम. एस. स्वामिनाथन यांच्यासारख्या जगद्विख्यात कृषी शास्त्रज्ञांकडून कौतुक केले जाणे, म्हणजे देशाचे कृषी धोरण योग्य दिशेने जात असल्याचे निदर्शक आहे. प्रातिनिधिक स्वरूपात राष्ट्र उभारणीसाठी दीर्घकाळ परिणामकारक ठरणाऱ्या वरील तीन धोरणांबद्दल जरी इथे लिहिले असले तरी प्रारंभ नमूद केल्याप्रमाणे नव्या भारताची पायाभरणी करणारी श्री. मोदी यांच्या नेतृत्वाखालील सरकारची अनेक धोरणे, योजना आणि निर्णय आहेत. देशाचे जबाबदार नागरिक म्हणून नव्या भारताच्या उभारणीचे आव्हान स्वीकारून, त्यासाठी आपला वाटा आपण मनापासून उचलू या!

**– मीनल जोगळेकर**
वरिष्ठ सहायक संचालक (प्रकाशने)





**प्रधानमंत्री नरेंद्र मोदी यांच्या मंत्रिमंडळातील महत्त्वाचे मंत्री म्हणून केंद्रीय भूपृष्ठ वाहतूक व जलसंपदा मंत्री नितीन गडकरी यांच्याकडे बघितले जाते. स्वातंत्र्यानंतर कधीही नव्हती इतकी गती त्यांच्या विभागाने घेतली आहे. गेल्या चार वर्षात भूपृष्ठ वाहतूक मंत्री म्हणून त्यांनी केलेली कामे लक्षवेधी ठरली आहेत. देशाच्या कुठल्याही कानाकोपऱ्यांत गेले तरी नवीन रस्त्यांचे जाळे पसरलेले दिसते. संयुक्त पुरोगामी आघाडी सरकारच्या काळात देशात दररोज ७–८ किमी. महामार्ग बांधले जायचे. भूपृष्ठ वाहतूक मंत्रालयाची या कामातील गती तीनपट अधिक आहे.**


# महामार्गांचा कायापालट

**विकास झाडे**

केंद्रीय भूपृष्ठ वाहतूक व जलसंपदा मंत्री नितीन गडकरी हे दूरदृष्टी असलेले नेते आहेत. भारत जगात महासत्ता करायचा असेल तर देशातील प्रत्येक क्षेत्रातील लोक मुख्य प्रवाहात यायला पाहिजेत. यासाठी भारतातील प्रत्येक गाव हे चांगल्या रस्त्यांनी जोडणे गरजेचे असल्याचे गडकरी सांगतात. शेतकऱ्यांना त्यांचे धान्य, फळे आणि भाज्याही कमी वेळात बाजारपेठेत आणता यायला पाहिजेत ही त्यांची तळमळ. तंत्रज्ञानामुळे जगात काय चालते ते आपल्याला मोबाइलवरून क्षणात कळते, मग अशा प्रकारची गती आणि क्रांती महामार्गावर, पाण्यावर चालणाऱ्या परिवहनाच्या माध्यमातून होण्यासाठी त्यांची धडपड सुरू आहे. जलद, सुखद आणि सुरक्षित प्रवास हे त्यांचे व्रत आहे. गेल्या चार वर्षातील वेगवान रस्तेबांधणीमुळे देशातील महानगरांमध्ये पोहोचण्याचा वेळ कमी झाला. प्रदूषण कमी करण्यासाठी त्यांनी देशात हरित वाहने आणली. नागपूर, दिल्लीत त्याचे त्यांनी प्रयोग केलेत. पेट्रोल–डिझेलच्या चढ्या भावाला त्यांनी अशा प्रकारे पर्याय सुचवला आहे. केवळ गंगाच नव्हेतर देशातील प्रत्येक नदी स्वच्छ व्हावी यासाठी गडकरींचे प्रयत्न आहेत. त्यांनी याची सुरुवात गंगेपासून केली आहे. गडकरी म्हणजे विकास पुरुष रालोआ सरकारमध्ये त्यांनी छोडलेली छाप प्रत्येक मराठी व्यक्तीला आणि अखंड महाराष्ट्राला अभिमानास्पद वाटणारी आहे. आज कोणत्याही पक्षाचा खासदार किंवा आमदार त्यांच्याकडे गेला तरी तो रिकाम्या हाताने परतत नाही. दोन–चार रस्ते मंजूर करूनच मतदार संघात जातो. त्यामुळे प्रत्येक लोकप्रतिनिधीस गडकरींबाबत आस्था वाटते. त्यांच्याबद्दल आदर व्यक्त केला जातो. गडकरी आज देशाचे मंत्री असले तरी त्यांनी महाराष्ट्राला भरभरून दिले.



**नितीन गडकरी**
केंद्रीय भूपृष्ठ, वाहतूक व जलसंपदा मंत्री



महाराष्ट्राचा कायापालट केला.

### महाराष्ट्रातील रस्ते विकासाची आघाडी

भूपृष्ठ वाहतूक मंत्रालयाच्यावतीने महाराष्ट्रात २६ हजार ८४१ कोटींची १०७ कामे सुरू असून या माध्यमातून ३ हजार ३२० किमी. चे राष्ट्रीय महामार्ग बांधण्यात येत आहेत, देशात महाराष्ट्र यात आघाडीवर आहे. देशभरात ४ लाख ३२ हजार ५३८ कोटी खर्चाची महामार्गांची कामे सुरू आहेत. तसेच दिल्ली–मुंबईदरम्यान हरित महामार्ग उभारण्याची घोषणा मंत्रालयाने केली असून याच्या कामाला १ महिन्यात सुरुवात होत आहे. ६ राज्यांतून जाणाऱ्या या महामार्गाद्वारे मागास भागाचा विकास होणार असून, उभय महानगरांमधील अंतर १३५ किमी. ने कमी होणार आहे. या महामार्गामुळे देशाच्या अर्थव्यवस्थेला गती मिळणार असून हा महामार्ग देशाला नवी दिशा देणारा ठरणार आहे.

### असा असणार हा महामार्ग!

दिल्ली व मुंबईदरम्यान हरित महामार्ग बांधण्यात येत आहे. या महामार्गामुळे सहा राज्यांच्या मागास भागांचा विकास होईल, येत्या महिनाभरात या कामास सुरुवात करण्यात येत आहे. देशाची राजधानी असणाऱ्या दिल्ली व आर्थिक राजधानी मुंबई दरम्यान हरित महामार्ग उभारण्याचा निर्णय ऐतिहासिक व देशाला नवी दिशा देणारा असेल.

गडकरी याबाबत म्हणाले, 'या महामागार्मुळे उभय शहरातील अंतर १३० किमी. ने कमी होणार असून इंधन व वेळेची बचत होणार आहे. दिल्ली, हरयाणा, राजस्थान, मध्यप्रदेश, गुजरात आणि महाराष्ट्र या राज्यांतील मागास भागातून हा महामार्ग जाणार आहे. या भागातील पायाभूत प्रश्न सुटतील. या महामार्गाच्या जमीन अधिग्रहणासाठी सरासरी ७ कोटी रुपये प्रति हेक्टर खर्च येणार असून या दरामुळे केंद्र शासनास १६ ते २० हजार कोटींची बचत होणार आहे.'

### निविदा तयार : महिन्याभरात कामास सुरुवात

प्रस्तावित दिल्ली–मुंबई हरित महामार्गावरील वडोदरा ते मुंबई दरम्यानचा रस्ता हा ५ पॅकेज मध्ये बांधण्यात येणार असून या संदर्भातील निविदा प्रक्रिया पूर्ण करण्यात आल्या आहेत. तसेच, या कामासाठी ४४ हजार कोटींचा खर्च येणार आहे.

सध्या अस्तित्वात असलेल्या दिल्ली–मुंबई महामार्गालगतच नवीन हरित महामार्ग सुरू होत आहे. पुढे हा महामार्ग हरयाणा मधून राजस्थानात जाईल. येथे जयपूर रिंगरोड पासून अलवर आणि सवाई माधोपूर मार्गे मध्यप्रदेश व गुजरात मध्ये वडोदरा असा प्रवेश करत ठाणेमार्गे मुंबईपर्यंत हा महामार्ग जाणार आहे.

## मुंबई पोर्ट ट्रस्ट : आंतरराष्ट्रीय दर्जाचे क्रूज व जहाज दुरुस्ती केंद्र



देशाची आर्थिक राजधानी म्हणून डौलाने उभे असलेले मुंबई शहर परदेशी पर्यटकांना आकर्षित करते. या क्षेत्रात आणखी वृद्धी होण्यासाठी जहाज बांधणी मंत्रालय विशेष उपक्रम राबवत आहे. त्याचाच भाग म्हणून मुंबई पोर्ट ट्रस्ट येथे अत्याधुनिक क्रूज सुविधा विकसित करण्याच्या दिशेने पावले उचलण्यात आली आहेत. येथील विद्यमान क्रूज टर्मिनलचा पर्यटकांना आकर्षित करण्याच्या दृष्टीने विकास करण्यात येत आहे डिसेंबर २०१९ पर्यंत ३०० कोटी रुपये खर्चून हे काम पूर्ण होणार असून देशाच्या अर्थव्यवस्थेला याचा मोठा फायदा होणार आहे, व मुंबईत जागतिक दर्जाचे क्रूज उपलब्ध होणार आहेत.

मुंबई पोर्ट ट्रस्ट आणि कोचिन शिपयार्ड यांच्यामध्ये ११ जानेवारी २०१८ रोजी झालेल्या सामंजस्य करारानुसार मुंबई पोर्ट ट्रस्टच्या इंदिरा डॉक परिसरात व्यावसायिक जहाज दुरुस्ती केंद्र उभारण्यात येणार आहे. यामुळे रोजगाराच्या विविध संधी निर्माण होणार असून, पर्यायाने अर्थव्यवस्थेला गती प्राप्त होणार आहे.


दिल्ली–मुंबई हरित महामागार्मुळे सध्या या शहरांमध्ये असलेले अंतर १३० किमी.ने कमी होणार आहे. त्यामुळे, वेळेची व इंधनाची बचत होणार आहे. या महामार्गावर नियंत्रण कक्ष असतील मात्र, कुठल्याही पद्धतीचे चेक पोस्ट आणि दुकाने नसतील. या महामार्गावर चार चाकी वाहने १२५ किमी. प्रतितास वेगाने तर ट्रक ८० ते १०० किमी. प्रति तास वेगाने धावू शकतील. यामुळे व्यापारउदीम वाढण्यास मदत होणार आहे.

महाराष्ट्रातील ३ हजार ८३९ किमी. लांबीच्या राज्य महामार्गाचे रूपांतर राष्ट्रीय महामार्गात करण्याच्या राज्य शासनाच्या प्रस्तावास यापूर्वीच केंद्रीय भूपृष्ठ वाहतूक मंत्रालयाने मंजुरी दिली होती. केंद्र शासनाच्या स्थायी आर्थिक समितीने महाराष्ट्रातील २३५.३९ किमी. लांबीच्या रस्त्यांच्या दुरुस्तीच्या कामांसाठी ३९५४.२८ कोटींच्या निधीला मंजुरी दिली. केंद्र सरकारच्या ‘सेतु भारतम’ या महत्त्वाकांक्षी योजनेंतर्गत महाराष्ट्रातील १२ मार्गांसह पूल बांधण्याचे कार्य सुरू असून यातील बरेच काम झाले आहे.

## नदी जोड प्रकल्पासाठी महाराष्ट्राची सज्ज्ञता

उपलब्ध जलसाठ्यांचा प्रभावी उपयोग करून जलसंकटावर मात करण्यासाठी उपयुक्त ठरणाऱ्या नदी जोड प्रकल्पाचे काम देशात उत्तम प्रकारे सुरू आहे. या दिशेने मध्यप्रदेश व उत्तरप्रदेशदरम्यानचा ‘केन बेटवा प्रकल्प’ व महाराष्ट्र व गुजरातदरम्यानचा ‘पार–तापी –नर्मदा नदी जोड प्रकल्पा’च्या कामात चांगलीच प्रगती झाली आहे. श्री. गडकरी यांनी पुढाकार घेऊन महाराष्ट्र व गुजरातच्या मुख्यमंत्र्यांसोबत यशस्वी चर्चा करून, विविध मुद्दे सोडवले आहेत. लवकर ‘पार–तापी –नर्मदा नदी जोड प्रकल्पा’साठी उभय राज्यांच्या मुख्यमंत्र्यांमध्ये सामंजस्य करारावर स्वाक्षऱ्या होणार आहेत. या प्रकल्पाच्या माध्यमातून राज्यातील जलसिंचनाला चालना मिळणार असून पाणी प्रश्न सुटणार आहे.

## पार–तापी–नर्मदा नदीजोड प्रकल्प




## जेएनपीटी येथे कंटेनर टर्मिनल व परकीय गुंतवणूक प्रकल्प

महाराष्ट्राला मोठा समुद्रकिनारा लाभला आहे. त्यामुळे येथे जहाजबांधणी उद्योगाच्या माध्यमातून मोठी उलाढाल व विकासाला वाव आहे. देशातील समुद्रकिनारे व त्याचा सक्षम उपयोग करून घेण्यासाठी केंद्रशासनाचे जहाजबांधणी मंत्रालय वैविध्यपूर्ण कार्य करत असते. याच कडीत मंत्रालयाच्यावतीने महाराष्ट्रात करण्यात आलेल्या महत्त्वाच्या कामांमध्ये मुंबई येथील जवाहरलाल नेहरू पोर्ट ट्रस्ट येथे उभारण्यात येत असलेले ४.८ एम.टी.ई.यू. क्षमतेचे देशातील सर्वात मोठे कंटेनर टर्मिनल होय. तसेच हा देशातील सर्वात मोठा परकीय गुंतवणूक प्रकल्प ठरला आहे.

दोन टप्प्यात या बंदराचा विकास करण्यात येत असून पहिल्या टप्प्यासाठी ४ हजार ७१९ कोटी खर्च आला तर दुसऱ्या टप्प्यासाठी ३ हजार १९६ कोटी रुपये खर्च येणार आहे. पहिल्या टप्प्याचे काम पूर्ण झाले असून कंटेनर टर्मिनलचा वापरही सुरू झाला आहे. दुसऱ्या टप्प्याचे काम पूर्ण होताच हे देशातील सर्वात मोठे व जगातील १६ व्या क्रमांकाचे मोठे बंदर ठरेल. या दोन्ही टप्प्याच्या कामाच्या माध्यमातून ७ हजार ९१५ कोटींची

परकीय गुंतवणूक होणार असल्याने देशाच्या अर्थव्यवस्थेलाही मोठा हातभार लाभत आहे.

### मुंबईत सर्वसुविधायुक्त जहाज बांधणी प्रशिक्षण केंद्र

जहाज बांधणी क्षेत्रात आधुनिक तंत्रज्ञानाचा प्रभावी उपयोग व उत्तमोत्तम कौशल्याधारित रोजगार निर्मिती करण्याच्या दिशेने महत्त्वाची पावले टाकण्यात आली. त्याचाच एक भाग म्हणून विशाखापट्टणम आणि मुंबई येथे उभारण्यात येत असलेली सेंटर ऑफ एक्सलन्स इन मेरीटाइम ॲण्ड शिपबिल्डिंग (सीईएमएस) होय. या माध्यमातून जहाजाचे डिझाइन, निर्मिती, देखभाल, दुरुस्ती यासाठी स्थानिकांना विशेष कौशल्य पुरवणारे सक्षम केंद्र तयार करण्यात येत आहे. जहाज बांधणी क्षेत्रातील गरजा व त्या पूर्ण करण्यासाठी उत्तमोत्तम तंत्रज्ञान व कौशल्याधारित मनुष्यबळाचा उपयोग करून, तयार होणाऱ्या या केंद्रात श्रीलंका, बांगलादेश, थायलंड, मलेशिया आणि इंडोनेशिया आदी दक्षिण आशियातील देशांचे विद्यार्थी प्रशिक्षण घेतील अशी योजना आहे. वर्षाकाठी देश व परदेशातील १० हजार ५१२ विद्यार्थी या केंद्रातून प्रशिक्षण घेतील व या माध्यमातून जहाजबांधणी क्षेत्रात आर्थिक स्रोतही निर्माण होणार आहे.

केंद्रीय जलसंपदा मंत्रालयाच्यावतीने राज्यातील महत्त्वाच्या कामांवर एक दृष्टिक्षेप :-

### राष्ट्रीय जल कार्यक्रमात महाराष्ट्र

राष्ट्रीय जल कार्यक्रमाच्या माध्यमातून देशातील जलसिंचन प्रकल्पांची क्षमता वृद्धी करण्याचे कार्य हाती घेण्यात आले आहे. या कार्यक्रमांतर्गत वर्ष २०१६-१७ मध्ये २१ तर वर्ष २०१७-१८ मध्ये ५ पायाभूत अभ्यास करण्यात आले आहेत. या कार्यक्रमांतर्गत आसाम, मणीपूर, तेलंगणा, आंध्रप्रदेश, केरळ यांच्यासह महाराष्ट्रातील मोठे व मध्यम सिंचन प्रकल्प विकसित करण्यात येत आहेत.

### अटल भूजल योजना

केंद्रीय जलसंपदा मंत्रालयाच्यावतीने स्थानिक जनतेच्या सहभागातून प्रभावी भूजल व्यवस्थापनाची अटल भूजल योजना तयार करण्यात आली आहे. यामध्ये महाराष्ट्रातील ग्रामपंचायती व ब्लॉकची निवड या योजनेसाठी करण्यात आली आहे.

२०१८-१९ ते २०२२-२३ या कालावधीत ही योजना राबवण्यात येणार असून, यासाठी ६ हजार कोटींचा खर्च येणार आहे. यापैकी ३ हजार कोटी जागतिक बँक तर उर्वरित ३ हजार कोटी केंद्र शासन उपलब्ध करून देणार आहे. महाराष्ट्रासह हरयाणा, कर्नाटक, राजस्थान, उत्तरप्रदेश आणि मध्यप्रदेशातील ७८ जिल्ह्यांतील १९३ ब्लॉक व ८ हजार ३५३ ग्रामपंचायतींमध्ये ही योजना राबवण्यात येणार आहे.

### दुष्काळग्रस्त जिल्ह्यांसाठी विशेष पॅकेज

मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस आणि प्रधानमंत्री कार्यालयाचे प्रधानसचिव नृपेंद्र मिश्रा यांच्या दरम्यान १४ नोव्हेंबर २०१७ रोजी झालेल्या बैठकीत महाराष्ट्रातील शेतकरी आत्महत्याग्रस्त व दुष्काळी जिल्ह्यांच्या विकासासाठी विशेष पॅकेज देण्यास मंजुरी मिळाली आहे. यानुसार अशा जिल्ह्यांच्या विविध विकास कामांसाठी केंद्र व राज्य शासन २५:७५ या तत्त्वानुसार निधी उपलब्ध करून देणार आहेत. या कार्यक्रमांतर्गत जलसिंचन प्रकल्प विकासाबाबत महत्त्वाचे निर्णय घेण्यात आले. यात दुष्काळी जिल्ह्यांतील ८३ लहान जलसिंचन प्रकल्प निवडण्यात आले आहेत. केंद्रीय जलसंपदा मंत्रालय या कामासाठी वर्ष २०१९-२० साठी १०७६.५५ कोटी रुपयांचे अर्थसाहाय्य देत आहे. याशिवाय अन्य ६ प्रकल्पांसाठी १९५९.०७ कोटींचे अर्थसाहाय्य मंत्रालयाने मंजूर केले आहे. तसेच सुलवाडे-जामफळ सिंचन प्रकल्पासाठी केंद्रीय जलसंपदा मंत्रालयाने ५३०.९७ कोटी रुपये मंजूर केले आहेत.

**(लेखक हे दै. लोकमत, नवी दिल्ली येथे ब्युरोचीफ आहेत.)**
**संपर्क: ०९७११११८५९८**

### कृषी सिंचन योजनेतून जलसिंचन विकास

देशातील प्रत्येक शेताला पाणी या उद्देशाने प्रधानमंत्री कृषी सिंचन योजनेची अंमलबजावणी सुरू आहे. या योजनेंतर्गत २०१५-१६ ते २०१९-२० या कालावधित २.५ लाख हेक्टर क्षेत्र सिंचनाखाली आणण्याचे उद्दिष्ट आहे. महाराष्ट्रातील २६ सिंचन प्रकल्पांसह देशातील १२ राज्यांतील एकूण ९६ सिंचन प्रकल्पांचा या योजनेच्या माध्यमातून विकास करण्यात येत आहे. केंद्र शासनाने २०२२ पर्यंत देशातील शेतकऱ्यांचे उत्पन्न दुप्पट करण्याचे ठेवलेले उद्दिष्ट; या कार्यक्रमामुळे पूर्ण होण्यास मदत होईल. या योजनेसाठी ३९४७६.३३ कोटींचा खर्च येत असून केंद्र आणि राज्याचा वाटा ९०:१० असा आहे.



आयुष्याला कलाटणी देणाऱ्या शालेय व उच्च शिक्षणाचे नियमन मनुष्यबळ विकास मंत्रालयातर्फे केले जाते. मोफत शालेय शिक्षणापासून कुणीही वंचित राहू नये तसेच विद्यार्थ्यांना उच्च शिक्षणाच्या असंख्य संधी सहज उपलब्ध व्हाव्यात यासाठी या विभागामार्फत नावीन्यपूर्ण उपक्रम राबवले जात आहेत. 'स्वयम', ई-पाठशाळा, शाळाकोश, स्वयमप्रभा, 'स्वच्छ विद्यालय अभियान', प्रधानमंत्री रिसर्च फेलोशिप आदींच्या माध्यमातून शिक्षण घेण्याची प्रक्रिया सहज केली जात आहे. अशा योजना व उपक्रमांविषयी सांगताहेत केंद्रीय मनुष्यबळ विकास मंत्री

**प्रकाश जावडेकर...**



# उच्च शिक्षणाची 'स्वयम' सिद्धता

प्रधानमंत्री नरेंद्र मोदी यांच्या नेतृत्वाखालील केंद्र सरकारमध्ये केंद्रीय मनुष्यबळ विकास मंत्रालयाचा पदभार स्वीकारल्यानंतर शिक्षण पद्धतीमध्ये बदल घडवून आणण्यासाठी नावीन्यपूर्ण उपक्रम राबवणे आवश्यक असल्याचे लक्षात आले. त्या दृष्टीने नियोजन करण्याचे विभागास निर्देश दिले. यापूर्वी यास सरकारमध्ये पर्यावरण खात्याची जबाबदारी स्वीकारल्यानंतर या खात्याशी संबंधित प्रलंबित प्रकल्पांना मान्यता मिळवून देण्यात यश आले. यामध्ये महाराष्ट्रातील शिवस्मारक, नाव्हा-शेवा पूल, कोस्टल रोड, विदर्भातील सर्व प्रकल्प, मुंबई-गोवा महामार्ग आदी प्रकल्पांचा समावेश आहे. याच वेगाने जात शिक्षण क्षेत्रात नवीन उपक्रम राबवण्यावर मी लक्ष केंद्रित केले आहे.

## गुणवत्तापूर्ण शिक्षणाचा विस्तार

देशभरात या विभागांतर्गत १५.२ लाख (प्राथमिक, माध्यमिक, उच्च माध्यमिक) एवढ्या शाळा असून २६ कोटी एवढी विद्यार्थी संख्या आहे. या सर्वांना गुणवत्तापूर्ण शिक्षणाच्या समान संधी मिळाव्यात हा व्यापक दृष्टिकोन समोर ठेवून प्रयत्न केले जात आहेत. त्यासाठी पूर्व-नर्सरी ते बारावीपर्यंत सर्वसमावेशक योजना राबवण्याचा निर्णय घेण्यात आला आहे. शिक्षणाच्या समान संधी आणि सुयोग्य शिक्षण पद्धतींच्या बाबतीत शाळांचा दर्जा सुधारण्यावर भर देण्यात येणार आहे. या योजनेत सर्व शिक्षा अभियान (प्राथमिक शिक्षणाचे सार्वत्रिकीकरण), राष्ट्रीय माध्यमिक शिक्षा अभियान (माध्यमिक शिक्षणाचे सार्वत्रिकीकरण) आणि सीएसएसटीई (शिक्षक प्रशिक्षणासाठी केंद्र पुरस्कृत योजना) या तीन केंद्र पुरस्कृत योजनांचा

## स्वयम

अनेक होतकरू तरुणांना कौटुंबिक जबाबदाऱ्यांमुळे, वेळेच्या अभावामुळे इच्छा असूनही शिक्षण घेता येत नाही. शिकण्याची इच्छाशक्ती असलेल्यांसाठी 'स्वयम' (स्टडी वेब ऑफ ॲक्टिव्ह यंग इंस्पायरिंग माइंड) हा ऑनलाइन प्लॅटफॉर्म उपलब्ध करून देण्यात आला आहे. ९ जुलै २०१७ रोजी 'मॅसिव्ह ओपन ऑनलाइन कोर्सेस सेवेचे' 'स्वयम' पोर्टलच्या रूपात लोकार्पण करण्यात आले.

FREE ONLINE EDUCATION
swayam
शिक्षित भारत, उन्नत भारत

या पोर्टलच्या माध्यमातून शालेय शिक्षण आणि उच्च शिक्षणासाठी विविध ऑनलाइन अभ्यासक्रम चालवले जात आहेत. आतापर्यंत १२ प्रकारच्या अभ्यासक्रमांसाठी १२,६३१ विद्यार्थ्यांनी नोंदणी केली आहे.

## ई-पाठशाळा

विद्यार्थी आणि शिक्षकांसाठी उत्यंत उपयुक्त ज्ञानाचे भंडार असलेल्या ई-पाठशाला (http://epathshala.nic.in/) या वेब पोर्टल व ॲप्लिकेशनचे लोकार्पण करण्यात आले आहे. यामध्ये सर्व शैक्षणिक ई-पुस्तके आणि इतर महत्त्वपूर्ण ऑडिओ व व्हिडिओ साहित्याचा समावेश आहे. या पोर्टलमध्ये ३,०६२ ऑडिओ आणि व्हिडिओ, ६५० ई-बूक्स आणि ५०४ फ्लिप बूक्सचा समावेश आहे. या पोर्टलला भेट देणाऱ्यांची संख्या २,७१,७४,८५० हून अधिक आहे तर युट्यूबला भेट देणाऱ्यांची संख्या ९९,७७३,३७२ एवढी आहे. तर गुगल प्ले स्टोअरवरून ई-पाठशाळा हे ॲप आपल्या मोबाइलमध्ये समाविष्ट (इन्स्टॉल) करणाऱ्यांची संख्या तब्बल १२,७९,२१३ एवढी आहे. शिक्षण साहित्य सहज उपलब्ध होत असल्याने विद्यार्थी, पालक व शिक्षकांची मोठी सोय झाली आहे.




समावेश आहे. यामुळे शिक्षणातील सुधारणा आणि गुणवत्ता वाढीच्या दृष्टीने आवश्यक निधी आणि खर्चामध्ये लवचिकता आणून यात सुधारणा करण्यास राज्य आणि केंद्रशासित प्रदेशांना साहाय्य होईल.

### प्राथमिक शिक्षणाची हमी

मोफत आणि सक्तीचे शिक्षण (आरटीई) अधिनियम,२००९ नुसार सहा ते चौदा वर्षे वयोगटातील सर्व मुलांना मोफत शिक्षणाची तरतूद करण्यात आली आहे. या कायद्यानुसार शाळेत प्रवेश झालेल्या कोणताही मुलाला त्याचे प्राथमिक शिक्षण पूर्ण होईपर्यंत मागील वर्गात ठेवता येणार नाही किंवा शाळेतून काढून टाकता येणार नाही. त्याचबरोबर या कायद्यांतर्गत प्रत्येक शैक्षणिक वर्षाच्या शेवटी वर्ग १ आणि ८ वी मध्ये नियमित परीक्षेची तरतूद करण्यात आली आहे. या परीक्षेत संबंधित विद्यार्थी अनुत्तीर्ण ठरत असेल तर त्याला निकाल लागल्यापासून दोन महिन्याच्या आत पुन्हा परीक्षेची संधी देणे अनिवार्य आहे.

### मुलींच्या शिक्षणावर भर

मुलींच्या शिक्षणावर या शासनाने भर दिला आहे. कस्तुरबा गांधी बालिका विद्यालय (केजीबीव्ही) योजनेंतर्गत अनुसूचित जाती, अनुसूचित जमाती, इतर मागासवर्गीय आणि अल्पसंख्याक समुदायांतील मुलींसाठी उच्च प्राथमिक स्तरावर निवासी शाळा उभारण्यात येणार आहेत. ही योजना शैक्षणिकदृष्ट्या महिला साक्षरता कमी असलेल्या मागासलेल्या गटांसाठी(ईबीबी) राबवली जात आहे. उच्च प्राथमिक स्तरावर निवासी शाळा स्थापन करून समाजातील प्रतिकूल परिस्थितीतील मुलींना सहशिक्षण घेता यावे, हा या योजनेचा हेतू आहे.

### शिक्षकांच्या प्रशिक्षणावर भर

शिक्षक प्रशिक्षणावर अधिकाधिक लक्ष केंद्रित करण्यात आले आहे. नियमित सेवांतर्गत शिक्षक प्रशिक्षण, नव्याने भरती झालेल्या शिक्षकांसाठी प्रेरणा प्रशिक्षण, इन्फर्मेशन ॲण्ड कम्युनिकेशन टेक्नॉलॉजी (आयसीटी) घटक, सर्वसमावेशक शिक्षण, लिंग संवेदनशीलता आणि किशोरवयीन शिक्षण याबाबत शिक्षकांना प्रशिक्षण दिले जाते. २०१६-१७ या वर्षात सर्व शिक्षा अभियानांतर्गत ११.५६ लाख शिक्षकांना तर राष्ट्रीय माध्यमिक शिक्षा अभियानांतर्गत ३.३५ लाख शिक्षकांना प्रशिक्षित करण्यात आले.

### शिक्षणात डिजिटल क्रांती

**शगुन पोर्टल :** सर्व शिक्षा अभियानाचे संनियंत्रण करण्यासाठी आणि प्राथमिक शिक्षणाचा दर्जा उंचावण्याच्या दृष्टीने केले जाणारे प्रयत्न, नावीन्यपूर्ण छायाचित्रे, व्हिडिओ, अध्ययन, वृत्तपत्रांतील महत्त्वपूर्ण लेख इत्यादी एकाच ठिकाणी उपलब्ध व्हावेत या उद्देशाने

शगुन ( http://www.ssa.nic.in/) हे वेबपोर्टल उपलब्ध करून देण्यात आले आहे.

**शाळाकोश :** शाळांच्या प्रशासकीय कामात तसेच अशैक्षणिक कामांमध्ये शाळा प्रशासनाचा खूप वेळ वाया जातो. त्यांचा हा वाया जाणारा वेळ कमी करण्याच्या दृष्टीने 'शाळाकोश' हे ॲप विकसित करण्यात आले आहे. हे ॲप म्हणजे शाळेच्या माहितीचे भांडार आहे. या ॲपमुळे शाळेवरील प्रशासकीय भार कमी झाला आहे. हजेरी, शाळा आदींबाबत विश्वसनीय माहिती वेळेत उपलब्ध होऊ शकत असल्याने याचा निर्णय प्रक्रिया व शैक्षणिक दर्जा सुधारणेत खूप उपयोग होत आहे.

**जीआयएस मॅपिंग :** वसतीपासून वाजवी अंतरावर प्राथमिक तथा माध्यमिक शाळेत विद्यार्थ्यांचा प्रवेश निश्चित व्हावा यासाठी शाळांचे जीआयएस मॅपिंग करण्यात आले. १५ जानेवारी २०१८ पर्यंत १५,२०१८ मार्चपर्यंत १५,२२,९२५ पैकी १४,३२,२९१ शाळांची

## स्वयमप्रभा (किशोर मंच) डीटीएच-टीव्ही चॅनेल




३२ राष्ट्रीय वाहिन्यांद्वारे शैक्षणिक इ-सामग्री, विविध शैक्षणिक प्रयोगाच्या प्रसारणासाठी स्वयंप्रभा डीटीएच-टीव्ही चॅनेलची निर्मिती करण्यात आली आहे. यामध्यमातून उपयुक्त शैक्षणिक साहित्याचे प्रसारण केले जाते.

**सारांश :** हे वेब पोर्टल शाळा आणि पालकांसाठी खूप उपयुक्त आहे. शाळा व पालकांना स्वत:चा शैक्षणिक आढावा घेता यावा यासाठी 'सीबीएसई'द्वारे ही सुविधा निर्माण करण्यात आली. १९ हजारहून अधिक शाळा 'सीबीएसई'च्या अखत्यारीत येतात. या शाळा प्रशासनाला व पालकांना हे ॲप व वेब पोर्टल खूप उपयोगी पडत आहे. या पोर्टलला ७.५ कोटींहून अधिक ट्रिट्स मिळाल्या असून ३०,००० हून अधिक पालकांनी हे ॲप डाउनलोड केले आहे. ही आकडेवारी या उपक्रमाची यशस्विता सिद्ध करते.

(९ ४.० ९%) ची जीआयएसख्या मॅपिंग करण्यात आली आहे.

**शाळा सिद्धी :** शाळा मूल्यांकन, शाळांचा दर्जा आणि सुधारणांबाबत स्वयंमुल्यांकणासाठी 'शाळा सिद्धी' (National Programme on School Standards and Evaluation) हे व्यापक साधन उपलब्ध करून देण्यात आले आहे. यामार्फत आतापर्यंत ४,५०,००० शाळांनी स्वयंमूल्यांकन केले आहे.

## स्वच्छ विद्यालय अभियान

स्वच्छ विद्यालय अभियान या मोहिमेंतर्गत सर्व सरकारी शाळांतील मुली व मुलांसाठी स्वतंत्र शौचालय बांधण्यात येत आहेत. राज्य व केंद्रशासित प्रदेशांचे सरकार, सार्वजनिक क्षेत्रातील उपक्रम (पीएसयू) आणि खासगी संस्थांच्या माध्यमातून या अभियानाची अंमलबजावणी केली जात आहे. या मोहिमेंतर्गत १५ ऑगस्ट २०१५ पर्यंत एक वर्षाच्या कालावधीत २.६१ लाख सरकारी शाळांमध्ये ४.१७ लाख शौचालयांची निर्मिती करण्यात आली. शाळेतील मुलांमध्ये स्वच्छतेविषयी जनजागृती केली जात आहे. हात धुणे, स्वच्छता आणि स्वच्छतेचे फायदे याबाबत जनजागृती आणि विविध उपक्रम राबवण्यासाठी राज्य सरकार आणि केंद्रशासित प्रदेशांना सूचना देण्यात आल्या आहेत. शाळांमध्ये स्वच्छता कशा प्रकारची असावी याबाबत मानके ठरवून देण्यात आली आहेत. या विभागामार्फत जिल्हा, राज्य व राष्ट्रीय स्तरावर 'स्वच्छ विद्यालय' पुरस्कार सुरू करण्यात आला आहे. देशातील शाळांमध्ये स्वच्छता, स्वच्छ पाण्याची व्यवस्था आदी निकषांच्या आधारे शाळेतील स्वच्छतेची गुणवत्ता ठरवली जाते. देशातील २.६८ लाख शाळांनी जिल्हा आणि राज्य स्तरावर 'स्वच्छ विद्यालय पुरस्कार २०१६-१७'साठी आपला सहभाग नोंदवला. यापैकी चार व पाच तारे मानांकनाच्या (स्टार रेटिंग) स्वरूपाची स्वच्छता असलेल्या १७२ शाळांची राष्ट्रीय पुरस्कारासाठी निवड करण्यात आली. २०१७-१८ च्या पुरस्कारासाठी सरकारी शाळांसोबतच शहरी तसेच ग्रामीण भागातील अनुदानित आणि विनाअनुदानित शाळांचादेखील यात समावेश करण्यात आला आहे. या स्पर्धेसाठी ५.३३ लाख शाळांनी ऑनलाइन नोंदणी केली आहे. यापैकी ४,२२,११६ पात्र शाळांच्या मूल्यमापनाची प्रक्रिया सुरू आहे.

## उच्च शिक्षणाचा विस्तार

देशातील तरुणांना शिक्षणासाठी परदेशी जाण्याची गरज भासू नये, त्यांना येथे उच्च शिक्षणाच्या संधी प्राप्त व्हाव्यात यासाठी विशेष प्रयत्न केले जात आहे. आजघडीला देशात उच्च शिक्षणासाठी ८६४ विद्यापीठे, ४०,००० महाविद्यालये, आयआयटी, एनआयटी, आयआयएसईआर, ३५.७ दशलक्षहून अधिक विद्यार्थिसंख्या असलेल्या ११,७०० इतर शैक्षणिक संस्था, उच्च दर्जाचे दूरस्थ शिक्षण आदी व्यवस्था आहे. त्याचबरोबर उच्च व्यवस्थापनाच्या शिक्षणासाठी सात नवीन आयआयएम, तंत्रज्ञानासाठी सहा नवीन आयआयटी, माहिती तंत्रज्ञानासाठी आठ नवीन आयआयआयटी संस्था, तसेच तंत्रज्ञानासाठी एक एनआयटी, उच्च विज्ञान शिक्षणासाठी दोन नवीन आयआयएसईआर आणि विविध शाखेतील

पदवी शिक्षणासाठी चार नवीन सेंट्रल युनिव्हर्सिटींची निर्मिती करण्यात आली आहे.

## उच्च शिक्षणात डिजिटल तंत्रज्ञानाचा वापर



नॅशनल डिजिटल लायब्ररीची स्थापना करण्यात आली असून, याअंतर्गत १५ दशलक्ष डिजिटल पुस्तके/मासिके उपलब्ध करून देण्यात आली आहेत. ३१ लाखांहून अधिक व्यक्ती (युजर्स) याचा लाभ घेत आहेत. देशातील १२,००० हून अधिक उच्चशिक्षण संस्थांसाठी, विद्यार्थ्यांसाठी हे एक ज्ञानाचे राष्ट्रीय भांडार आहे.



## जागतिक दर्जाचे उच्च शिक्षण

देशात आणखी अशा १० सार्वजनिक आणि १० खासगी विद्यापीठांची निर्मिती केली जाणार आहे ज्यांचा समावेश जागतिक क्रमवारीत सर्वोच्च ५०० मध्ये होईल. या विद्यापीठांना पूर्णपणे शैक्षणिक आणि प्रशासकीय स्वातंत्र्य असेल. अशा सार्वजनिक विद्यापीठांसाठी प्रत्येकी १,००० कोटी रुपयांची तरतूद करण्यात आली आहे. या विद्यापीठांच्या निर्मिती व निवड प्रक्रियेला सुरुवात करण्यात आली आहे. या वर्षात उच्चशिक्षण माफक दरात उपलब्ध करून दिले जाणार असून १५० बहु-सांस्कृतिक संस्थांची स्थापना केली जाणार आहे. त्याचबरोबर विद्यार्थ्यांसाठी सुलभ व्हिसाची व्यवस्था केली जाईल. तसेच ७५% गुणवान विद्यार्थ्यांना आर्थिक मदत केली जाईल.

## दृष्टिक्षेपात

● शिक्षणासाठी समग्र दृष्टिकोन शिक्षण क्षेत्रासाठी पूर्व-प्राथमिक ते बारावी पर्यंतच्या शिक्षणासाठी एकच सर्वसमावेशक योजना. ● सामाजिकदृष्ट्या महत्त्वाच्या असलेल्या संशोधन प्रकल्पांना वित्तपुरवठा करण्यास प्राधान्य. ● 'उच्चतर आविष्कार' योजनेला अधिकतम निधी देणे ● विविध शैक्षणिक संस्थांचे अधिस्वीकृतीसाठी वार्षिक गुणांकन केले जाते. ही प्रक्रिया अधिक सुलभ आणि जलद करण्यात आली आहे. ● मुलींच्या शिक्षणावर भर. शैक्षणिक मागास भागातील प्रतिकूल परिस्थितीतील मुलींच्या शिक्षणासाठी कस्तुरबा गांधी बालिका विद्यालयाचा १२ वी पर्यंत विस्तार. ● उच्च प्राथमिक ते उच्च माध्यमिक स्तरावरील मुलींसाठी स्व-संरक्षणाचे प्रशिक्षण. ● कौशल्य विकासावर भर, माध्यमिक स्तरावर व्यावसायिक शिक्षणाचे बळकटीकरण ● २.६१ लाख सरकारी शाळांमध्ये ४.१७ लाख शौचालयांची निर्मिती.

## संशोधनास प्रोत्साहन देणे

या विभागातर्फे विविध संशोधन कार्यांना, नावीन्यपूर्ण उपक्रमांना बळ दिले जात आहे. विज्ञान आणि तंत्रज्ञानाच्या क्षेत्रात उत्कृष्ट कार्य करणाऱ्यांचा शोध घेऊन त्यांचा राष्ट्र उभारणीसाठी उपयोग करणे, बी.टेक नंतर थेट पीएचडीची संधी उपलब्ध करून देणे, दरवर्षी किमान १,००० जणांना प्रधानमंत्री रिसर्च फेलोशिप देणे असे विविध महत्त्वपूर्ण उपक्रम राबवले जात आहेत. जनसामान्यांच्या समस्यांवर मात करण्याच्या दृष्टीने नावीन्यपूर्ण उपाय व उपक्रमासाठी स्मार्ट इंडिया हॅकेथॉन घेतली गेली. यामध्ये २०१७ मध्ये ४० हजार तर २०१८ मध्ये तब्बल एक लाख उमेदवारांनी भाग घेतला.



# थिंक ग्लोबली - ॲक्ट लोकली!

**मंगेश वैशंपायन**

थिंक ग्लोबली, ॲक्ट लोकली' या उक्तीनुसार वाणिज्य मंत्री सुरेश प्रभू यांनी पावले उचलली आहेत. प्रधानमंत्री नरेंद्र मोदी यांनी 'ईझ ऑफ डुईंग बिझिनेस' ही कल्पना मांडली. या कल्पनेला कागदी प्रक्रियेच्या जंजाळातून सोडवणूक करण्याचा प्रयत्न प्रभू यांच्या काळात वेगाने सुरू झाला. 'जोडोनिया धन उत्तम व्यवहारे' ही ओळ प्रत्यक्षात आणताना जागतिक पातळीवर दबावतंत्रही अमलात आणावे लागते, हे ओळखून प्रभू यांनी चीन वा अमेरिकेसारख्या देशांबरोबर 'धटासी असावे धट', ही उक्ती प्रत्यक्षात आणावीच लागेल हे ओळखले. भारताने त्यानुसार पावले टाकली. त्याचे परिणाम आता दिसू लागले आहेत. नजीकच्या काळात अर्थव्यवस्थेच्या दृष्टीने भारत फाइव्ह ट्रिलियन जीडीपीचा टप्पा गाठणारा देश होईल, यासाठी प्रभू यांनी विशेष कृती गट स्थापन केला आहे. ई कॅमर्स, आयटीच्या पुढचे पाऊल मानले जाणारे आर्टिफिशियल इंटेलिजन्स या क्षेत्रातही भरीव काम सुरू आहे.




## नेतृत्व गुणांची चमक

चीनसारख्या शेजाऱ्यांबरोबर आयात-निर्यातीची परिस्थिती निवळण्याबरोबरच विश्व व्यापार संघटनेत (डब्ल्यूटीओ) अमेरिकेच्या नवनेतृत्वाच्या दादागिरीवर उत्तर म्हणून गेल्या काही महिन्यात भारतानेही आपल्या या क्षेत्रातील नेतृत्व गुणांची चमक दाखवली ती प्रभू यांच्या कल्पकतेमुळे. मुक्त व्यापाराच्या म्हणजेच मल्टिलॅटरिझमच्या क्षेत्रात अमेरिकेच्या ताज्या भूमिकेमुळे अडथळे येत असल्याचे दिसताच भारताने नवी दिल्लीत आंतरदेशीय मंत्री परिषदेचे यशस्वी आयोजन करून दाखवले. या वेळच्या चर्चासत्रात मल्टिलॅटरिझमवर भर देण्याची भारताची भूमिका सर्व देशांनी मान्य केली हे मोठे यश आहे. पुढच्या किमान दोन वर्षातील विश्व व्यापारासाठी ही परिषद दिशादर्शक म्हणावी अशी ठरली आहे. श्री. प्रभूंच्या पुढाकारामुळे चीनबरोबर तीन वर्षांनी मंत्री पातळीवरील पहिली द्विपक्षीय व्यापार बैठक दिल्लीत २६ मार्च २०१८ रोजी झाली. चिनी माल भारतात जास्त येतो असे केवळ तक्रारीच्या सुरात वारंवार सांगून भागणार नाही, तर भारतीय मालाला चीनमध्ये तेवढाच वाव मिळाला पाहिजे व चीनने भारतीय साखरेवरील आयात शुल्क घटवावे, या मागणीच्या प्रतिबद्धतेचा उच्चार प्रथमच अशा बैठकीत झाला. भारताचा तांदूळ, फळे, भाजीपाला, औषधे, मास आदींचे मार्केट चीनला उपलब्ध करण्याबाबत या बैठकीत अतिशय सकारात्मक चर्चा झाली. चीनबरोबरचा प्रतिकूल व्यापार समतोल' सुधारणे हे भारताच्या आग्रही भूमिकेमुळेच शक्यतेच्या पातळीवर दिसू लागले आहे. बांगलादेशासारख्या देशाने भारतीय ज्यूट व्यापारासमोर उभे केलेल्या आव्हानाला तोंड देण्यासाठी नवीन उपाययोजना अमलात आणण्यात येत आहेत.

## फायलींच्या प्रक्रियेत सुटसुटीतपणा

प्रधानमंत्री नरेंद्र मोदी यांनी 'ईझ ऑफ डुईंग बिझिनेस' ही कल्पना मांडली. ती प्रत्यक्षात आणताना राज्यांशी वारंवार संपर्क संवाद साधून, तुमच्याकडील निर्यात-आयात कायदे ऑनलाइन करणे किंवा उद्योगांना लाल दिवा दाखवणाऱ्या फायलींच्या प्रक्रियेत सुटसुटीतपणा आणणे यासाठी काय काय ठोस उपाय केलेत, याचा वरचेवर आढावा थेट दिल्लीच्या उद्योग मंत्रालयातून घेणे सुरू आहे. अनेक राज्यांनी त्यानुसार काम सुरू केल्याचे दिसत आहे.

विकासाचा केंद्रबिंदू हा जिल्हा' असावा ही कल्पना मांडून नुकतीच जिल्हा योजना' अंमलात आली आहे. राज्यातील रत्नागिरी व सिंधुदुर्गासह देशातील सहा जिल्ह्यांची पहिल्या टप्प्यातील निवड ही जिल्ह्यांचा विकासदर ३ टक्के वाढवण्याचे शिवधनुष्य पेलण्यासाठीचा आरंभबिंदू ठरणार आहे. या मंत्रालयाने खासदारांच्या सक्रिय सहभागातून निर्यात दुप्पट करणे व त्यासाठी 'निर्यात बंधू' ही संकल्पना राबवणे, व्यापार प्रक्रियेत सुटसुटीतपणा आणणे, शेतकऱ्याचे उत्पन्न दुप्पट करणे, चर्मोद्योगासारख्या क्षेत्रातील भारताची जागतिक बाजारपेठ वाढवणे, स्टार्टअप इंडियाबाबत देशभरात तळागाळापर्यंत जागृती मोहीम आदी उपक्रम राबवण्यास प्रारंभ केला आहे.



सुरेश प्रभू

## कांदा निर्यात

महाराष्ट्राच्या दृष्टीने कांदा व साखर ही दोन महत्त्वाची पिके आहेत. या क्षेत्रांत राज्याचा ठसा जागतिक पातळीवर उमटतो. मात्र चीन हा अजूनही जागतिक पातळीवरील पहिला कांदा निर्यातदार देश आहे. वाणिज्य मंत्रालयाने किमान निर्यात मूल्य (एमईपी) धोरण

सातत्याने राबवले आहे. कांदा उत्पादक शेतकऱ्यांचा काटेकोर विचार करून लासलगाव व अन्य बाजारपेठेत या वर्षी कांद्याचे निर्यात मूल्य शून्य रुपये केले. देशांतर्गत बाजारपेठेत काद्यांचा दर भाव २० रुपये प्रतिकिलोच्या खाली घसरले की, निर्यात मूल्य शून्यावर येणार ही आपोआप राबवणारी प्रक्रिया प्रभूंच्या पुढाकाराने अमलात आली. कांद्याची निर्यात सातत्याने वाढत असून २०१४-१५ मध्ये हे प्रमाण १४ लाख ०७ हजार ९५६.११ क्विंटल इतके होते, ते २०१६-१७ मध्ये २४ लाख ६५ हजार ९१७.३६ क्विंटलवर गेले व २०१८ च्या पहिल्या तिमाहीतच कांदा निर्यात १६ लाख २३ हजार ८६० क्विंटलपर्यंत वाढली आहे. या काळात आयात कांद्याचे प्रमाण एखादा अपवाद वगळता कमी होत गेल्याचे मंत्रालयाची आकडेवारी सांगते.

## साखर निर्यात

साखरेच्या निर्यातीतही भारताने लक्षणीय प्रगती केली आहे. २०१५-१६ मध्ये जागतिक तुलनेत भारतातीतल साखर उत्पादनाचा वाटा १५ टक्के इतका आहे. २०१५ मध्ये उसाचे उत्पादन ३५२१ लाख टन इतके होते. २०१७-१८ या वर्षी ते ३३७६ लाख टन इतके वाढले आहे. देशातून २०१३-१४ मध्ये सुमारे २९ लाख मेट्रिक टन साखरेची निर्यात झाली तर २०१६-१७ मधे हेच प्रमाण २४ लाख ६२ हजार ८५३ मे. टन इतके होते. रशिया, व्हिएतनाम, इराण, इंडोनेशिया, मलेशिया, अल्जिरिया, कोरिया, नायजेरिया, बांगलादेश, जपान, सुदान, इराक, श्रीलंका, सौदी अरेबिया आदी अनेक देशांत भारतीय साखरेच्या गोडी'ची महती पटवण्यासाठी व त्या त्या देशांतून कच्च्या साखरेची आयात करून प्रक्रियाकृत शुद्ध साखर त्यांना पुरवण्यासाठी वाणिज्य मंत्रालयाने विशेष प्रचार अभियान चालवले आहे. देशांतर्गत साखर उत्पादनाचा उच्चांक लक्षात घेता यंदा फेब्रुवारीत भारताने साखर आयात शुल्क दुपटीने वाढवून ते १०० टक्के केले. तर निर्यात शुल्क २० टक्क्यांपर्यंत घटवले. ५ लाख मेट्रिक टनांपर्यंतच्या कच्च्या साखरेच्या निर्यातीला याच महिन्यात १३ एप्रिलला अधिकृतपणे परवानगी देण्यात आली. अशा ३ लाख मेट्रिक टन साखरेवर कारखान्यांना टॅरिफ शुल्कात २५ टक्क्यांपर्यंतची सवलत दिली गेली.



## भारताची भरारी

जागतिक बँकेच्या 'उद्योग स्नेही' राष्ट्रांच्या यादीत भारताने गेल्या वर्षी ३० क्रमांकांनी झेप घेऊन १३० वे स्थान मिळवले होते. भारताला पहिल्या शंभरात आणण्याचा निर्धार वाणिज्य मंत्रालयाने केला आहे. ई-बिझ पोर्टल अंतर्गत दिल्ली राजधानी क्षेत्र, आंध्र प्रदेश व ओडिशा यासारख्या राज्यांनी दाखवलेल्या पुढाकाराने केंद्राच्या २० सेवांची प्रक्रिया सुटसुटीत करण्याचा प्रायोगिक प्रकल्प सुरू झाला आहे. स्टार्टअप इंडिया योजना २०१६ मध्ये सुरू झाला. मात्र २०१७ च्या उत्तरार्धानंतरच तिला खरी गती मिळाल्याचे दिसत आहे. मेक इन इंडिया, अटल टिंकरिंग लॅब्ज, इन्वहेस्ट इंडिया, औद्योगिक पायाभूत सुविधा प्रगती योजना (एमआयआययूएस), चेन्नई-बंगळुरू, अमृतसर-कोलकता, ईशान्य राज्ये आदी औद्योगिक पट्ट्यांच्या कामालाही गती आली आहे. देशात ९ मेगा फूड पार्क्स व ८२ शीतगृहांची साखळी गेल्या चार वर्षांत प्रत्यक्षात आली आहे. सोने व आभूषणांच्या क्षेत्रातील देशाची थेट विदेशी गुंतवणूक २०१४ नंतर तिपटीहून जास्त प्रमाणात वाढून २०१७ मध्ये ती ४६३ दशलक्ष डॉलरवर पोहोचली होती. माहिती-तंत्रज्ञान (आयटी) क्षेत्रात भारताचा दबदबा निर्माण झाला असून या क्षेत्रातील विदेशी गुंतवणूक २०११-१४ काळातील २. ७७ अब्ज डॉलरवरून २०१७ अखेरीस १२.२४ अब्ज डॉलरपर्यंत म्हणजे ४.४ टक्क्यांनी वाढली आहे. २३ हजार ५६९ कोटी रुपयांचे १३० नवे प्रकल्प मंजूर झाले आहेत. प्रसारमाध्यम क्षेत्रात १.९ पटीने विदेशी गुंतवणूक वाढली आहे. नवीन व नवीकरणीय ऊर्जा, तेल व नैसर्गिक वायू, ओषधे, वीजनिर्मिती, रेल्वे, वस्त्रोद्योग, पर्यटन आदी क्षेत्रांतील भारताच्या प्रगतीचा आलेख झपाट्याने विस्तारतो आहे. मात्र अजूनही आव्हाने संपलेली नाहीत.

उद्योगांसाठी परवाने देणे व थेट विदेशी गुंतवणुकीसाठी भारतातील किचकट कागदी प्रक्रिया व अडचणींचा डोंगर उभा करणाऱ्या यंत्रणेची मानसिकता बदलणे, हे फार मोठे आव्हान आहे.




**(लेखक हे दिल्ली येथे ज्येष्ठ पत्रकार आहेत.)**



**राष्ट्राच्या विकासाला योगदान देण्यासाठी भारतीय रेल्वेची सुरक्षा, गती आणि ग्राहकांना सेवा देण्यासाठी केंद्र शासन कटीबद्ध आहे. प्रधानमंत्री नरेंद्र मोदी यांच्या 'नवा भारत' या उपक्रमात भारतीय रेल्वे महत्त्वाची भूमिका बजावत आहे. भारतीय रेल्वेच्या परिवर्तनासाठी महत्त्वाची पावले उचलण्यात आली आहेत. भारतीय रेल्वेत मोठ्या प्रमाणात गुंतवणूक करण्यात आली असून, रेल्वे विकासाचा सर्वंकष आराखडा तयार करण्यात आला आहे. प्रवाशांच्या विकास यात्रेसाठी रेल्वे मंत्री म्हणून पदभार स्वीकारल्यानंतर पियुष गोयल यांनी विविध नावीन्यपूर्ण उपक्रम व योजना राबवण्याच्या दृष्टीने पावले टाकली.**

# गतिमान, आधुनिक आणि सुरक्षित

**पियुष गोयल,** रेल्वेमंत्री

लातूर जिल्ह्याच्या आणि मराठवाड्याच्या इतिहासात कायम स्मरणात राहील असा ऐतिहासिक दिवस ठरला तो ३१ मार्च २०१८ हा. या दिवशी लातूर शहराजवळच्या हरंगूळ गावाच्या परिसरातील एमआयडीसीने संपादित केलेल्या १५३ हेक्टर ८८ आर जमीन क्षेत्रावर मराठवाडा रेल्वे कोच फॅक्टरीचे भूमिपूजन झाले. या कारखान्यातून पहिल्या टप्प्यात प्रतिवर्षी २५० रेल्वे डब्यांचे उत्पादन होणार आहे. दुसऱ्या टप्प्यात ४०० डब्यांचे उत्पादन होणार आहे. पहिल्या टप्प्याच्या फॅक्टरीच्या उभारणीचा अपेक्षित खर्च ५०० कोटी रुपये आहे. या निधीची तरतूद रेल्वेने केली आहे. या फॅक्टरीची उभारणी रेल्वे विकास निगम लिमिटेड (आरव्हीएनएल) द्वारे करण्यात येणार आहे. या फॅक्टरीच्या उभारणीबाबत आवश्यक त्या सर्व बाबींची पूर्तता करण्यात आली आहे. भू-सर्वेक्षण पूर्ण करण्यात आले आहे. फॅक्टरी आराखडा विकसित करण्यात आला आहे.

## पर्यावरणपूरक प्रकल्प

या फॅक्टरीच्या उभारणीच्यावेळी शेड आणि इमारतीचे काम करताना हरित मानांकनांचे पालन करण्यात येणार आहे. यात प्रामुख्याने सौर ऊर्जा, कार्यक्षम एलईडी बल्बचा आणि सौरट्यूब प्रकाशाचा वापर होणार आहे. याचबरोबर या प्रकल्पात पाण्याचा कार्यक्षमतेने वापर करण्यात येणार आहे. त्यासाठी जलशुद्धीकरण यंत्रणा, रेनवॉटर हार्वेस्टिंग प्रणालीचाही समावेश असणार आहे. या फॅक्टरीमुळे प्रत्यक्ष आणि अप्रत्यक्षरीत्या २५ ते ३० हजार संभाव्य रोजगार निर्मितीची अपेक्षा व्यक्त केली जात आहे. ८० टक्के स्थानिक लोकांना यात प्राधान्य असणार आहे. विशेष म्हणजे मुंबईतील मॅग्नेटिक महाराष्ट्र समारंभात भारतीय रेल्वे आणि महाराष्ट्र शासन यांच्यात २० फेब्रुवारी २०१८ रोजी झालेल्या सामंजस्य करारानंतर केवळ दोन महिन्यात सर्व प्रकारच्या प्रक्रिया पूर्ण करून भूमिपूजन झालेला हा राज्यातील पहिला प्रकल्प होय.

## महत्त्वपूर्ण निर्णय

● मुंबई व मुंबई उपनगरामध्ये धावणाऱ्या सर्व लोकल गाड्यांत सीसीटीव्ही कॅमेरे, रेल्वे स्थानकात अतिरिक्त सरकते जिने, नवीन पादचारी पूल व काही पादचारी पुलांचा विस्तार करण्याचा निर्णय घेण्यात आला. ● पश्चिम रेल्वेवरील १३ नवीन पादचारी पुलांचा विस्तार करतानाच १० नवीन पुलांची तर मध्य रेल्वेवर २० नवीन पादचारी पूल उभारण्यास मंजुरी देण्यात आली. हे काम पुढील एका वर्षात पूर्ण करण्याचे निर्देश देण्यात आले. ● मुंबई रेल्वे प्रकल्प आणि कामकाजावर लक्ष ठेवण्यासाठी २०० अधिकाऱ्यांची नियुक्ती करण्याच्या निर्णय झाला. ● देशातील प्रमुख स्थानकांवर ७५ स्थानक संचालक नेमण्यात येणार आहेत. ● पादचारी पूल आणि त्यांना जोडणारे मार्ग यांच्याशी निगडित प्रवासी सुरक्षेला प्राध्यान्य देण्याचाही निर्णय घेण्यात आला.

मुंबई व मुंबई उपनगरासाठी २९ सप्टेंबर २०१७ रोजी १०० नवीन फेऱ्या चालू करण्यात आल्या. या अतिरिक्त सेवा (फेऱ्यांमुळे) पश्चिम रेल्वे आणि मध्य रेल्वे एकत्र ठेवणाऱ्या २९८३ फेऱ्यांमध्ये वाढ होऊन त्या ३०८३ एवढ्या झाल्या. या नवीन वाढीव फेऱ्यांमुळे



मुंबई व उपनगरातील प्रतिदिन ७७ लाख प्रवाशांना याचा फायदा होत आहे.

### प्रवाशांच्या सुरक्षिततेसाठी प्राधान्य

● रेल्वेमार्गाचे नूतनीकरण करणे आणि नवीन रेल्वे सुरू करण्यास प्राध्यान्य. ● तपासणी अधिकाऱ्यांवरील असणारा ताण कमी करण्यासाठी उपाययोजना करणे. ● मानवरहित ५ हजार असणाऱ्या क्रॉसिंगची वेळेवर देखभाल करणे. ● पुढील वर्षापासून एलएचबी (लिंक हॉफमन बुश) कोचचे रूपांतर आयसीएफ (इंटिग्रल कोच फॅक्टरी) कोचमध्ये करणार. ● सुरक्षेच्या दृष्टीने रेल्वे डब्यात, स्टेशनवर सीसीटीव्ही कॅमेरे बसवण्यात येतील. याचा लाभ विशेषत: महिला आणि ज्येष्ठ नागरिकांना होईल. ● सिग्नल प्रणालीचे अद्ययावतीकरण करणे. यासाठी रेल्वे सुरक्षा आणि चेतावणी प्रणाली (ट्रेन प्रोटेक्शन ॲण्ड वॉर्निंग सिस्टिम) आणि मोबाइल ट्रेन रेडिओ कम्युनिकेशन कार्यन्वित करणे तसेच उपनगरातील आणि लांब पल्ल्याच्या मार्गावर आधुनिक सिग्नल




प्रणाली वापर करणे.

- प्रवासी तिकिटांच्या तपासणीसाठी भरारी पथक निर्माण करणे.
- डिसेंबर २०१८ पर्यंत २० स्टेशनचे आधुनिकीकरण करणार.
- मोबाइल ॲप्सच्या माध्यमातून प्रवाशांना सुविधा देणे.
- सर्व स्थानकांवर हायस्पीड वायफायची सुविधा देणे.

### मिशन रफ्तार

भारतीय रेल्वेच्या मालगाड्यांची सरासरी गती सुधारण्यासाठी मिशन रफ्तार सुरू केली गेली आहे. या प्रकल्पांतर्गत, पॅसेंजर गाडी व फ्रेट गाडी दोन्हीची सरासरी गती वाढवण्यासाठी उपाययोजना करण्यात येत आहेत. सुरुवातीला गाझियाबादमधील सर्वात वेगवान – अलाहाबाद–मुगलसराय मार्ग सरासरी वेगाने वाढवण्यासाठी प्राधान्याने घेतला गेला आणि आता तो यशस्वीपणे अंमलात आला आहे.

### मुंबई व उपनगरातील रेल्वेसाठी तरतूद

१५० किमी लांबीचे उपनगरीय जाळे निर्माण करण्यासाठी ४० हजार कोटी रुपयांची तरतूद या अर्थसंकल्पात केली आहे. सीएसएमटी (छत्रपती शिवाजी महाराज टर्मिनस)–पनवेलदरम्यान जलद रेल्वेमार्ग उभारण्यासोबतच पनवेल–विरार प्रवासी वाहतुकीचा पर्याय उपलब्ध करून देणाऱ्या पाचव्या–सहाव्या मार्गिकेसाठी भरीव तरतूद केली आहे. त्यासोबतच हार्बरचा बोरिवलीपर्यंतचा विस्तार, २१० वातानुकूलित लोकल गाड्या, सर्व स्थानकात वायफाय व सीसीटीव्ही, सरकते जिने अशा पूर्वघोषित प्रकल्पांच्या पूर्ततेला या निधीद्वारे वेग येणार आहे. मुंबईच्या उपनगरीय रेल्वे प्रवाशांना दिलासा देण्यासाठी मुंबई रेल्वे विकास महामंडळाने (एमआरव्हीसी) एमयूटीपी–३( मुंबई शहरी परिवहन प्रकल्प) अंतर्गत ५४ हजार कोटी रुपयांचे प्रकल्प रेल्वे बोर्डाच्या मंजुरीसाठी पाठवले होते. यामध्ये सीएसएमटी–पनवेल जलद मार्गासह अनेक महत्त्वाच्या प्रकल्पांचा समावेश होता. पश्चिम आणि हार्बर मार्गावरील प्रवाशांना उपयुक्त ठरणारे हार्बरचे बोरिवलीपर्यंतचे विस्तारीकरण आणि बोरिवली–विरारदरम्यान पाचव्या, सहाव्या मार्गिकेचा प्रकल्पही यात समाविष्ट होता. मुंबईतील ९० किमी लांबीच्या मार्गाचे दुहेरीकरण करण्यासाठी ११ हजार कोटी रुपयांची तरतूद केली आहे. यासोबतच १५० किमी लांबीचे उपनगरीय जाळे निर्माण करण्यासाठी ४० हजार कोटी रुपयांची तरतूद करण्यात आली आहे. हार्बरवरील सीएसएमटी ते पनवेल हा सध्या ७५ मिनिटे अवधीचा प्रवास जलद मार्गामुळे ४५ मिनिटांत पूर्ण होणार आहे. या उन्नत जलद मार्गासाठी १२ हजार ३३१ कोटी रुपयांचा खर्च अपेक्षित आहे. यासोबतच एमयूटीपी–३ अंतर्गत आखलेल्या अन्य प्रकल्पांनाही गती मिळण्याची शक्यता आहे. गेल्या अर्थसंकल्पात एमयूटीपी–३ मधील प्रकल्पांसाठी केंद्राने ४११ कोटी रुपयांची तरतूद केली होती. हा प्रकल्प ११ हजार कोटी रुपये किमतीचा आहे. यामध्ये वसई–विरार चौपदरीकरण, पनवेल–कर्जत उपनगरीय दुहेरी मार्गिका, कळवा–ऐरोली उन्नत जोडमार्ग या प्रकल्पांचा समावेश आहे. याशिवाय पनवेल–कर्जत उपनगरीय दुहेरी मार्गिका, कळवा–ऐरोली उन्नत जोडमार्गाना गती मिळण्याची आशा आहे.

### या प्रकल्पांना निधी

सीएसएमटी–पनवेल जलद उन्नत मार्ग, पनवेल–कर्जत उपनगरीय दुहेरी मार्ग, कळवा–ऐरोली उन्नत जोडमार्ग, हार्बरचा गोरेगाव–बोरिवली विस्तार, बोरिवली–विरार पाचवी–सहावी मार्गिका, कल्याण–बदलापूर तिसरा, कल्याण–आसनगाव चौथा मार्ग.

### २१० वातानुकूलित लोकल

सध्या धावत असलेल्या लोकल गाड्यांऐवजी मध्य आणि पश्चिम रेल्वेच्या उपनगरीय रेल्वे मार्गावर २१० वातानुकूलित लोकल गाड्या चालवण्याचे नियोजन असून त्यालाही अर्थसंकल्पात स्थान मिळाले आहे.

### १५ स्थानकांचा कायापालट

एमयूटीपी–३ अंतर्गत १५ स्थानकांत सरकते जिने, लिफ्ट,

प्रसाधनगृहे इत्यादी सुविधा पुरवल्या जाणार आहेत. यामध्ये पश्चिम रेल्वेवरील लोअर परेल, खार रोड, गोरेगाव, मीरा रोड, भाईंदर, नालासोपारा, विरार तर मध्य रेल्वे मुख्य मार्गावरील, सायन, घाटकोपर, मुलुंड, डोंबिवली, शहाड आणि हार्बरवरील वडाळा, चेंबूर, जीटीबी नगर या स्थानकांचा समावेश आहे.

### वायफाय, सीसीटीव्ही सुविधा

लांब पल्ल्याच्या गाड्या आणि रेल्वे स्थानकांमध्ये वायफाय तसेच सीसीटीव्हींची संख्या वाढवण्यात येईल, अशी घोषणा अर्थसंकल्पात करण्यात आल्याने मुंबईतीलही सर्व स्थानकात या सुविधा उपलब्ध करून दिल्या जातील.

### सर्व स्थानकांवर सरकते जिने

२५ हजारापेक्षा जास्त प्रवासी संख्या असलेल्या स्थानकांवर सरकते जिने बसवण्यात येणार असल्याची माहिती अर्थसंकल्पात देण्यात आली. त्यानुसार मुंबई उपनगरीय रेल्वे मार्गावरील बहुतांश स्थानकांतील प्रवासी संख्या जास्त आहे. त्यामुळे सर्व स्थानकांवर सरकते जिने बसविण्याचा मार्ग मोकळा झाला आहे.

### पायाभूत सुविधा निर्मिती

भारतीय रेल्वेने ब्रॉडगेजच्या २८५५ किलोमीटरचे काम केले जे २०१६–१७ मध्ये सर्वात जास्त २८२८ किमी २०१५–१६ वर होते

भारतीय रेल्वेने पाच वर्षांत (२०१६–२१) २४,४०० मार्ग किलोमीटर (आरकेएम) बीजी नेटवर्कच्या विद्युतीकरणासाठी कृती योजना तयार केली आहे. त्यानुसार २०१४–१५ ते २०१६ या काळात १७०० आरकेएमच्या तुलनेत विद्युतीकरणची गती २०१७–१८ मध्ये ४,००० आरकेएमपर्यंत वाढली आहे. १४३५ रेल्वे स्थानकांवर मागील ३ वर्षांत १००% एलईडी लाइट देण्यात आली आहे. चालू वर्षांत सर्व रेल्वे स्थानकांवर १००% एलईडी लाइट प्रदान करण्यात येईल. त्यामुळे रेल्वे स्टेशनवर प्रकाश तर येईलच, शिवाय वीज बचत करणेही शक्य होईल.

### वर्षभरातील ठळक कामगिरी

भारतीय रेल्वेने प्रवाशांच्या सेवेसाठी डेबिट कार्ड, क्रेडिट कार्ड आणि भीम ॲपमधून पैसे भरण्याची सुविधा चालू केली आहे.

रेल्वे प्रवाशांच्या सुरक्षेसाठी गतवर्षी ४,४०५ किमी मार्गाचे नवीनकरण करण्यात आले आहे. ते २०१३–१४ च्या तुलनेने दीड

## १ लाख ३५ हजार कोटींची रेल्वे विकासाची कामे

महाराष्ट्रातील रेल्वे विकासाच्या विविध प्रकल्पांसाठी १ लाख ३५ हजार ५७ कोटी रुपयांची कामे गेल्या चार वर्षात हाती घेण्यात आली आहेत. यामध्ये ६५ हजार ७२४ कोटी रुपयांची कामे ही मुंबई शहर वाहतूक प्रकल्पाची (एम.यू.टी.पी.) आहेत. नवीन रेल्वे मार्ग, दुपदरीकरण, रेल्वे मार्गांचे विद्युतीकरण याबरोबरच मुंबई उपनगरीय रेल्वे वाहतूक दुपदरीकरण व मुंबई शहर वाहतूक प्रकल्पांतर्गत (एम.यू.टी.पी) रेल्वे वाहतूक विस्तार आदी महत्त्वपूर्ण विकासकामे गेल्या चार वर्षात हाती घेण्यात आली आहेत.

### अर्थसंकल्पात वाढीव तरतूद

महाराष्ट्रातील रेल्वे प्रकल्पांसाठी गेल्या चार वर्षांपासून वाढीव तरतूद करण्यात येत आहे. २०१४ ते २०१८ या काळात महाराष्ट्रासाठी प्रतिवर्ष सरासरी ४३४५ कोटी रुपयांची तरतूद अर्थसंकल्पात करण्यात आली. यापूर्वी ही तरतूद प्रतिवर्ष ११७१ कोटी इतकी होती. २०१८–१९ च्या केंद्रीय अर्थसंकल्पात राज्यातील रेल्वे विकास कामांसाठी ६ हजार ६५८ कोटींची तरतूद करण्यात आली असून, आतापर्यंत राज्यासाठी करण्यात आलेली ही सर्वात मोठी आर्थिक तरतूद आहे.



### ६९ हजार कोटींची कामे प्रगतिपथावर

नवीन रेल्वे मार्ग, दुपदरीकरण, चौपदरीकरण व रेल्वे मार्गांचे विद्युतीकरण, गेजपरिवर्तन या कामांसाठी ६९ हजार ९३३ कोटी रुपयांची कामे हाती घेण्यात आली आहेत. यामध्ये राज्यातील १८१६ की.मी. लांबीच्या नवीन १४ मार्गांसाठी ३१ हजार ४४८ कोटी ७८ लाख रुपयांची कामे प्रगतिपथावर आहेत,यातील ७७१ कोटी रुपयांची कामे सार्वजनिक खासगी भागीदारीतून करण्यात येत आहेत.

### रेल्वे मार्ग विद्युतीकरणासाठी ४ हजार कोटी

२०१४ पासून राज्यातील ७३० किमी. लांबीच्या मार्गाचे विद्युतीकरण पूर्ण झाले. आता राज्यातील १७ मार्गावरील २२०९ किमी. लांबीच्या मार्गांचे विद्युतीकरण हाती घेण्यात आले असून या प्रकल्पासाठी ४ हजार ३२६ कोटी ४५ लाख रुपये खर्च करण्यात येत आहेत. याबरोबरच २१ नवीन रेल्वे मार्गासाठी सर्वेक्षण करण्यात येत आहे.

## बुलेट ट्रेन



**मुंबई–अहमदाबाद अतिजलद रेल्वे प्रकल्पाच्या भूमिपूजन समारंभाप्रसंगी प्रधानमंत्री नरेंद्र मोदी व जपानचे प्रधानमंत्री शिंजो आबे.**

प्रधानमंत्री नरेंद्र मोदी आणि जपानचे प्रधानमंत्री शिंजो आबे यांच्या हस्ते सप्टेंबर २०१७ मध्ये मुंबई–अहमदाबाद अतिजलद रेल्वे प्रकल्पाचे भूमिपूजन करण्यात आले. ५०८ किमीचा मार्ग असलेला हा प्रकल्प २०२२ पर्यंत पूर्ण करण्यात येणार आहे. ही बुलेट ट्रेन सुरू झाल्यानंतर मुंबई–अहमदाबाद हा प्रवास अवघ्या २–३ तासांत पूर्ण करता येणार आहे. मुंबई–अहमदाबाद या मार्गावर एकूण १२ स्टेशन असणार आहेत. बांद्रा–कुर्ला, ठाणे, विरार, बोईसर, वापी, बिलिमोर, सुरत, भरूच, वडोदरा, आनंद, अहमदाबाद आणि साबरमती ही स्थानके असणार आहेत. या बुलेट ट्रेनचा सर्वाधिक वेग ३२० किमी/तास असेल. बुलेट ट्रेनचे प्रशिक्षण केंद्र वडोदरा येथे उभारण्यात येणार असून यामध्ये ४ हजार कर्मचाऱ्यांना प्रशिक्षण देण्यात येईल. या प्रोजेक्टमुळे जवळपास २० हजार लोकांना रोजगार उपलब्ध होईल.

पटीने ज्यादा आहे. यामुळे प्रथमच रेल्वे अपघाताची घटनांची आकडेवारी दोन अंकात राहिली आहे.

प्रथमच मुंबईतील उपनगरीय रेल्वे विभागात वातानुकूलित बारा डब्याची स्वदेशी बनावटी रेल्वे जनतेच्या सेवेसाठी सुरू करण्यात आली.

**स्वर्ण प्रकल्प –** प्रवाशांच्या सूचना लक्षात घेऊन १४ राजधानी १५ जनशताब्दीतील रेल्वे सेवेत सुधारणा करण्यात आली. २३६७ कि.मी. मार्गावर विद्युत शक्ती खेचून नेण्याचे ध्येय साध्य करण्यात आले. ग्लोबल पॉझिशिनिंग सिस्टम' (जीपीएस) आधारित 'धुके पास यंत्र' कार्यान्वित केल्यामुळे अडचणीच्या वेळेत रेल्वे चालकास पुढील सिग्नलचे नाव आणि अंतराची माहिती मिळणार आहे.

### प्रवाशांकरिता सेवा–सुविधा

प्रवाशांना रेल्वेची जलद माहिती देण्यासाठी संदेश (एसएमएस) सेवा सुरू केली. यात रेल्वेची सद्य:स्थिती, किती उशिरा आगमन होणार आहे आदी माहितीचा समावेश आहे. 'ई–आधार'ला प्रवासात ओळखपत्र म्हणून मान्यता देण्यात आली आहे.

### रेल्वे मंत्रालयाची कामगिरी

रेल्वे मंत्रालय प्रवासी संख्या आणि उत्पन्न वाढवण्यासाठी सातत्याने प्रयत्न करत आहे. या प्रयत्नांचे फलित म्हणून रेल्वे मंत्रालयाला रेल्वेचा तोटा कमी करण्यात व प्रवासी संख्येत वाढ करून रेल्वेचे उत्पन्न वाढवण्यात यश आले आहे. २०१५–१६ मध्ये ८१५१ दशलक्ष प्रवासी रेल्वेने प्रवास करत होते. २०१६–१७ मध्ये ही संख्या ८२२१ दशलक्ष इतकी वाढली आहे, यावर्षीचे प्रवासी उत्पन्न मागच्या वर्षीपेक्षा अंदाजे २,००० कोटी इतके वाढले आहे. यावर्षीचे एकूण उत्पन्न अंदाजे ४७,४०० कोटी इतके आहे. हे सर्वात जास्त प्रवासी उत्पन्न म्हणावे लागेल. यात्री सेवा केंद्र योजना सुरू करण्यात आली. जेणेकरून खासगी एजंटमार्फत आरक्षित किंवा विनाआरक्षित तिकिट विक्री करता येऊ शकेल. १४३५ इतक्या स्थानकांना १००% एलईडी दिवे उपलब्ध करून देण्यात आले आहेत.

ग्राहकांच्या तक्रार निवारणासाठी रेल्वेने फेसबूक, ट्वीटर यांसारख्या समाजमाध्यमांचा आधार घेतला आहे. यावर औषधे, स्वच्छता, खानपान, सुरक्षा आणि प्रवाशांना आपत्कालीन सेवा आदी संदर्भात तक्रार करता येते. प्रवासादरम्यान आपत्कालीन परिस्थितीत मदत मागण्यासाठी १८२ तसेच तक्रार करण्यासाठी १३८ हा क्रमांक उपलब्ध करून देण्यात आला आहे. मोबाइल आधारित तक्रार प्रणाली उपलब्ध करून देण्यात आली आहे. प्रवाशांना माफक दरात शुद्ध पाणी उपलब्ध करून देण्यासाठी जलशुद्धीकरणाची मोठी योजना राबवण्यात येत आहे. मागणीनुसार स्थानकावर जलशुद्धीकरण यंत्रणा उपलब्ध करून दिली आहे.

'जननी सेवा योजने'चा शुभारंभ करण्यात येऊन या योजनेंतर्गत लहान मुलांसाठी गरम पाणी, दूध तसेच अन्न स्टेशनवर उपलब्ध करून देण्यात येत आहे. आनंदविहार ते गोरखपूरसाठी पहिली 'हमसफर' रेल्वे गाडी सुरू करण्यात आली. आतापर्यंत अशा पाच गाड्या विविध मार्गावर सुरू करण्यात आल्या आहेत. रेल्वे मंत्रालयाने प्रवाशांना स्थानिक पदार्थांची लज्जत घेता यावी, म्हणून स्वयंसहायता बचतगटाची मदत घेतली आहे. याद्वारे बचत गटांनाही रोजगार उपलब्ध करून देण्याचे काम रेल्वेने केले आहे. याचबरोबर राष्ट्राला 'रेल गीत' समर्पित करण्यात आले आहे, याशिवाय अन्य सेवा सुविधा पुरवण्याचे काम रेल्वे प्रशासन करत आहे.



# उद्योगांचे सक्षमीकरण

**अवजड उद्योग मंत्रालयाचा तसा थेट लोकांशी संबंध नाही. परंतु अर्थकारणावर मोठा प्रभाव या मंत्रालयाचा आहे. रोजगारनिर्मिती, नव-तंत्रज्ञानाचा वापर, नवोन्मेषाला (इनोव्हेशन) उभारी देण्याची मोठी जबाबदारी या विभागावर असते. गेल्या चार वर्षात ही जबाबदारी या विभागाने कुशलपणे पार पाडली आहे.**

**टेकचंद सोनवणे**



**अनंत गीते**
(केंद्रीय मंत्री, अवजड उद्योग)

**जगभरात मंदीचे सावट येऊ पाहताना अवजड उद्योग मंत्रालयाची जबाबदारी वाढली आहे...**

बरोबर आहे. मोठी जबाबदारी आहे. आम्ही सर्वप्रथम अवजड उद्योग मंत्रालयात अंतर्गत येणारे परंतु गेल्या अनेक वर्षांपासून तोट्यात तोट्यात असलेल्या 'भारत हेवी इलेक्ट्रिकल्स लिमिटेड' (भेल) कंपनीला तोट्यातून काढण्यात आम्हाला यश आले. २०१५-२०१६ साली या कंपनीला ४४५ कोटी रुपयांचा तोटा होता. आजमितीला ही कंपनी सहाशे कोटी रुपयांच्या घसघशीत नफ्यात आहे. सरलेल्या आर्थिक वर्षाच्या तिसऱ्या तिमाहीत सहाशे कोटी रुपयांचा नफा झाला.

गेल्या पाच वर्षात भेलने २ हजार ७८५ कोटी रुपयांच्या डिव्हिडंटचे वाटप केले आहे. शेजारी राष्ट्रांत उद्योग विस्तार झाल्याने भेलचा राजनैतिक (डिप्लोमॅटिक) संबंधांसाठीही उपयोग झाला आहे. बांगलादेशमध्ये तब्बल १० हजार कोटी रुपयांचा १ हजार ३२० मेगावॅट मैत्री सुपर थर्मल पॅवर प्रोजेक्ट उभरला आहे. नवोन्मेषशाली संशोधनाला आम्ही वाव देत आहोत. संशोधन व त्यातून विकास (रिसर्च अँड डेव्हलपमेंट) हे नवोन्मेषाचे सूत्र आहे. गेल्या पाच वर्षात आम्ही त्यावरील खर्च अडीच टक्क्यांनी वाढविला आहे. 'फोर्ब्ज'च्या जगातील पहिल्या शंभर इनोव्हेटिव्ह कंपन्यांमध्ये भेलचा नववा क्रमांक आहे. ही कामगिरी आम्ही गाठली आहे. भेलच्या नावावर आज ४ हजार ३०० बौद्धिक संपदा हक्क (पेटंट्स) जमा आहेत. या आर्थिक वर्षात आम्ही आमचा नफा चार आकड्यांवर नेऊन ठेवू.

**देशाच्या विकासासाठी वीज मोठ्या प्रमाणावर निर्माण करावी लागते. या क्षेत्रासाठी योगदान?**

विजेचे उत्पादन वाढवताना तंत्रज्ञानावरच सर्वाधिक भर द्यावा लागेल. भेलने अल्ट्रा सुपर क्रिटिकल पॉवर तंत्रज्ञानाचा वापर सुरू केला आहे. जगात या तंत्रज्ञानाचा वापर करून कुठेही वीजनिर्मिती केली जात नाही. विज्ञान व तंत्रज्ञान मंत्रालय, एनटीपीसीचाही यात सहभाग आहे. १५०० कोटी रुपये आम्ही केवळ संशोधनावरच खर्च करत होतो. तीन वर्षांचा कालावधी आम्ही त्यासाठी निश्चित केला आहे. हे तंत्रज्ञान पूर्णत: विकसित झाल्यावर भारताला कोळशासाठी अन्य कोणाही देशावर अवलंबून राहावे लागणार नाही. कोळशाचा वापर अकरा टक्क्यांनी कमी होईल. त्याबरोबर कार्बन उत्सर्जनही. एकाचवेळी ८०० मेगावॅट वीजनिर्मितीची आपली क्षमता असेल.

**वाहनांपासून होणारे प्रदूषण रोखण्यासाठी अवजड उद्योग मंत्रालयाचा कसा हातभार लागतोय?**

प्रदूषण कमी करण्यासाठी अवजड उद्योग मंत्रालय कसोशीने प्रयत्न करत आहे. त्यासाठी आम्ही महत्त्वकांक्षी योजना आखली. 'फेम इंडिया' या नावाने. दुचाकी,तीन चाकी व चार चाकी इलेक्ट्रिक वाहनांचा वापर वाढवण्यात येईल. सार्वजनिक परिवहन सेवा, खासगी टॅक्सीचालक, ई-रिक्षा घेण्यासाठी आम्ही प्रोत्साहित करत आहोत. त्यासाठी मोठी सूट (सबसिडी) आहे. सार्वजनिक चार्जिंग युनिट स्थापण्यात येत आहेत. जास्तीत जास्त शहरांमध्ये सार्वजनिक परिवहन सेवेसाठी इलेक्ट्रिक बसेसचा वापर वाढावा यासाठी आम्ही प्रोत्साहन देत आहोत. मुंबई, कोलकाता, जम्मू-काश्मीर, हिमाचल प्रदेश यांसारख्या राज्यांमध्ये तर तो यशस्वीपणे राबवला गेला. बेस्टला आम्ही ८० बसेस दिल्या. एमएमआरडीएला हायब्रिड बसेस दिल्या.

**इलेक्ट्रिकवर चालणारी महागडी वाहने कशी परवडणार?**

इलेक्ट्रिकवर चालणारी वाहने अत्यंत महाग असतात. म्हणजे एका बसला खरेदी करण्यासाठी कोट्यवधी रुपये लागतात. दुचाकी, तीन चाकी व चारचाकीही तेवढ्याच महाग आहेत. म्हणजे एवढ्या पैशांमध्ये

जगातल्या अत्यंत महागड्या ब्रँडची कार खरेदी करता येऊ शकते. त्यासाठी फेम अंतर्गत मोठी सूट ई–वाहनांच्या खरेदीवर देण्यात येत आहे. सात हजार रुपयांपासून ते सत्तर हजार रुपयांपर्यंत सूट दिली जाते. सुरुवातीची गुंतवणूक (इनिशिअल कॉस्ट) जास्त असली तरी दीर्घकाळासाठी इलेक्ट्रिक वाहने किफायतशीर आहेत. मुख्य म्हणजे इंजिन नसल्याने प्रदूषण होण्याचा प्रश्नच नाही.

**इलेक्ट्रिकवर चालणाऱ्या वाहनांमुळे ऑटोमोबाइल उद्योग डबघाईला येईल, असे नाही का वाटत?**

नाही, अजिबात नाही. तसे होण्याची शक्यता नाही. कारण पेट्रोल–डिझेलची वाहने बंद करून, सरसकट ई वाहनेच वापरणे शक्य नाही. अगदी अतिप्रगत देशांमध्येही इलेक्ट्रिकवर चालणाऱ्या वाहनांचा वापर जास्तीत जास्त ३० टक्क्यांपर्यंत होतो. आपल्याला अजून बराच लांबचा पल्ला गाठायचा आहे. सध्या आम्ही केवळ सार्वजनिक वाहतुकीसाठी ई–वाहनांचा वापर करण्यावर भर देत आहोत. त्यासाठी जास्तीत जास्त प्रोत्साहन देत आहोत. कारण सरसकट ई–वाहनांचा वापर सुरू केल्यास आटोमोबाइल सेक्टर कोसळेल. देशात याच क्षेत्रामध्ये सर्वाधिक परकीय गुंतवणूक आली आहे. जगभरातले जवळ–जवळ सर्वच मोठे ब्रँड्स भारतात निर्माण होतात. त्यामुळे १८ लाख जणांना रोजगार मिळाला आहे.




**यात आव्हान कोणते?**

ई–वाहनांमध्ये सर्वात महागडी वस्तू म्हणजे बॅटरी. लिथिअम महाग असल्याने याची किंमत वाढते. बॅटरी आयात करावी लागते. त्यामुळे वाहनांची किंमत जास्त असते. म्हणजे पेट्रोलवर चालणारी बस ८० लाखाला येते तर ई बस दोन कोटी रुपयांना. त्यापैकी नव्वद लाख केवळ बॅटरीची किंमत आहे. त्यामुळे साध्या वाहनापेक्षा जास्त रक्कमेवर अवजड उद्योग मंत्रालय सबसिडी देते. विशेष म्हणजे जगभरातले लिथिअम चीनने खरेदी केले आहे. चीनचा यावर एकछत्री अंमल आहे. बॅटरी खरेदी करण्याऐवजी लिथिअम खरेदी करून 'मेक इन इंडिया' बॅटरी तयार करण्याची योजना आहे. ई वाहनांची किंमत त्यामुळे आपोआपच कमी होईल. कमी कार्बन उत्सर्जनावरून हायब्रिड तंत्रज्ञानाकडे व हायब्रिड तंत्रज्ञानाकडून शून्य कार्बन उर्त्सजनाकडे आपल्याला जायचे आहे.

**(लेखक दै. लोकमत दिल्ली आवृत्तीचे ज्येष्ठ पत्रकार आहेत.)**

## 'फेम इंडिया'

(फास्टर ॲडॉप्शन ऑफ मॅन्युफॅक्चरिंग ऑफ (हायब्रिड अँण्ड) इलेक्ट्रिक व्हेकल्स इन इंडिया). तीन टप्प्यांमध्ये ही योजना राबवण्यात येईल. पहिला टप्पा दोन वर्षांचा आहे. पुढच्या वर्षी तो संपेल. ज्यात सर्व प्रकारच्या ई वाहनांसाठी बाजारात अनुकूल वातावरण तयार करण्यात येईल. विशेष लक्ष सार्वजनिक वाहतूक सेवेवर असेल. २०१५ के २०१८ पर्यंत ३८३ कोटी रुपयांचा निधी खर्च करण्यात आला आहे. फेम इंडियात एकूण ८० वाहनांचे प्रकार (मॉडेल्स) आहेत. ज्यात पन्नास दुचाकी, ८ तीन चाकी, पूर्णपणे इलेक्ट्रिक चारचाकी १८, हायब्रिड चारचाकी ३ तर १ बस– अशी मॉडेल्स उपलब्ध आहेत.

■ मुंबई मेट्रोपॉलिटन रिजनल डेव्हलपमेंट (एमएमआरडीए) २५ हायब्रिड बसेस खरेदी करण्यासाठी १५ कोटी २५ लाख रुपयांचा निधी ■ इलेक्ट्रिक वाहनांच्या चार्जिंगवर संशोधनासाठी नाशिकच्या के.के. वाघ इन्स्टिट्यूट ऑफ इंजिनीअरिंग एज्युकेशन अँण्ड रिसर्च संस्थेला ९० लाख रुपयांचा निधी ■ स्वच्छ भारत अभियानाच्या यशस्वितेसाठी प्रदूषणमुक्त वाहतूक, लोकजागरण, कचरा पुर्नप्रक्रिया योजना तसेच कॅपिटल गूड सेक्टरमधील कचरा व्यवस्थापनावर एकूण १६६ कोटी रुपये खर्च.



मुंबईसह देशातील ११ शहरांमध्ये ३९० ई बसेस, ३७०– चारचाकी टॅक्सी व ७२० ई–रिक्षा मंजूर करण्यात आल्या आहेत. विशेष म्हणजे वाहनांचे चार्जिंग सेंटर्सही उभारण्यात आले आहेत.■ कॅपिटल गूड क्षेत्रासाठी पहिल्यांदाच २०१६ साली महत्त्वाची योजना सुरू करण्यात आली. कॅपिटल गूड क्षेत्राचे योगदान २०२५ पर्यंत १२ टक्क्यांवरून २० टक्क्यांवर नेण्याचा महत्त्वकांक्षी उपक्रम हाती घेण्यात आला. या क्षेत्रातील निर्यातीचा वाटा २७ टक्क्यांवरून ४० टक्क्यांवर नेला जाईल. आगामी काळात या क्षेत्रात कौशल्यपूर्ण मनुष्यबळासाठी प्रशिक्षण कार्यक्रम तसेच संशोधनावर भर देण्यात येणार आहे. ■ तंत्रज्ञान विकासासाठी एक्सलन्स सेंटर्सची स्थापना, कॉमन इंजिनिअरिंग फॅसिलिटी सेंटर, चाचणी व नोंदणी केंद्र स्थापण्यात आले आहेत. ■ वस्त्रोद्योग व वीज उद्योगावर विशेष लक्ष. ■ गेल्या १० ते पंधरा वर्षांपासून सातत्याने तोट्यात जाणाऱ्या पब्लिक सेक्टरमधील हिंदुस्तान केबल लिमिटेड, तुंगभद्रा स्टील प्लांट लिमिटेड, एचएमटी वॉचेस लि., एचएमटी चिनार वॉचेस लि., एचएमटी बिअरिंग लि. या कंपन्या बंद करण्यात आल्या आहेत.



**रामदास आठवले**

सामाजिक न्याय आणि सक्षमीकरण राज्यमंत्री

**सामाजिक न्याय या संकल्पनेचा आशय एका न्यायपूर्ण समाजाची स्थापना करण्याशी आहे. ज्यात सामाजिक-आर्थिक विषमता अल्प प्रमाणात असेल किंवा त्याचा लवलेशही असणार नाही. समाज सर्वसमावेशक असेल. संसाधनांचे वितरण सर्वसामान्य स्वीकृतीच्या आधारावर करण्यात आले असेल. याच कारणामुळे सामाजिक न्याय आणि सक्षमीकरण मंत्रालयाकडे एका वेगळ्या दृष्टीने पाहिले जाते. केंद्र सरकारला चार वर्षे पूर्ण होत असल्याच्या पार्श्वभूमीवर भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकरांच्या समतावादी विचारांचा प्रचार व प्रसार करण्यासाठी, सामाजिक न्याय विभागाला जास्तीत जास्त लोकाभिमुख करण्यावर भर देण्यात आला आहे.**

# सामाजिक न्याय आणि समन्वय

**रामदास आठवले**

केंद्र सरकारला २६ मे २०१८ ला चार वर्षे पूर्ण होत आहेत. या कार्यकाळामध्ये देशाला सामाजिक न्यायाच्या दिशेने घेऊन जाण्यामध्ये सामाजिक न्याय व सक्षमीकरण मंत्रालयाचे विशेष योगदान राहिले आहे. मुळातच सामाजिक न्याय ही नीतिमूल्यांवर आधारित संकल्पना खूप व्यापक आहे. त्या अंतर्गत 'सामान्य हित'च्या परिमाणाशी संबंधित सर्व काही येते. सामाजिक







न्याय मंत्रालयाचा मूळ उद्देश समाजात महिला, मागासवर्ग, विविध जाती समुदाय, अपंग, वृद्ध, शोषित-पीडित आणि अनाथ मुलांना समाजाच्या मुख्य प्रवाहात आणून सर्वसमावेशक समाजाची स्थापना करण्याचा आहे.

### गतिमान योजना

सामाजिक न्याय मंत्रालयाची मुख्य जबाबदारी देशामध्ये समानता प्रस्थापित करून शोषित, पीडित व्यक्तीला न्याय देण्याची तसेच त्यांना विकासाच्या मुख्य प्रवाहात आणण्याची आहे. या घटकांचा सामाजिक, आर्थिक, शैक्षणिक, सांस्कृतिक विकास करण्यासाठी हे मंत्रालय कार्य करते. भेदभावांच्या कक्षा दूर करून, त्यांना सामाजिक समतेच्या मुख्य प्रवाहात आणणे हा मुख्य उद्देश आहे. गेल्या अनेक वर्षांपासून प्रलंबित असलेल्या योजनांना आणि निर्णयांना कार्यान्वित करून, या विभागाला नवऊर्जा प्रदान करण्याचे काम मंत्रालयाने केले. केंद्र सरकारने सामाजिक न्यायाच्या दिशेने अनेक पावले उचललेली आहेत. नव्या धोरणांनुसार या मंत्रालयाने कात टाकत अनुसूचित जाती, अनुसूचित जमाती, इतर मागासवर्गीय, दिव्यांग व्यक्ती तसेच सफाई कामगारांसह इतर दुर्बल घटकांच्या कल्याणाच्या दृष्टीने स्टार्ट-अप व स्टँड-अप इंडिया, मेक इन इंडिया यांसारख्या योजना सरकारने सुरू केल्या व त्यांना गतिमान केले.

### स्टँड-अप इंडिया

अनुसूचित जाती-जमाती आणि वंचित समूहांच्या कल्याणासाठी स्टँड-अप इंडिया ही महत्त्वाची योजना आहे. ६ जानेवारी २०१६ रोजी केंद्र सरकारने या समूहामध्ये तसेच महिलांमध्ये उद्यमशीलता वाढवण्यासाठी या योजनेला मंजुरी दिली. ५ एप्रिल २०१६ रोजी प्रधानमंत्री नरेंद्र मोदी यांनी नोएडामध्ये एका वेब पोर्टलसोबत ही योजना सुरू केली.

**या योजनेची प्रमुख वैशिष्ट्ये :** ■ १०,००० कोटी रुपयांच्या प्राथमिक निधीसह भारतीय लघू उद्योग विकास बँक (सिडबी)द्वारे पुनर्वित्त खिडकीची स्थापना करणे. ■ राष्ट्रीय क्रेडिट गॅरंटी ट्रस्ट कंपनी लिमिटेड (एनसीजीटीसी)द्वारे एक कर्ज गॅरंटी यंत्रणेला सक्षम करणे.

■ सुविधा नसलेल्या क्षेत्रांपर्यंत बँक कर्ज, सुविधा प्रदान करण्यासाठी संस्थागत कर्ज संरचनेचा लाभ.

देशातील ८५ टक्के लोकसंख्येसाठी कार्यरत असलेल्या या विभागामार्फत अनुसूचित जाती, इतर मागासवर्गीय, वयोवृद्ध नागरिक, दिव्यांग, मद्यपान व्यसनाधीन, ट्रान्सजेंडर व्यक्ती, विमुक्त जाती व भटक्या जमाती, आर्थिकदृष्ट्या मागासवर्ग तसेच निराश्रितांसाठी अनेक योजना राबवल्या जातात. त्यापैकी विद्यार्थ्यांसाठी राबवण्यात येणाऱ्या काही महत्त्वाच्या योजना – ■ अनुसूचित जातीच्या मुलांसाठी मॅट्रिक पूर्व शिष्यवृत्ती. ■ अनुसूचित जातीच्या मुलांसाठी पोस्ट मॅट्रिक शिष्यवृत्ती. ■ विशेष केंद्रीय सहायता. ■ अनुसूचित जातीच्या मुलांसाठी राष्ट्रीय फेलोशिप ही योजना विद्यापीठ अनुदान आयोगाच्या माध्यमातून लागू करण्यात आली आहे. ■ अनुसूचित जातींच्या पात्र उमेदवारांच्या आर्थिक सक्षमीकरणासाठी राष्ट्रीय अनुसूचित वित्त विकास महामंडळ (एनएसएफडीसी), राष्ट्रीय मागासवर्ग वित्त विकास महामंडळ, ■ राष्ट्रीय सफाई कामगार वित्त विकास महामंडळ यांच्यामार्फत कर्ज देण्याची सुविधा.

## आंतरजातीय विवाहांवर विशेष भर

समता प्रस्थापित करण्यासाठी आंतरजातीय विवाहांना प्रोत्साहन दिले पाहिजे. आमच्या विभागाचा आंतरजातीय विवाहांवर विशेष भर आहे. देशभरामध्ये या संदर्भात कार्यालयीन बैठकांमधून या विषयाचा प्रचार आणि प्रसार करून आंतरजातीय विवाह प्रोत्साहन योजनेला सशक्त करण्याचे आवाहन केले आहे. आंतरजातीय विवाह करणाऱ्या जोडप्यांना आर्थिक मदत दिली जाते. या योजनेंतर्गत नवविवाहित आंतरजातीय दाम्पत्याला २.५० लाख रुपये प्रोत्साहन रक्कम दिली जाते.

## शिष्यवृत्तीमध्ये वाढ

विद्यार्थ्यांचे शालेय जीवन अत्यंत महत्त्वाचे असते. शिक्षणापासून कुणीही वंचित राहू नये, विशेषकरून अनुसूचित जातींच्या मुलांना आर्थिक टंचाईमुळे शिक्षण मध्येच सोडावे लागते. त्यांच्यासाठी सामाजिक न्याय विभागातर्फे देण्यात येणाऱ्या शिष्यवृत्तीमध्ये अधिक वाढ करण्याला प्राधान्य दिले आहे. या संदर्भात देशस्तरावर बैठक बोलावून, सर्व राज्यांना विद्यार्थ्यांच्या शिष्यवृत्ती वाटपाबाबत निर्देश दिले आहेत. प्रत्येक विद्यार्थ्याला थेट त्याच्या बँक खात्यामध्ये शिष्यवृत्ती जमा करण्याचा नवा निर्णय घेण्यात आला आहे. त्यामुळे देशातील लाखो विद्यार्थ्यांना फायदा होणार आहे.

अनुसूचित जाती घटक योजनेंतर्गत राज्यांना दिलेल्या निधीची या विभागातर्फे प्रथमच देखरेख (मॉनिटरिंग) करण्यास मंत्रालयाने सुरुवात केली आहे. अनुसूचित जातींसाठी ऋणवृद्धी हमी योजना, दारिद्र्यरेषेखालील जीवन जगणाऱ्या या समुदायाच्या आर्थिक विकासाला प्रोत्साहन देण्यासाठी सामाजिक न्याय विभाग आणि राष्ट्रीय अनुसूचित जाती आर्थिक व विकास महामंडळ यांच्यामध्ये करार करण्यात आला आहे.

## समतावादी मूल्य

देशामध्ये धर्म, जात, पंथ असा भेदभाव न करता समतावादी वातावरण निर्माण करण्यासाठी आणि जर अन्याय झाल्यास त्यावर दाद मागण्यासाठी अनुसूचित जाती व जमाती (अत्याचार निवारण) कायदा कार्यरत आहे. या संदर्भात देशभरातून या मंत्रालयात बैठक बोलावून संबंधित अधिकाऱ्यांकडून वरील विषयाबाबत माहिती मागविण्यात येते. प्रलंबित असणाऱ्या प्रकरणांना तत्काळ निवारण करण्याच्या सूचना दिल्या आहेत. देशामध्ये जातीयवादी भावना निर्माण होऊ नये, यासाठी विविधांगी जनप्रबोधनात्मक कार्यक्रमांचे आयोजन करण्याचे निर्देशही मंत्रालयाच्या वतीने दिले आहेत. भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी निर्माण केलेल्या भारतीय संविधानातील समतावादी मूल्य देशभरात रुजले पाहिजे आणि प्रत्येकाने गुण्यागोविंदाने देशात राहिले पाहिजे, यासाठी समतावादी विचारांच्या शिकवणीची गरज आहे. सर्वोच्च न्यायालयाने नुकताच एक निर्णय ॲट्रासिटी कायद्याविषयी दिला होता. सर्वोच्च न्यायालयाने या कायद्यांतर्गत तत्काळ अटक न करण्याचे आदेश दिले होते. त्यावर केंद्र सरकारला हस्तक्षेप करण्याची विनंती आम्ही केली होती. त्यानुसार या निर्णयावर पुनर्विचार याचिका सरकारतर्फे दाखल करण्यात आली आहे.



## दिव्यांग व्यक्तींसाठी आरक्षण

दिव्यांग व्यक्तींसाठी विधेयक पारित करून त्यांच्या आरक्षणात केलेली वाढ हा अलीकडील सामाजिक न्याय विभागाद्वारे घेतलेला महत्त्वपूर्ण निर्णय आहे. दिव्यांगांसाठी आता ४ टक्के आरक्षण करण्यात आले आहे. देशभरात २.६८ कोटी लोकसंख्या असलेल्या दिव्यांगांसाठी सामाजिक न्याय विभागात स्वतंत्र सचिव दर्जाच्या अधिकाऱ्यांची नेमणूक करण्यात आली आहे. यामुळे त्यांचे प्रश्न लवकर मार्गी लागायला सुरुवात झाली आहे. मंत्रालयाद्वारे दिव्यांगांना विविध साधनसामग्री पुरवली जाते. जसे कर्णबधिरांसाठी कर्णयंत्र, कृत्रिम हात, पाय व इतर यंत्रसामग्री दिली जाते. १७ सप्टेंबर २०१६ रोजी गुजरातच्या नवसारी येथे आयोजित कार्यक्रमात सामाजिक न्याय मंत्रालयातर्फे १०,३३० कर्णबधिरांना कर्णयंत्राचे मोफत वाटप करण्यात आले. पहिल्यांदाच इतक्या मोठ्या प्रमाणात यंत्रांचे वाटप करून, विभागाने मोलाचे काम केले आहे. यासह दिव्यांगांना सुगम्य वाटचाल करता यावी व त्यांना सर्वच सार्वजनिक ठिकाणी जाणेयेणे सहज व्हावे, यासाठी सुगम्य भारत अभियान ३ डिसेंबर २०१५ पासून राबवण्यात विभागाने महत्त्वाची भूमिका बजावली आहे.

**शब्दांकन : अजित पाटील, नवी दिल्ली. संपर्क : ०९८११६५९१४७**

# मेक इन इंडियातून संरक्षण सामग्री

नरेंद्रकुमार विसपुते



यंदाच्या केंद्रीय अर्थसंकल्पात देशाच्या संरक्षण क्षेत्रासाठी काही महत्त्वपूर्ण अशा नवीन योजनावर भर देण्यात आला आहे. यामध्ये संरक्षक सामग्रीच्या उत्पादन कारखान्यांचे जाळे (इंडस्ट्रिअल डिफेन्स डेव्हलपमेंट कॉरिडॉर), संरक्षण क्षेत्र उत्पादन धोरण–२०१८ आणि संरक्षण उत्पादनाशी संबंधित खासगी व सार्वजनिक उद्योगातील थेट परकीय गुंतवणुकींचा समावेश आहे. देशाला महासत्ता झालेले बघायचे असेल तर संरक्षण दलांच्या ताफ्यात, देशात निर्मित करण्यात आलेल्या संरक्षण सामग्रीला समाविष्ट केले पाहिजे. संरक्षण उपकरणे व सामग्रीसाठी संपूर्णपणे आयातीवर अवलंबून राहणे योग्य ठरणारे नाही. यामुळे देशांतर्गत संरक्षण उत्पादने आणि संरक्षण उद्योगांकडे दुर्लक्ष करून चालणार नाही. केंद्र सरकारच्या दीर्घकालीन धोरणात्मक नियोजनात या संरक्षक सामग्रीच्या उत्पादन कारखान्यांचे जाळे विणणे हा एक महत्त्वाचा भाग असून, यात सर्वच राज्यांना सहभागी करून घेतले जाणार आहे. आज जरी संरक्षण क्षेत्रातील एकूण खरेदीपैकी ४० टक्के सामग्री स्वदेशी बनावटीची बनत असली तरी अनेक महत्त्वाच्या आघाड्यांवर स्वदेशी उत्पादनाचे लक्ष्य गाठण्यात आपण यशस्वी झालो आहोत.

## देशांतर्गत उत्पादन वाढवण्यावर भर

संरक्षण क्षेत्रातील देशांतर्गत उत्पादन वाढावे यासाठी यंदाच्या अर्थसंकल्पात करण्यात आलेल्या साऱ्या तरतुदी म्हणजे मेक इन इंडिया या केंद्र सरकारच्या धोरणाचा पुढील टप्पा आहे असे म्हणायला हरकत नाही. देशातील संरक्षण सामग्री वाढली पाहिजे. त्यासाठी संरक्षण सामग्रीच्या उत्पादनावर भर देण्याचा मनोदय केंद्र सरकारने या वर्षाच्या अर्थसंकल्पात केला आहे.

केंद्र सरकारने यासाठी संरक्षण सामग्रीच्या उत्पादनाला वाहिलेले दोन टप्पे, इंडस्ट्रिअल डिफेन्स डेव्हलपमेंट कॉरिडॉर या धोरणाच्या माध्यमातून उभारण्याचे आश्वासन यंदाच्या अर्थसंकल्पात दिले आहे. यातून 'मेक इन इंडिया' हा महत्त्वाकांक्षी प्रकल्प संरक्षणक्षेत्राशी जोडला असल्याचे दिसून येते.

यामध्ये लघू, मध्यम उद्योगांना प्रोत्साहित करून, सुमारे ७० टक्के आयात होणारी संरक्षण क्षेत्रातील शस्त्रास्त्रे देशातच निर्माण करण्याचे प्रयत्न सुरू झाले आहेत. यामुळे संरक्षण क्षेत्राला चालना मिळतानाच देशात रोजगार निर्मितीलाही चालना मिळेल हे स्पष्ट आहे.

## राज्याची भूमिका


यंदाच्या केंद्रीय अर्थसंकल्पात संरक्षण क्षेत्रासाठी महत्त्वपूर्ण असे 'संरक्षण क्षेत्र उत्पादन धोरण–२०१८' आखण्यावर भर देण्यात आला आहे. यात राज्यांना सामावून घेतले जाणार आहे. त्यानुसार महाराष्ट्र राज्याच्या मंत्रिमंडळ बैठकीत केंद्राच्या या धोरणाला मान्यता देण्यात आली आहे. या धोरणानुसार महाराष्ट्रात पाच वर्षात २०० कोटी डॉलर गुंतवणूक केली जाणार असून, एक लाख रोजगार निर्मितीचे लक्ष्य ठेवण्यात आले आहे.



**डॉ. सुभाष भामरे**
केंद्रीय संरक्षण राज्यमंत्री

या संरक्षण धोरणांतर्गत महाराष्ट्रात संबंधित क्षेत्रांशी निगडित पुणे, नागपूर, अहमदनगर, नाशिक आणि औरंगाबाद या पाच ठिकाणी संरक्षणविषयक उत्पादनांची विशेष निर्मितीस्थळे (Defence Hub) स्थापन केली जातील. या क्षेत्रातील सूक्ष्म, लघू व मध्यम उद्योगांना भांडवलाची (Capital and Working Capital) समस्या राहू नये, यासाठी राज्य शासनामार्फत एक हजार कोटी रुपयांचा निधी (Corpus) उभा करण्यात येणार आहे. या निधीचे व्यवस्थापन व्यावसायिक फंडामार्फत केले जाईल. महाराष्ट्र राज्य शासनाच्या वतीने या फंडासाठी महाराष्ट्र औद्योगिक विकास महामंडळामार्फत अंशदान देण्यात येईल. तसेच संरक्षण क्षेत्रातील अनन्य (Unique)

**यंदाच्या केंद्रीय अर्थसंकल्पात संरक्षण क्षेत्रासाठी महत्त्वपूर्ण असे 'संरक्षण क्षेत्र उत्पादन धोरण–२०१८' आखण्यावर भर देण्यात आला आहे. महाराष्ट्र राज्याच्या मंत्रिमंडळ बैठकीत केंद्राच्या या धोरणाला मान्यता देण्यात आली. या धोरणानुसार राज्यात पुढील पाच वर्षात २०० कोटी डॉलर गुंतवणूक केली जाणार असून, एक लाख रोजगार निर्मितीचे लक्ष्य ठेवण्यात आले आहे.**



## माझगाव डॉक लिमिटेडची कामगिरी

देशात नौदलामध्ये निर्मिती केलेल्या पाणबुड्या व युद्धनौकांच्या संख्येत वाढ केली जात आहे. नौदल अधिक शक्तिशाली होत आहे. नौदलाकडे सध्या एक विमानवाहू जहाज– विक्रमादित्य– आहे. आणखी किमान एक विमानवाहू जहाज अनिवार्य असल्याने देशांतर्गत तयार होणारे विक्रांत हे विमानवाहू जहाज पुढील वर्षात उपलब्ध होणार आहे. पाणबुड्या व युद्धनौकांच्या निर्मितीत नजीकच्या काळात मुंबई येथील माझगाव डॉक लिमिटेडची महत्त्वाची भूमिका राहणार आहे. त्याच पार्श्वभूमीवर माझगाव



संरक्षक पाणबुडी 'कलवरी'

डॉक लिमिटेडने, सहा अणुऊर्जायुक्त पाणबुड्यांचे उत्पादन 'मेक इन इंडिया' योजनेंतर्गत सुरू केले आहे. गेल्या डिसेंबर महिन्यात त्यापैकी एक असलेली 'कलवरी' ही पाणबुडी संरक्षण ताफ्यात समाविष्ट झाली. या पाणबुडीचे वैशिष्ट्य म्हणजे स्टेल्थ बांधणी आणि नेमके लक्ष्यभेद करणारी यंत्रणा असणारी ही पाणबुडी, देशांतर्गत निर्मित असून पाणतीर तसेच क्षेपणास्त्रांच्या माध्यमातून; पाण्यातून भूपृष्ठावर आणि पाण्यातून पाण्यात असे शत्रूवर दुहेरी हल्ले करण्याची क्षमता तिच्यात आहे. पाण्यात राहून छुप्या पद्धतीने माहिती गोळा करणे, पाणसुरुंग पेरणे, शत्रूवर अस्त्रांचा अचूक छुपा पाणतीर हल्ला करणे इत्यादी यंत्रणांचा या पाणबुडीत समावेश करण्यात आला आहे. ही पाणबुडी खोल पाण्याखालून व कमीतकमी अडथळ्यातून प्रवास करते. या पाणबुडीनंतर आणखीन पाच स्कॉर्पिन पाणबुड्या माझगाव डॉकमध्ये फ्रान्सच्या साहाय्याने तयार होत आहेत. दुसरी 'आयएनएस खंदेरी' पाणबुडी या वर्षी, तिसरी 'करंज' पुढच्या वर्षी व बाकीच्या पाणबुड्या २०२०–२०२१ मध्ये नौदलात सामिल होणार आहेत.

४ वर्षे नवभारताच्या उभारणीची

गरजा लक्षात घेऊन प्रकल्पाच्या आवश्यकतेनुसार तपासणी आणि भांडार सुविधा यांच्यामध्ये वेगवेगळ्या ठिकाणी गुंतवणुकीस परवानगी असेल.

संरक्षण सामग्री निर्मिती करणाऱ्या पात्र उद्योगांना तालुका वर्गवारीनुसार सामूहिक प्रोत्साहन योजनेंतर्गत अधिकच्या एक टप्प्याची प्रोत्साहने मिळणार आहेत. त्यामुळे 'क' वर्गवारीतील तालुक्यास 'ब' वर्गाचे याप्रमाणे इतर सर्व वर्गवारीतील उद्योग घटकांना अधिकचे आर्थिक लाभ मिळणे शक्य होणार आहे. राज्यातील 'अ' आणि 'ब' प्रवर्ग क्षेत्रामध्ये किमान २५० कोटी स्थिर भांडवली गुंतवणूक असलेल्या किंवा किमान ५०० व्यक्तींना रोजगार मिळवून देणाऱ्या उद्योगांना, तसेच राज्याच्या इतर क्षेत्रामध्ये किमान १०० कोटी भांडवली गुंतवणूक असणाऱ्या किंवा २५० व्यक्तींना रोजगार देणाऱ्या अवकाश आणि संरक्षण उद्योग घटकांना; विशाल प्रकल्पाचा (मेगा प्रोजेक्ट) दर्जा देण्यात येणार आहे. या धोरणांतर्गत राज्य शासनाकडून देण्यात येणारी प्रोत्साहने ही केंद्र शासन किंवा त्यांची कोणतीही यंत्रणा किंवा स्थानिक प्राधिकरणामार्फत देण्यात येणाऱ्या प्रोत्साहनांव्यतिरिक्त असतील.

अवकाश आणि संरक्षण क्षेत्रात स्वयंपूर्णत्वासाठी देशाकडून महत्त्वाची भूमिका बजावली जात आहे. पुढील पाच वर्षात या क्षेत्रावरील खर्च ९० हजार कोटी ते एक लाख दहा हजार कोटी रुपयांच्या दरम्यान असेल. या क्षेत्रातील वृद्धीच्या प्रचंड क्षमतेमुळे अनेक मोठे जागतिक उद्योग देशात गुंतवणूक करण्यासाठी आकर्षित होतील.

या औद्योगिक समूह निर्मितीसाठी पोषक वातावरण तयार करण्यासाठी संबंधित प्रणेते उद्योगांची (Anchor Units) महत्त्वाची भूमिका आहे. या धोरणांतर्गत प्रणेते उद्योगांसारख्या घटकांचा प्राधान्याने विचार करण्यात आला आहे. त्याचप्रमाणे या धोरणाच्या माध्यमातून संरक्षण क्षेत्रातील सार्वजनिक उपक्रमातील कंपन्यांबरोबर संयुक्त सहभागाने उद्योग घटकांच्या स्थापनेसाठी विशेष साहाय्य, आर्थिक प्रोत्साहने, मुद्रांक शुल्क परतावा, औद्योगिक शहरांची निर्मिती, सामाईक सुविधांची उभारणी आणि संबंधित कायद्यांचे सुलभीकरण आदी बाबींबर भर देण्यात येणार आहे.

### संरक्षण सामग्रीची सद्य:स्थिती

देशाची १५ हजार किमीची भूसीमा ही विविध राष्ट्रांशी जोडलेली आहे. तेथील संरक्षण ही दलांपुढील महत्त्वाची जबाबदारी आहे. दहशतवाद हा संरक्षण दलाच्या दृष्टीने महत्त्वाचा प्रश्न आहे. ७५०० किमी. सागरी सीमेचे संरक्षण आणि त्याचबरोबर जलवाहतुकीला संरक्षणाची जबाबदारी हे नौदलासमोर आव्हान आहे. मुंबई येथील नौदलाच्या पश्चिम विभागाची कामगिरी महत्त्वाची आहे. नवीन आंतरराष्ट्रीय आघाडीतील देशाचे अग्रस्थान हे देशाच्या दृष्टीने संरक्षणाशी संबंधित आव्हान आहे. या सर्वच आव्हानांना सामोरे जाण्यास आपली संरक्षण दले समर्थ आहेत. यासाठी त्यांना आवश्यक असणाऱ्या सशस्त्र युद्धनौका, विमाने, रणगाडे, तोफा अद्ययावत सॉल्ट रायफल्स, आधुनिक नाईटव्हिजन डिव्हायसेस, हलकी बुलेटप्रुफ जॅकेट, हेल्मेट व बूट आदी लष्कराच्या तातडीच्या गरजा आहेत. टी–७२, टी–९० आणि अर्जुन रणगाड्यांसारख्या आधुनिक सामग्रीची आज आवश्यकता आहे. बोफोर्स तोफांनंतर नवी तोफांची खरेदी करायची आहे. वायुदलात रफाल विमानांसाठी फ्रान्सशी केलेल्या करारानंतर काही आधुनिक विमाने निकट भविष्यात मिळणार आहेत. तेजस विमानांच्या देशातील होणाऱ्या निर्मितीचा वेग वाढणे आवश्यक आहे.

**जनसंपर्क अधिकारी, संरक्षण मंत्रालय, मुंबई.**
**संपर्क: ०९९६९०४८४९१**


# महामानवाचे राष्ट्रीय स्मारक... नवी दिल्ली

**नवी** दिल्लीतील अलीपूर रोडवरील भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या राष्ट्रीय स्मारकाचे उद्‌घाटन प्रधानमंत्री नरेंद्र मोदी यांच्या हस्ते बाबासाहेबांच्या जयंतीच्या पूर्वसंध्येला (१३ एप्रिल २०१८) करण्यात आले. या स्मारकाची रचना एखाद्या ग्रंथाप्रमाणे करण्यात आली आहे. हा ग्रंथ म्हणजे आपल्या देशाची घटना आहे. स्मारक परिसरात प्रदर्शन व आधुनिक तंत्रज्ञानाने सुसज्ज वस्तुसंग्रहालयाची निर्मिती करण्यात आली आहे. डॉ. बाबासाहेबांच्या जीवनातील महत्त्वाचे टप्पे समजून घेण्याची येथे सुविधा आहे. डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्याशी संबंधित असलेल्या पाच स्थानांचा ‘पंचतीर्थ’ म्हणून विकास करण्यात येत आहे. हे स्मारक त्यापैकीच एक आहे.












BHOOMI SPARSH









**केंद्रात निर्विवाद बहुमत घेऊन सत्तारूढ झालेल्या नरेंद्र मोदी सरकारने भ्रष्टाचार नेस्तनाबूत करणे, लोकांचे प्रश्न सोडवणे आणि सर्वात महत्त्वाचे म्हणजे विकासाला चालना देणे या दृष्टिकोनातून अनेक नावीन्यपूर्ण पावले उचलली. चाकोरीबद्ध मार्गाने न जाता नवीन मार्ग निर्माण केले.**




# विकासाची नवी चाहूल

**डॉ. विनय सहस्त्रबुद्धे**

नवीन शोधाला काही मर्यादाच नसतात. अधिक नेमक्या शब्दात बोलायचे तर मानवी संस्कृतीची प्रगती हा नवनवीन शोधांचाच इतिहास आहे. असे म्हटले जाते की, अंधार म्हणजे उजेडाचा अभाव नसतो. तर तो प्रकाशाचे मार्ग शोधण्याच्या बाबतीत असलेल्या आपल्या इच्छेचा किंवा उत्साहाचा अभाव असतो. कोणत्याही, कितीही विक्राळ समस्येबाबतही तेच म्हणता येईल. कोणताही प्रश्न म्हणजे उत्तरांचा अभाव नसतो तर तो कल्पना दारिद्र्याचा परिपाक असतो. कारण शेवटी कल्पना याच कोणत्याही शोधाच्या जनक असतात. त्यांच्यासाठी पोषक वातावरण निर्माण करून त्यांचे स्वागत करायला हवे! त्यासाठी महत्त्वाचा घटक असतो तो म्हणजे कोणत्याही 'यथास्थितीच्या किंवा इंग्रजीत म्हणायचे तर 'स्टेटस को'च्या आरामातच रमण्याच्या मानसिक स्थितीलाच पहिले आव्हान देणे. 'स्टेटस को'चे आकर्षण अत्यंत घातक असते. कारण ते नव्या विचारांचे वारे जवळपास फिरकूही देत नाही. त्यामुळे नवीन काही सुचणे तर दूरच राहते.

इंग्रजीत 'आऊट ऑफ बॉक्स' असा एक शब्द प्रयोग आहे. त्याचाही संबंध नव्या विचारांशी, नवकल्पनांशी आणि त्यातून अर्थातच येणाऱ्या ताजेपणाशीच आहे. हा जो नवकल्पनांचा ताजेपणा असतो त्याच्यातच हिंमत असते 'कालच्या पानावरून तसंच पुढे' किंवा 'रोज रोज त्याच पाट्या टाकणे' या भूमिकेला आव्हान देण्याची व त्यातूनच नवकल्पना, नवीन शोधांच्या माध्यमातून आमूलाग्र परिवर्तन घडवून आणण्याची!

लोक नवीन शोध का लावतात हे जाणून घेणे जेवढे महत्त्वाचे आहे तितकेच, किंबहुना त्यापेक्षाही जास्त महत्त्वाचे व विचारास प्रवृत्त करणारे हे आहे की, लोक नवीन शोध का लावत नाहीत हे जाणून घेणे! खरे तर गंभीर समस्यांसाठी सोपे उपाय हे कुणाला सुचतच नाहीत असे नाही. पण अनेकदा लोक आपली ही नवकल्पनांची, नवोन्मेशशाली बुद्धीची खिडकी बंदच करून घेऊन, अशा उपायांकडे पाठ फिरवतात. कारण 'यथास्थिती' किंवा 'स्टेटस को' कायम राखण्यातच त्यांचे हितसंबंध गुंतलेले असतात.

### नवोन्मेषशाली सरकार

खूप वर्षांनी भारताला आता असा प्रधानमंत्री नरेंद्र मोदींच्या रूपाने लाभला आहे जो निरलस विकासाचे मूर्तिमंत प्रतीक आहे. हा असा नेता आहे. ज्याचा स्वतःचा, स्वतःच्या लाभासाठीचा काही स्वार्थी कार्यक्रमच नाही. त्यांची तशी काही इच्छाच नाही. त्यामुळे स्वाभाविकपणे, ते राजकीय नेतृत्वात हल्ली अभावानेच दिसत असलेल्या 'आली अंगावर घेतली शिंगावर'च्या धाडसी भूमिकेतून 'स्टेट्स को' ठेवण्याच्या वृत्तीलाच आव्हान देताना दिसत आहेत. त्यांची ही धाडसी भूमिका आणि वज्र-निर्धार यामुळे मोदी सरकार चाकोरीच्या बाहेर जाऊन किंवा दुसऱ्या शब्दात सांगायचे तर 'आऊट ऑफ बॉक्स' विचार करताना, निर्णय घेताना दिसते आहे. त्यामुळेच या सरकारच्या गेल्या तीन वर्षांच्या कार्यकाळात प्रशासनात जितके नवीन बदल केले गेले. त्यामुळे हे सरकार हे सर्वात नवोन्मेषशाली सरकार ठरले आहे, असे ठामपणे म्हणता येईल.

गंमत म्हणजे ही नवीन शोधांची, नव-सृजनाची सवय सांसर्गिक असते. एकाने नवीन शोध लावला किंवा नवीन काही केले की, त्यातून दुसऱ्याला प्रेरणा मिळते आणि जेव्हा या अशा नवीन शोधांना प्रोत्साहन दिले जाते तेव्हा मग चाकोरी सोडून वेगळे, अधिक चांगले काही करणे हीच संस्कृती बनते.

## वैविध्यपूर्ण उपक्रम

या पार्श्वभूमीवर मोदी सरकारने शोधून काढून अमलात आणलेल्या १७ प्रमुख शोधांकडे किंवा उपक्रमांकडे बघायला हवे. 'मन की बात'पासून ते 'माय गव्हर्नमेंट'पर्यंतचे मोदी सरकारचे १७ उपक्रम असे आहेत जे आपल्या देशात पहिल्यांदाच होत आहेत असे निश्चितपणे म्हणता येईल.

हे उपक्रम अत्यंत वैविध्यपूर्ण आहेत. नीती आयोग, परदेशस्थित भारतीयांचे 'इंडिया डेव्हलपमेंट फाऊंडेशन', दलितांसाठीचा 'व्हेन्चर कॅपिटल फंड' किंवा 'इन्व्हेस्ट इंडिया' ही सारी संस्थात्मक शोधांची उदाहरणे आहेत. 'प्रगती' (PRAGATI) किंवा 'जेम' (GeM) हे कारभारात अधिक पारदर्शिता व उत्तरदायित्व आणण्याच्या सुस्पष्ट हेतूने सुरू करण्यात आलेले व्यावहारिक किंवा रोजच्या कारभाराशी निगडित असे उपक्रम आहेत. 'एक भारत-श्रेष्ठ भारत' किंवा 'आंतरराष्ट्रीय योग दिवस' हे आपल्या संस्कृतीचा गौरव करण्याच्या दृष्टीने सुरू करण्यात आलेले उपक्रम आहेत, तर 'भीम ॲप', 'उज्ज्वला' आणि 'उजाला' या योजनांमध्ये सामाजिक न्यायाची प्रभावी अंमलबजावणी करण्याचा हेतू अंतर्भूत आहे. याव्यतिरिक्त काही नवे उपक्रम हे तंत्रज्ञानाचा प्रभावी वापर करणारे आहेत. जसे की अवकाश तंत्रज्ञानाचा प्रशासनासाठी, विशेषतः पायाभूत सुविधांच्या विकासासाठी वापर, तसेच 'स्मार्ट इंडिया हॅकेथॉन' व लोकांच्या समस्या निवारणासाठी सोशल मीडियाचा वापर इत्यादी. एक गोष्ट मात्र निश्चित. प्रधानमंत्र्यांचाच शब्द वापरायचा तर हे सारे नवोन्मेषशाली उपक्रम हे नागरिकांचे जीवन अधिक आरामदायी, सुखकर बनवण्याच्या उद्देशाने सुरू करण्यात आलेले आहेत. हे सर्व शोध...ज्याला आता इंग्रजीत 'इनोव्हेशन' नव्हे तर 'गव्हर्नो व्हेशन' Governnovations असे म्हटले जाते ते एकाच गोष्टीची खात्री देतात ती म्हणजे मोदी सरकारमध्ये अशा नवीन कल्पनांना, शोधांना प्रोत्साहन दिले जाते व त्यांची पूर्ण प्रामाणिकपणाने, तळमळीने अंमलबजावणी केली जाते.

## वेगळी वाट

भारतासारख्या देशात अशा नवीन शोधांना प्रशासनात स्थान, चालना देण्याला दोन महत्त्वाची परिमाणे प्राप्त होतात. पहिले म्हणजे, एक समाज म्हणून आपण अशा नवीन विचारांना ज्याला बोली भाषेत 'जुगाड' असा शब्द प्रचलित आहे त्यापासून एक पाऊल पुढे नेणे गरजेचे असते. 'जुगाड' हे वाईट नसते. 'जुगाड' या शब्दातून प्रतीत होते ती आपल्या अंगभूत शहाणपणातून कोणत्याही समस्येवर उपाय शोधण्याची विलक्षण क्षमता! पण हा मूळ अर्थ गेल्या काही वर्षांपासून झाकोळला गेला आणि आता त्याला एक वेगळाच वाईट अर्थ असा प्राप्त झाला आहे की 'जुगाड' म्हणजे कायदे मोडून किंवा सगळ्या व्यवस्थेलाच वेठीशी धरून अडथळ्यातून मार्ग काढणे. आता मोदी सरकारने खऱ्या 'जुगाड'ला प्रतिष्ठा प्राप्त करून दिल्याने, हा विपरीत 'जुगाड' आता थांबेल व कोणत्याही समस्येसाठी स्थायी, सन्मानजनक व प्रचलित करता येतील, असे उपाय शोधण्याच्या प्रामाणिक इच्छेला, तळमळीला अधिक वाव मिळेल अशी आशा करायला हरकत नाही.

दुसरे म्हणजे प्रशासनातील नवे उपक्रम, शोध तेव्हाच प्रभावी ठरतात जेव्हा ते या व्यवस्थेला फळ देण्यास, विकासाची गंगा 'नाही रे' वर्गापर्यंत पोहोचवण्यात यशस्वी ठरतात. व्यवस्थेला ही फळं देण्यास भाग पाडण्याची ही तीव्र इच्छा अविकसित, अभागी जिवांप्रति असलेल्या संवेदनेतून जन्म घेते. त्यामुळे स्वाभाविकच ज्या शोधांमुळे गरीब व अभागी वर्गाला अधिक फायदा झाला त्या शोधांकडे अधिक लक्ष देणे गरजेचे आहे. त्या दृष्टीनेही प्रशासनात अमलात आणल्या गेलेल्या नवीन शोधांचे, सुरू करण्यात आलेल्या उपक्रमांचे दस्तवेजीकरण महत्त्वाचे ठरते. मात्र अर्थातच इनोव्हेशन (Innovation) या शब्दाचा शब्दकोशातील अर्थ बघितला तर लक्षात येईल की 'इनोव्हेशन' म्हणजे नवीन गोष्टी, कल्पना किंवा नवीन उपक्रम. 'इनोव्हेशन' म्हणजे 'रिफॉर्म्स' किंवा सुधारणा नाही. 'रिफॉर्म्स' किंवा सुधारणांना नवीन शोधांची फार तर नांदी म्हणता येईल, त्याकडे वेगळे लक्ष द्यावे लागेल!



• नवे विचार, नव्या आशा, नव्या दिशा

**अनुवाद : जयश्री देसाई**

(खा. डॉ. विनय सहस्त्रबुद्धे यांचा संपर्क: ०९८२१०६६२८१)

**मीनाक्षी लेखी**

# महिला शक्ती, राष्ट्रशक्ती

आपल्या देशात महिलांनी आतापर्यंत जी वाटचाल केली आहे ती थक्क करणारी आहे. विशेषकरून नरेंद्र मोदी हे प्रधानमंत्री झाल्यानंतर त्यांचा अगदी छोट्या-मोठ्या गोष्टीत महिलांना समान स्थान देण्यावर कटाक्ष आहे. 'आपले नवभारताचे जे स्वप्न आहे त्या नवभारतातील महिला या सक्षम, सबल व देशाच्या अष्टपैलू विकासात पुरुषांच्या खांद्याला खांदा लावून काम करणाऱ्या असतील,' असे प्रधानमंत्री नरेंद्र मोदी यांनी अलीकडच्या 'मन की बात' कार्यक्रमात सांगितले आहे. हा केवळ बोलघेवडेपणा आहे असे समजू नका. यात खरोखर प्रधानमंत्री यांच्या मनात, देशातील लाखो महिलांच्या आशा-आकांक्षांचा विचार सतत सुरू आहे हेच दिसून येते. महिलांनी विकासाच्या प्रक्रियेत केवळ सहभागीच व्हावे असे नव्हे, तर त्यांनी विकासाच्या क्रांतिकारी पथावर नेतृत्वही करावे, अशी प्रधानमंत्री यांची अपेक्षा आहे. त्यांना भारतीय महिलांच्या ताकदीची पूर्ण जाणीव आहे म्हणूनच त्यांची ही अपेक्षा अनाठायी नाही असे वाटते.

सामाजिक व आर्थिक स्थित्यंतरे ही केवळ महिला आर्थिकदृष्ट्या स्वतःच्या पायावर उभ्या असतील तरच शक्य असतात. त्यामुळे त्यांना स्वतःचे पर्याय स्वतः निवडण्याचे स्वातंत्र्य मिळते. त्यामुळे कुठलीही महिला तिच्या, मुलांच्या आणि कुटुंबाच्या हिताचे निर्णय स्वतः घेऊ शकते. त्यातून तीच नव्हे तर सगळे कुटुंब, सगळा समाज पुढे जातो, हा आजवरचा सार्वत्रिक अनुभव आहे. महिला आता अनेक माध्यमांतून स्वतःच्या पायावर उभ्या राहत आहेत. त्यात स्वमदत गट व इतर केंद्रे यांसारखे उपक्रम उल्लेखनीय आहेत.

## प्रधानमंत्री मुद्रा योजना

२०१५ मध्ये प्रधानमंत्री मुद्रा योजना जाहीर झाली, त्यात महिला उद्योजकांना २.१ लाख कोटींची कर्जे वाटण्यात आली. त्याचा लाभ ७.८८ कोटी महिला उद्योजकांना झाला. मुद्रा योजनेत एकूण ७६ टक्के महिलाच कर्ज-लाभार्थी असल्याने मुद्रा योजना महिलांसाठी भाग्यविधाती ठरली. त्यामुळे त्यांच्या उद्यमशील उपक्रमातील आर्थिक अडथळे दूर झाले. त्यांनी यातून उद्योग सुरू केले आणि स्वतःचे नशीब स्वतः घडवले; यापेक्षा चांगले काय असू शकते. मुद्रा योजना महिलांसाठी वरदान ठरली आहे. पण त्यामुळे सामाजिक स्थित्यंतरेही घडून आली आहेत, जी सहज आपल्या नजरेत भरणार आहेत हे पुढील उदाहरणांवरून स्पष्ट होते. कृष्णादेवी ही पठाणकोटची महिला, वय वर्षे ६०. तिला तिच्या मुलांवर पैशासाठी अवलंबून राहायचे नव्हते. तिला आत्मसन्मान कायम ठेवायचा होता.



महिला सक्षमीकरणासाठी प्रधानमंत्री मुद्रा योजनेंतर्गत महिलांना स्वतःचा उद्योग व्यवसाय उभारणीस प्रोत्साहन, तसेच स्टॅण्ड अप इंडिया योजनेंतर्गत १० लाख ते १ कोटी रुपयांपर्यंतची कर्जे देण्यात आली. एकंदर ३८,४७७ कर्ज प्रकरणांत ८१ टक्के वाटा हा महिलांचा आहे. जनधन योजनेत १६ कोटी महिला लाभार्थी ठरल्या त्यामुळे आर्थिक सर्वसमावेशकता वाढली. कौशल्य हमीतून रोजगार हमी असा हा प्रवास आहे. 'कौशल्यपूर्ण भारत'चा फायदा १.०४ कोटी जणांना झाला आहे. पहिल्याच वर्षांत ज्यांना लाभ मिळाला त्यात ४० टक्के महिला आहेत. ही आकडेवारी पाहता महिला सक्षमीकरणासाठी जाणीवपूर्वक प्रयत्न करण्यात येत असल्याचे दिसत आहे.

तिने चादरी (बेडशीट) विकण्याचा व्यवसाय सुरू केला. त्यासाठी मुद्रा योजनेतून तिला पाच लाखांचे कर्जही मिळाले. आज ती मुलांवर ओझे बनून राहिलेली नाही. चंद्रलेखा ही अशीच एक तरुणी, त्याच शहरातली. तिला मुद्रा योजनेतून आरोग्य साधनांचा व्यवसाय विस्तारण्यासाठी तीन लाखांचे कर्ज मुद्रा योजनेतून मिळाले. आता तिने स्वतःचे दुकान थाटले आहे, एरवी तिला पायपीट करून घरोघरी जाऊन उत्पादने विकावी लागत असत. उत्तर प्रदेशच्या मुजफ्फरनगरची ऊर्मिला.. ती रिक्षा चालवून रोजीरोटी कमावत होती, पण आता तिने मुद्रा योजनेंतर्गत घेतलेल्या कर्जातून स्वतःची रिक्षा घेतली आहे. दुसरी लुधियानाची नवउद्योजक महिला तिने

कपड्यांचा उद्योग एका शिवणयंत्रावर सुरू केला, आता तिच्याकडे आठ शिवणयंत्रे आहेत. हा बदल घडला तो मुद्रा योजनेंतर्गत घेतलेल्या कर्जातून! अनुसूचित जातीजमातीच्या महिलांना या सक्षमीकरणाच्या योजनेतून दूर ठेवलेले नाही. त्यांना भांडवल मिळालेले आहे.

## महिलांचा सहभाग

स्टॅण्ड अप इंडिया योजना २०१६ मध्ये राबवण्यात आली. त्यात १० लाख ते १ कोटी रुपयांपर्यंतची कर्जे देण्यात आली. एकंदर ३८,४७७ कर्ज प्रकरणांत ८१ टक्के वाटा महिलांचा आहे. रश्मी तशी धडपडणारी, सतत काही तरी नवीन करण्यास उत्सुक असलेली उद्योजक. तिने स्टॅण्ड अप इंडिया योजनेत १० लाखांचे कर्ज घेतले व मोठे मॉल, चित्रपटगृहे यांना व्हेण्डिंग मशीन पुरवण्याचा उद्योग सुरू केला. नंतर अनेक शहरांत तिचा हा उद्योग विस्तारत गेला. हे सगळे घडले ते स्टॅण्ड अप इंडिया योजनेतून. या योजनेमुळे ती उभीच राहिली नाही, तर तिने झेप घेतली. केवळ आर्थिक स्वातंत्र्य या एकाच उद्देशाने प्रेरित झालेल्या या महिला होत्या असेही म्हणता येणार नाही, कारण स्वत:चे उद्योग सुरू करताना त्यांनी रोजगारनिर्मितीही केली. त्यांच्यामुळे अनेक महिलांना रोजगार मिळाले. उद्यमशीलता व आर्थिक स्वातंत्र्य या महिलांसाठी संधीच्या दोन खिडक्या आहेत. अनेक महिला आता कार्यकुशल मनुष्यबळात सामील होत आहेत. काही महिला दुसऱ्या शहरात काम करायला जात आहेत. त्यांनी घराचाच नव्हे तर शहराचा उंबरठा ओलांडला आहे. गरीब कुटुंबांना स्वयंरोजगार व रोजगार संधी हे दारिद्र्याच्या खाईतून बाहेर काढणारे दोन मार्ग आहेत. आजीविका योजनेत स्वयंदत गटांना उपजीविका संधीसाठी कर्ज दिले आहे. या गटांमध्ये महिलांचे कर्ज २०१६-१७ मध्ये ४२५०० कोटी आहे, त्यातील वाढ गेल्या वर्षीच्या तुलनेत ३७ टक्के आहे. आर्थिक सर्वसमावेशकता, आर्थिक स्वातंत्र्य हे एकमेकांशी निगडित घटक आहेत. आर्थिक सर्वसमावेशकतेशिवाय आर्थिक स्वातंत्र्य असू शकत नाही. जनधन योजनेत १६ कोटी महिला लाभार्थी ठरल्या. त्यामुळे आर्थिक सर्वसमावेशकता वाढली. शून्य शिल्लक असलेल्या खात्यांची संख्या केवळ वीस टक्के उरली. या महिला याच खात्यांच्या मदतीने भरारी घेत आहेत. अलीकडच्या जगात नुसत्या पुस्तकी शिक्षणावर रोजगार मिळत नाही त्याला कौशल्यांची जोड लागते. त्यामुळे कौशल्य हमीतून रोजगार हमी असा हा प्रवास आहे. 'कौशल्यपूर्ण भारत'चा फायदा १.०४ कोटी जणांना झाला आहे. पहिल्याच वर्षांत ज्यांना लाभ मिळाला त्यात ४० टक्के महिला आहेत. महिलांना रीतसर व्यावसायिक प्रशिक्षण कधीच दिले गेले नव्हते. ते मोदी सरकारच्या काळात सुरू झाले. कौशल्यपूर्ण भारत हे रोजगार संधी आणि भरभराटीचे भव्य प्रवेशद्वार आहे. रोजगाराला उत्तेजन देणे ठीकच, पण केवळ फुटकळ रोजगार काय कामाचे. त्यामुळे महिलांना संघटित क्षेत्रात रोजगार क्षेत्रात संधी मिळाव्यात यासाठी प्रयत्न करण्यात आले. महिलांच्या हातात पडणारे पैसे जास्त असले पाहिजेत यासाठी १९५२च्या कर्मचारी भविष्य निर्वाह निधी कायद्यात सुधारणा करण्यात आल्या. यात महिलांचे कर्मचारी भविष्यनिर्वाह निधीतील योगदान पहिल्या तीन वर्षांत ८ टक्के करण्यात आले. सध्या त्यांना १२ टक्के किंवा १० टक्के योगदान द्यावे लागत होते. आता त्यांच्या हातात थोडे जास्त पैसे खेळणार आहेत.



स्टॅण्डअप इंडिया

## महिला सक्षम, कुटुंब सक्षम

महिलांच्या या प्रगतीचा आयाम बँक खाती ते भरभराटीस आलेले उद्योग, रोजगार ते उद्योजक असा साहसी वळणे घेत पुढे जात आहे. आर्थिक सर्वसमावेशकतेकडून आपण आर्थिक स्वावलंबन किंवा स्वातंत्र्याकडे वाटचाल केली आहे. मोदी सरकारने महिलांच्या सक्षमीकरणासाठी अनेक योजना आखल्या. त्यामुळे महिलांच्या सक्षमीकरणाबरोबरच आता नवभारताला नारी शक्तीचे पंख लाभले आहेत. तिच्यात उडण्याची ताकद होती, पण तिला कुणी पंख देत नव्हते ते आम्ही दिले, तिच्या आशाआकांक्षा केवळ फुलवल्याच नाहीत तर तिच्या स्वप्नांना आर्थिक बळ दिले. प्रधानमंत्री नरेंद्र मोदी यांनी असे म्हटले होते की, 'जर आपण कुटुंबातील महिलेला सक्षम केले तर सगळे कुटुंब सक्षम होईल. आपण महिलांना शिक्षण दिले तर सगळे कुटुंब शिक्षित होईल. आपण तिचे आरोग्य जपले तर कुटुंबाचे आरोग्य आपोआप राखले जाईल. जर आपण तिचे भवितव्य सुरक्षित केले तर सगळ्या घराचेच भवितव्य सुरक्षित होईल.' प्रधानमंत्र्यांनी त्यांच्या शब्दांना कृतीची जोड देत महिलांसाठी बऱ्याच योजना आणल्या आहेत. त्यांचे सक्षमीकरण हा नवभारताचा महत्त्वाचा मूलमंत्र आहे. त्यांच्या या प्रयत्नांना महिलाही तेवढीच तोलामोलाची साथ देत आहेत. त्यामुळे 'शब्द बापुडे केवळ वारा' अशी परिस्थिती राहिलेली नाही. सामाजिक पातळीवर महिलांची स्थिती बदलते आहे. स्वयंपूर्ण महिलांची ही फळी नवभारताचे स्वप्न साकार करण्यात मोठी भूमिका पार पाडेल, यात काही शंका नाही. (साभार : लोकसत्ता)

**लोकसभा सदस्य**

# उंचावलेली प्रतिमा

**परराष्ट्र मंत्रालयाची मदतीसाठीची तत्परता देश-विदेशी नागरिकांनी वेळोवेळी अनुभवली आहे. नागरिकांना केंद्रस्थानी ठेवून सेवा देणारा विभाग अशी ओळख निर्माण करण्यात परराष्ट्र मंत्रालयाला यश आले आहे. परराष्ट्र मंत्री सुषमा स्वराज यांच्या दूरदृष्टीमुळे हे घडून आले. त्यांच्या मार्गदर्शनाखाली विविध निर्णायक पावले उचलण्यात आली. यामुळे देश-विदेशातील भारतीय नागरिकांना हे मंत्रालय आपलेसे वाटू लागले आहे. त्यांच्यामध्ये एक जिव्हाळ्याचे नाते निर्माण झाले आहे.**

**डॉ. ज्ञानेश्वर मुळे**

परराष्ट्र मंत्रालय आणि आपला काही विशेष संबंध नाही असा समज अनेक नागरिकांचा असायचा. परंतु आता चित्र बदलतेय. बदल घडतोय. खरे पाहता सर्वसामान्यांचा अनेक अर्थाने या मंत्रालयाशी संबंध येतो. थोडक्यात सांगायचे झाले तर देशाबाहेर जाणाऱ्या प्रत्येक नागरिकाला पासपोर्टसाठी तर आपल्या देशाला भेट देणाऱ्या प्रत्येकाला व्हिसासाठी परराष्ट्र मंत्रालयाच्या सेवेचा उपयोग करावा लागतो. जग जसजसे जवळ येत आहे तसतसे या मंत्रालयाचे महत्त्व वाढत आहे. देश-विदेशातील नागरिकांसोबत जिव्हाळा निर्माण करण्यात या मंत्रालयाला यश आले आहे. हे मंत्रालय भारतीय वंशाचे विदेशी नागरिक तसेच कामानिमित्त विदेशात राहणाऱ्या तीन कोटींहून अधिक जनतेचे आशास्थान बनले आहे. देश एक विशाल कुटुंब आहे. २०८ देशांमध्ये पसरलेल्या आपल्या कुटुंबातील सदस्यांची काळजी वाहणारा आणि त्यांना जोडणारा दुवा म्हणजे परराष्ट्र मंत्रालय.

## सदैव मिशन मोडमध्ये

गेल्या चार वर्षांत या मंत्रालयाने नागरिकांच्या मदतीसाठी अनेक उपाययोजना केल्या आहेत.

पासपोर्ट-व्हिसा मिळवण्याची प्रक्रिया असो की परदेशात अडकलेले नागरिक असो अथवा अनिवासी भारतीय जोडीदारासोबतच्या फसव्या विवाहाला बळी पडलेली महिला असो या सर्वांच्या मदतीसाठी विभाग तत्परतेने धावून गेला. त्यांना युद्धपातळीवर मदत केली. हे मंत्रालय नेहमी 'मिशन मोड'मध्ये काम करत असल्यामुळे अनेक ऐतिहासिक घटनांचा जन्म झाला. त्यामुळे या विभागाच्या ऐतिहासिक कामगिरीचा थोडक्यात आढावा घेणे क्रमप्राप्त ठरते.



दुबई येथे 'मदद' पोर्टलची घोषणा करताना प्रधानमंत्री नरेंद्र मोदी

## 'मदद' पोर्टल

फेब्रुवारी २०१५ मध्ये लोकार्पण करण्यात आलेल्या 'मदद' (madad.gov.in) या पोर्टलमुळे नागरिकांची मोठी सुविधा झाली आहे. प्रत्येक नागरिक कुठल्याही भागातून या ऑनलाइन पोर्टलवर तक्रार दाखल करू शकतो. त्याचबरोबर परदेशात शिक्षणासाठी जाणाऱ्या विद्यार्थ्यांना या पोर्टलवर सहजसुलभ नोंदणी करता येते. या नोंदणीमुळे संकटसमयी हा विभाग मदतीसाठी त्याच्यापर्यंत सहज पोहोचू शकतो. त्याचबरोबर विविध देशांतील भारतीय कैद्यांची माहिती ठेवणारे मॉड्यूल या पोर्टलवर आहे. कामात पारदर्शकता यावी, कालमर्यादेत जबाबदारीने नागरिकांच्या तक्रारींचे निवारण व्हावे, यासाठी ही यंत्रणा यशस्वीपणे काम करत आहे.

MADAD
Because You Are Us

## युद्धपातळीवर मदत आणि विक्रम

विविध देशांतील युद्धजन्य परिस्थितीत तसेच अराजकता असलेल्या भागातील पीडित भारतीयांची सुटका करण्यास या मंत्रालयाने प्रथम प्राधान्य दिले. अशांतता पसरलेल्या अनेक देशांतून भारतीयांची सुटका करून घेण्यात आली. अलीकडच्या काळात दक्षिण सुदामधून (ऑपरेशन संकटमोचन २०१६) १५३ भारतीयांची, येमेनमधून (ऑपरेशन राहत २०१५) ४७४८ भारतीयांसह ६७१० नागरिकांची, २०१४-१६ दरम्यान इराकमधील ७००० भारतीयांची, लिबियातून ३७७१ भारतीयांची तर युक्रेन १००० विद्यार्थ्यांची (२०१४) संकटातून सुटका करून त्यांना

सुरक्षित स्थळी हलवण्यात आले. त्याबरोबर एप्रिल २०१५ मध्ये नेपाळमध्ये झालेल्या भूकंपानंतरदेखील मोठ्या प्रमाणावर भारतीयांची सुटका करण्यात आली. अशाप्रकारे २०१४ पासून ९०,००० हून अधिक भारतीयांची संकटातून सुटका करत त्यांना मायदेशी परत आणण्यात यश आले. कुठल्याही मानकानुसार हा एक मोठा विक्रम आहे. कठीण परिस्थितीत अडकलेल्या प्रत्येक भारतीयाला मदत करण्याचा प्रयत्न या सरकारने केला आहे.

### ५० किमी. अंतरावर पासपोर्ट सेवा

परराष्ट्र मंत्रालयाचे सर्वात मोठे यश म्हणजे पासपोर्ट सेवेचा विस्तार. पासपोर्ट मिळण्याची प्रक्रिया अधिक सुलभ करण्याच्या दृष्टीने टाकलेले हे निर्णायक पाऊल आहे. १२५ कोटींपेक्षा अधिक लोकसंख्या असलेल्या आपल्या देशात केवळ काही कोटी नागरिकांकडेच पासपोर्ट आहे. देशातील ७७ पासपोर्ट सेवा केंद्रे (पीएसके) आणि त्यानंतर स्थापन झालेल्या १६ पासपोर्ट सेवा केंद्रांव्यतिरिक्त, देशभरात १८३ नवीन पासपोर्ट कार्यालये सुरू करण्यात परराष्ट्र मंत्रालयाला यश आले आहे. १७ एप्रिल २०१८ पर्यंत प्रस्तावित एकूण २५१ पैकी १८३ कार्यालयांचे लोकार्पण करण्यात आले. पोस्ट ऑफिसच्या माध्यमातून प्रत्येक ५० कि.मीं.च्या अंतरावर पासपोर्ट सेवा केंद्राची स्थापना करण्याचे धोरण या सरकारने अंगीकारले आहे. जेणेकरून नागरिकांना पासपोर्टसाठी दूरचा प्रवास करण्याची गरज भासू नये. त्याअंतर्गत २५१ पैकी १० पोस्ट ऑफिस पासपोर्ट सेवा केंद्रे (पीओपीएसके) महाराष्ट्रात सुरू करण्यात आली आहेत. त्यापैकी २ मुंबई, १ नागपूर तर ७ पीओपीएसके पुणे येथे आहे. शिवाय राज्यात मुंबईमध्ये आणखी एक आणि पुणे येथे तीन अशी आणखी ४ पीओपीएसके सुरू करण्यात येणार आहेत. हे मंत्रालय आता प्रत्येक भारतीय नागरिकाच्या जीवनाचा अविभाज्य घटक बनले आहे. जागतिकीकरणात 'वसुधैव कुटुंबकम्'ची भावना जपणारे, देशविदेशातील प्रत्येक भारतीयाची काळजी वाहणारे, त्यांचे जीवन सुकर करण्याच्या दृष्टीने प्रयत्न करणारे आणि देशाप्रति आपुलकी निर्माण करणारे मंत्रालय म्हणून परराष्ट्र मंत्रालयाने ओळख निर्माण केली आहे. देशविदेशातील भारतीय नागरिकांसाठी आणि पर्यटकांसाठी हे मंत्रालय पाठीचा कणा बनून काम करत आहे. येणाऱ्या काळातही देशाची प्रतिमा उंचावण्यात आणि मदतीचा हात देण्यात हे मंत्रालय आघाडीवरच असेल.



### कामगारांच्या हक्कांचे संरक्षण

आखाती देश/प्रदेशात काम करणाऱ्या अकुशल कामगारांची संख्या मोठी आहे. सहसा हे अकुशल नागरिक बांधकाम कामगार किंवा मोलकरीण म्हणून काम करतात. मात्र त्यांच्या अकुशलतेमुळे, दुबळेपणामुळे त्यांचा जेवढा गैरवापर होऊ शकतो, तेवढेच ते असुरक्षितही असतात. त्यांचे बहुधा आर्थिक शोषण व मानवी हक्कांचे उल्लंघनही केले जाते. ही बाब लक्षात घेऊन परराष्ट्र मंत्रालयाने त्यांच्याकडे विशेष लक्ष दिले आहे. त्यासाठी दुबई व रियाधमध्ये भारतीय कामगार संसाधन केंद्रे (आयडब्ल्यूआरसी) सुरू केले आहेत. याशिवाय क्वालालंपूर व शारजा येथेही हे उघडण्यात येत आहे. या केंद्रामार्फत कामगारांना २४ तास कायदेशीर, आर्थिक बाबी आणि मानसिक समुपदेशन सेवा पुरवली जाते. त्याचबरोबर स्थलांतरित होणाऱ्या कामगारांच्या मोफत समुपदेशनासाठी देशभरात प्रोटेक्टर जनरल ऑफ एमिग्रंट यांची कार्यालये संपूर्ण देशभरात कार्यरत आहेत.

### ओव्हरसीज सिटीझन्स ऑफ इंडिया योजना

फिजी, मॉरिशस, त्रिनिदाद-टोबॅगो, सुरिनाम इत्यादींसारख्या देशांमध्ये राहणाऱ्या भारतीय वंशाच्या नागरिकांचे भारताशी भावनिक आणि सांस्कृतिक नाते मजबूत आहे. त्याचबरोबर स्वातंत्र्यानंतर इतर देशांचे नागरिकत्व स्वीकारलेल्या नागरिकांचेदेखील भारतासोबत घनिष्ठ भावनिक नाते आहे. मातृभूमीशी ते सहज जोडलेले राहावेत, धार्मिक-सांस्कृतिक विचारांची देवाणघेवाण सहज करता यावी व भारत हा आपला देश आहे ही जाणीव त्यांच्या मनात कायम राहावी यासाठी 'ओव्हरसीज सिटिझन्स ऑफ इंडिया' कार्डधारक योजना सुरू करून, ती अमलातही आणण्यात आली आहे. यामुळे परदेशी स्थायिक असलेल्या मूळ भारतीयांची नाळ मातृभूमीशी जोडलेली राहील. या योजनेंतर्गत त्यांना आजीवन व्हिसा, देशात कोठेही गुंतवणूक करण्याची संधी, मालमत्ता खरेदी आणि विक्रीची परवानगी, देशात व्यवसाय व रोजगाराच्या संधी अगदी भारतीय नागरिकाप्रमाणे उपलब्ध करून देण्यात आल्या आहेत.

### पर्यटन वाढीसाठी 'ई-पर्यटन व्हिसा'

गृह मंत्रालयाच्या सहकार्याने परराष्ट्र मंत्रालयाने जगातील १६१ पेक्षा अधिक देशांच्या पर्यटकांसाठी 'ई-पर्यटन व्हिसा' सुरू केला आहे. यामुळे देशात अधिक पर्यटन, व्यापारवृद्धी होईल आणि गुंतवणूक मिळवण्यात मदत होईल. परदेशात भारतीय दूतावास व कॉन्सिलेटसमोर विदेशी पर्यटकांना रांगा लावण्याची गरज पडणार नाही. या सेवेमार्फत पर्यटकाला अवघ्या ७२ तासांमध्ये टुरिस्ट व्हिसा मिळतो. त्याचप्रमाणे १० कोटी किंवा त्याहून अधिक रकमेची थेट परकीय गुंतवणूक (एफडीआय) करणाऱ्या विदेशी गुंतवणूकदारांना कायमस्वरूपी रहिवास (पर्मनंट रेसिडेन्सी स्टेटस) स्थितीची सुविधा उपलब्ध करून देण्याची योजना सुरू करण्यात आली आहे. अशा परकीय गुंतवणूकदारांसाठी कोणत्याही अटीशिवाय दहा वर्षांच्या मल्टिपल एन्ट्री व्हिसाचादेखील यात समावेश आहे.

**(लेखक परराष्ट्र मंत्रालयात ज्येष्ठ सनदी अधिकारी आहेत.)**

**संपर्क : ०९२०५६२३९८५**

**अनुवाद : प्रा. गणेश तारे**



'बेटी बचाओ, बेटी पढाओ' या कार्यक्रमाच्या शुभारंभाप्रसंगी प्रधानमंत्री नरेंद्र मोदी.

# महिला व बालहक्कांचे संरक्षण

**प्रधानमंत्री नरेंद्र मोदी सरकारच्या चार वर्षांच्या कार्यकाळात ज्या मंत्रालयांनी आपल्या आगळ्यावेगळ्या उपक्रमांद्वारे देशाचे लक्ष वेधून घेतले आहे. त्यात केंद्रीय मंत्री मनेका गांधी यांच्या महिला व बालविकास मंत्रालयाचा समावेश आहे.**

**गेल्या चार वर्षांत विविध योजनांच्या माध्यमातून, या मंत्रालयाने महिलांच्या तसेच बालकांच्या हक्कांचा वसा जपला आहे. स्वतः मनेकाजी या महिला व बालकांच्या हक्कांच्या खंद्या पुरस्कर्त्या असल्याने त्यासंबंधीच्या विविध योजनांची प्रभावीपणे अंमलबजावणी केली जात आहे.**

**निवेदिता मदाने-वैशंपायन**

केंद्रीय महिला व बालविकास विभागाच्या मंत्री म्हणून काम पाहताना मनेका गांधी यांनी महिला व बालकांसंबंधीच्या योजनांच्या अंमलबजावणीला गती देणे, राज्यांना केंद्राचा निधी वेळेत पोहोचेल याची दक्षता घेणे, राज्यांच्या कामगिरीचा वेळोवेळी लेखाजोखा घेणे ही कामे प्रकर्षाने केली. पर्यावरण, प्राणी हक्क संरक्षण या क्षेत्रातही आतापावेतो भरीव कार्य करणाऱ्या मेनकाजींसह केंद्रीय राज्यमंत्री कृष्णा राज यांनीही योजनांच्या अंमलबजावणीसाठी सक्रिय प्रयत्न सुरू ठेवले आहेत.

### महाराष्ट्राची छाप!

या मंत्रालयाचे काम देशभरात नावाजले जात असून, त्यात महाराष्ट्राचे योगदान उल्लेखनीय आहे. राजमाता जिजाऊ, सावित्रीबाई फुले, अहिल्याबाई होळकर या ज्येष्ठ श्रेष्ठ महिलांच्या जन्मभूमीत जन्म झाल्याचा नेहमीच अभिमान असणाऱ्या; आनंदी व्यक्तिमत्त्वाच्या राज्याच्या महिला-बालविकास मंत्री पंकजा मुंडे यांनी या वर्षी श्रीमती गांधी यांची भेट घेतली. त्या वेळी पंकजाताईंनी दत्तक नियमावली फार कडक (जाचक) आहे. त्यात सुटसुटीतपणा आणावा,'अशी सूचना केली. श्रीमती गांधी यांनी त्याच आठवड्यात त्याबाबत अधिकाऱ्यांची बैठक बोलावून कार्यवाहीचा आढावाही घेतला. त्याचबरोबर, महाराष्ट्र सरकारने राबवलेल्या 'मातृत्व वंदना', 'माझी कन्या भाग्यश्री' यांसारख्या योजनांबद्दल दिल्लीत कौतुकही केले गेले... हा आहे, २०१४ पासूनचा दिल्ली दरबारातील महाराष्ट्राचा दबदबा!

### जळगाव आणि उस्मानाबादचा गौरव

या मंत्रालयाच्या माध्यमातून फर्स्ट लेडी, नारी शक्ती, स्त्री शक्ती अशा विविध पुरस्कारांच्या माध्यमातून देशभरातील कर्तृत्ववान स्त्रियांचा गौरव करण्यात आला. यातही महाराष्ट्राची आगळीवेगळी

छाप पडली. मंत्रालयाचे हे पुरस्कार वितरण सोहळे अतिशय वैशिष्ट्यपूर्ण म्हणून लक्षात राहिले. राष्ट्रीय बालिका दिनानिमित्त माननीय मंत्रिमहोदयांच्या हस्ते 'बेटी बचाओ बेटी पढाओ' योजनेच्या उत्कृष्ट अंमलबजावणीसाठी जळगाव आणि उस्मानाबाद जिल्ह्यांना पुरस्कार देण्यात आले. जळगावने मुलामुलींच्या जन्मदराची नोंद ठेवण्यासाठी राबवलेला डिजिटल गुड्डा-गुड्डी बोर्ड' हा उपक्रम राष्ट्रीय पातळीवर नावाजला गेला.

### फर्स्ट लेडीचा सन्मान

२०१७ च्या जागतिक महिला दिनाला पहिल्या महिला रेल्वेचालक मुमताज कांजी आणि उद्योजिका रीमा साठे यांना सन्मानित करण्यात आले. कांजी यांची 'लिम्का बुक'मध्ये नोंद झाली आहे. यंदा जानेवारीत फर्स्ट लेडी' या आगळ्यावेगळ्या सन्मान सोहळ्यात विविध क्षेत्रातील ११२ कर्तृत्ववान महिलांचा सन्मान करण्यात आला. यात राज्यातील १५ महिलांचा समावेश होता.

या मंत्रालयाने नारी शक्ती आणि स्त्री शक्ती हे पुरस्कार देण्यास प्रारंभ करून विविध क्षेत्रातील महिलांच्या कर्तृत्वाला सलाम करण्याचा पायंडा घालून दिला. या वर्षीच्या महिलादिनी राष्ट्रपती रामनाथ कोविंद यांच्या हस्ते अनाथांची माय' सिंधुताई सपकाळ आणि भारतीय स्त्री शक्तीच्या संस्थापिका उर्मिला (निर्मला) ताई आपटे यांना सन्मानित करण्यात आले. राष्ट्रपतींनी आपल्या भाषणात, सिंधुताईंनी अनाथांना जगण्याची दिशा दिली व त्या आपल्या कर्तृत्वाने अनाथांची 'सिंधुमाई' झाल्या, असे गौरवोद्गार काढले.

समाज एका विशिष्ट उंचीवर पोहोचण्यासाठी, देश खऱ्या अर्थाने सुपर पॉवर बनवायचा असेल तर नारी सशक्तीकरणाचे महत्त्व प्रधानमंत्री नरेंद्र मोदी आणि त्यांचे मंत्रिमंडळ जाणते. केंद्राच्या माध्यमातून देशातील महिलांना आर्थिक, सामाजिक, शैक्षणिक आणि आरोग्याच्या दृष्टीने सक्षम आणि समर्थ करण्याच्या हेतूने अनेक योजना आखल्या आहेत. त्यांची अंमलबजावणी प्रभावीपणे सुरू आहे.

४ वर्षे
नवभारताच्या
उभारणीची

### महिला बालकांसाठी वसतिगृहे

कार्यशील महिला व मुलांची शहरांमध्ये राहण्याची सोय व्हावी यासाठी १९७२-७३ पासून सुरू असलेल्या नोकरदार महिलांसाठी वसतिगृहे या योजनेला नवे बळ मिळाले आहे. सध्या देशातील ७० हजार ५०० महिला व ९८०० मुले या ९३८ वसतिगृहांचा लाभ घेत आहेत. येथील राहण्याचा आणि खाद्यपदार्थांचा दर्जा वाढवण्याकडे मंत्रालयाने कटाक्षाने लक्ष दिले आहे.

## मुलींचा जन्मदर वाढवण्यासाठी प्रयत्न

प्रधानमंत्री नरेंद्र मोदी यांनी २२ जानेवारी २०१५ रोजी 'बेटी बचाओ बेटी पढाओ' ही महत्त्वाकांक्षी योजना राष्ट्रीय पातळीवर सुरू केली. राष्ट्रीय स्तर आणि राज्य स्तरावरील मुलींबाबतची असणारी अनास्था थांबवून, लिंग निवडीस प्रतिबंध करणे, मुलींच्या शिक्षणाबाबत आणि मुलींच्या जीवनमानाचा सुरक्षेबाबत खात्री देण्याच्या उद्देशाने केंद्र सरकार 'बेटी बचाओ बेटी पढाओ' हा कार्यक्रम राबवत आहे. मुलींचा जन्मदर वाढवण्यासठी देशातील विशेषतः मुलींच्या जन्मदराबाबत पिछाडीवर असलेल्या निवडक १०० जिल्ह्यांत ही योजना सुरू झाली. पहिल्या दोन वर्षी मिळालेला भरघोस प्रतिसाद पाहून, गतवर्षी आणखी ६१ जिल्ह्यांचा यात समावेश करण्यात आला. या जिल्ह्यांत मुलींचा जन्मदर अल्प आहे. योजनेचा आढावा घेण्यासाठी राज्यांचे मंत्री, सचिव संबंधित जिल्हाधिकारी यांच्या वारंवार बैठका घेऊन, या मंत्रालयाने योजनेला गतिशीलता दिली. मुलींचा जन्मदर वाढवण्याच्या या योजनेचे परिणाम, हरयाणासारख्या राज्यांमध्ये प्रत्यक्ष दिसू लागले आहेत. महाराष्ट्रात लातूर, बीड, उस्मानाबाद, जालना, सांगली, हिंगोली येथेही परिणाम दिसून येतात.



### स्वाधारगृह

दुर्देवाच्या फेऱ्यात अडकल्याने उद्ध्वस्त होणाऱ्या महिलांना आधार देऊन, त्यांचे मानसिक व आर्थिक पुनर्वसन करण्यासाठी केंद्राकडून ही योजना सुरू करण्यात आली आहे. गेल्या दोन वर्षांत देशातील ३३,८२१ महिलांना या स्वाधारगृहात आश्रय मिळाला आहे.

### प्रशिक्षण आणि रोजगारवृद्धी

सोळा वर्षांच्या वयोगटातील मुलींना

प्रशिक्षण देऊन स्वतःच्या पायावर उभे राहण्यासाठी ही योजना सुरू झाली. या कौशल्य वृद्धी योजनेत महिलांमधील कौशल्य हेरून त्याचे प्रशिक्षण देण्यात येते.

**मुलींसाठी अन्य योजना :** अध्यापक विद्यालयात स्त्रियांसाठी ३०टक्के आरक्षण व मोफत शिक्षण, माध्यमिक शाळेतील मुलींना राष्ट्रीय योजनेतून तीन हजार रुपयांचा प्रोत्साहन भत्ता दिला जातो. केंद्र शासनाची ही योजना खासगी विनाअनुदानित शाळांमधील आणि कस्तुरबा गांधी बालिका विद्यालयातून इयत्ता आठवी उत्तीर्ण झालेल्या आणि नववीत शिकत असलेल्या अनुसूचित जाती-जमातीच्या मुलींना लागू. (वयाची १६वर्षे पूर्ण न झालेल्या अविवाहित मुलींसाठीच केवळ ही योजना लागू आहे.)

## राष्ट्रीय पोषण आहार मिशन

गतवर्षी ३० ऑक्टोबर रोजी ही योजना सुरू करण्यात आली. कुपोषित आणि रक्ताक्षय (अनिमिया)ग्रस्त महिला व कमी वजन असलेली नवजात बालके यांना या योजनेचा लाभ मिळतो. अर्भक, गर्भवती महिला आणि युवती यांच्यामधील



रक्ताक्षयाचे प्रमाण तीन टक्के करण्याचे या योजनेचे उद्दिष्ट आहे. अर्भकांमधील कुपोषण आणि खुरटणाऱ्या वाढीचे प्रमाण ३८.४ टक्क्यांवरून २०२२ पर्यंत थेट २५टक्क्यांपर्यंत कमी आणण्याचे उद्दिष्ट असणारी राष्ट्रीय आहार मिशन योजना आखण्यात आली आहे. पहिल्या टप्प्यात १६२ मागास जिल्ह्यांमधील ४२ लाख बालकांवर लक्ष केंद्रित करण्यासाठी या योजनेत ९,००० कोटी रुपयांची तरतूद केली आहे.

## बालकांचा सर्वंकष विकास

गर्भवती महिला आणि केवळ अभ्यास नव्हे तर खेळ, कला, विविध कौशल्ये यात गती असणाऱ्या मुलींना याद्वारे प्रोत्साहन दिले जाते. याचा लाभ घेणाऱ्या केवळ गर्भवती मातांची संख्या २०१६-१७ मध्ये १कोटी ८२ लाख ६८ हजार ९१७ इतकी होती तर त्यापुढच्या वर्षी ती १ कोटी ६३ लाख १० हजार ३७९ इतकी होती. ६ महिने ते ६ वर्षे वयोगटातील तब्बल सुमारे ७ कोटी बालिकांनाही याचा लाभ देण्यात आला आहे.



## राजमाता जिजाऊ मोफत सायकल वाटप योजना

ग्रामीण भाग व 'क' नगरपरिषद क्षेत्रातील मुलींचे शैक्षणिक गळतीचे प्रमाण कमी करण्यासाठी माध्यमिक शाळेत शिक्षण घेणाऱ्या दारिद्र्य रेषेखालील इयत्ता आठवीच्या मुलींसाठी ही योजना सुरू केली. यासाठी इयत्ता सातवीमध्ये ४५ टक्के गुण प्राप्त केले असणे तसेच शासन मान्यताप्राप्त, अनुदानित माध्यमिक शाळेत शिक्षण घेत असणे आवश्यक आहे. योजनेत लाभार्थ्यांची निवड करताना दुर्गम, अतिदुर्गम भाग तसेच शहरी भागात झोपडपट्टी तसेच गलिच्छ वस्तीतील मुलींना प्राधान्य दिले जाते.

## मुलींचे वसतिगृह व मॉडेल स्कूल

केंद्र शासनाने प्राथमिक, माध्यमिक शाळेमध्ये मुलींचे प्रमाण वाढवण्यासाठी आणि मुलींच्या शैक्षणिक गळतीचे प्रमाण रोखण्यासाठी काही जिल्ह्यात मॉडेल स्कूल व मुलींचे वसतिगृह सुरू करण्याची योजना आखली आहे.

## मनोधैर्य योजना



या योजनेंतर्गत बलात्कार, ॲसिड हल्ला यामध्ये बळी पडलेल्या स्त्रिया व लैंगिक अत्याचाराला बळी पडलेल्या बालकांचे पुनर्वसन आणि त्यांना अर्थसाहाय्य केले जाते. घटनेचा परिणाम म्हणून स्त्रिया किंवा बालकास कायमचे मतिमंदत्व अथवा अपंगत्व आल्यास तसेच सामूहिक बलात्कारांच्या प्रकरणात गंभीर इजा झाल्यास किंवा ॲसिड हल्ल्यामध्ये चेहरा विद्रूप झाल्यास १० लाख रुपयांचे अर्थसाहाय्य दिले जाते. यापैकी ७५ टक्के रक्कम पीडितांच्या नावाने बँकेत मुदत ठेव म्हणून तर २५ टक्के रकमेचा धनादेश पीडितांना तत्काळ देण्याचा निर्णय घेण्यात आला आहे. ३१ डिसेंबर २००९ पासूनच्या पात्र प्रकरणांना पूर्वलक्षी प्रभावाने योजनेतील अर्थसाहाय्य मिळू शकते.

## महिला हेल्पलाइन




देशातील राज्यांत आणि केंद्रशासित प्रदेशात महिलांना २४ तास मदतीस तत्पर असणाऱ्या हेल्पलाइनचा शुभारंभ एप्रिल २०१५ मध्ये करण्यात आला. सार्वजनिक तसेच कौटुंबिक हिंसेचा सामना करणाऱ्या महिलांसाठी १८१ क्रमांकाच्या या हेल्पलाइनला लक्षणीय प्रतिसाद मिळत आहे. याद्वारे गेल्या तीन वर्षांत १२, १४, ७६३ तक्रारींचे निराकरण करण्यात आले आहे.

## प्रधानमंत्री मातृवंदना योजना

आई कामावर गेल्याने बाळाचे पोषण होत नाही आणि यातून

कुपोषणाची समस्या जन्म घेते हीच बाब लक्षात घेऊन केंद्र सरकारने प्रधानमंत्री मातृवंदना योजना
१ जानेवारी २०१७ पासून राबवण्यासाठी सुरुवात केली.

**पहिल्या अपत्यासाठी लागू :** ही योजना केवळ पहिल्याच अपत्यासाठी व सरकारने अधिसूचित केलेल्या संस्थेत नोंदणी झालेल्या स्त्रियांना लागू आहे. याअंतर्गत पाच हजार रुपयांची रक्कम तीन टप्प्यांत संबंधित लाभार्थी स्त्रीच्या खात्यात थेट जमा करण्यात येईल. या योजनेचे लाभ, वेतनासाठी मातृत्व रजा मिळणाऱ्या स्त्रियांना मिळणार नाही.

मातृवंदना या योजनेमधून आर्थिक साहाय्य यांचा १हजार रुपयांचा पहिला हप्ता, गरोदर मातांनी शासकीय रुग्णालयात नोंद केल्यानंतर मिळेल. दुसरा दोन हजार रुपयांचा हप्ता बाळंतपूर्व तपासणी करताना गर्भधारणेच्या सहाव्या महिन्यानंतर मिळेल. योजनेतील तिसरा दोन हजार रुपयांचा हप्ता स्त्री प्रसूत झाल्यानंतर बाळाला सर्व लसी दिल्याची खात्री केल्यानंतर मिळेल. योजनेंतर्गत (पी.एम.एम.व्ही.वाय.) या मंत्रालयाने देशभरातील ११ लाख ४७ हजार ३८६ निराधार, गरीब महिलांना २७१.६६ कोटींच्या मदतीचे वाटप केले आहे. ३६ राज्ये आणि केंद्रशासित प्रदेशांत सुरू असलेल्या या योजनेच्याही अंमलबजावणीवर केंद्राची कडक देखरेख असते. यासाठीची तरतूद वाढवून ती या वर्षीच्या अर्थसंकल्पात २०४८.५९ कोटींवर पोहोचली आहे. यात लाभार्थी महिलांच्या खात्यांत ५००० रुपये तर गरीब गर्भवती मातांच्या मदतीसाठी प्रत्येकी ६००० रुपयांची मदत दिली जाते. या योजनेपर्यंत ऑनलाइन पोहोचणे शक्य व्हावे यासाठी मनेकाजींच्या हस्ते मागील वर्षात कॉमन ॲप्लिकेशन सॉफ्टवेअर (सी.ए.एस.) सुरू करण्यात आले.

## किशोरी शक्ती योजना



केवळ दोन वेळच्या भाकरीची सोय नाही म्हणून मुलींना शिक्षण अर्धवट सोडावे लागू नये, यासाठी ही योजना सुरू करण्यात आली. २०१७ मध्ये सुरू झालेल्या या योजनेत ११ ते १४ वयोगटातील शाळा सोडणाऱ्या मुलींना पुन्हा शिक्षणाची दारे खुली करण्यासठी त्यांना सकस आहार दिला जातो. प्रथिने आणि पौष्टिक आहाराचे विशिष्ट प्रमाण ठरवून देण्यात आले आहे. कौशल्य विकास शिक्षण संस्थांनाही ही योजना लागू करण्यात आली आहे. किशोरी शक्ती योजनेत प्रथम ३०६ जिल्हे त्यानंतर देशाच्या सर्व जिल्ह्यांचा समावेश करण्यात आला. यंदा याची मुदत नुकतीच वाढवण्यात आली.

## वन स्टॉप सेंटर (ओएससी)

कौटुंबिक तसेच इतर हिंसाचाराची झळ बसलेल्या, अत्याचारपीडित महिलांना तत्परतेने मदत करण्यासाठी देशात अशी १७० केंद्रे सुरू करण्यात आली आहेत. या महिलांना केवळ औषधोपचारच नव्हे तर मानसोपचार, कायदेशीर आणि तत्कालिक मदत देण्यात येते. २०१५ मध्ये सुरू झालेल्या या योजनेंतर्गत आतापावेतो ३२ राज्यांतील ९७ हजार ९६१ तक्रारींची नोंद करण्यात आली आहे.

## निर्भया निधी योजना

घरापासून सार्वजनिक वाहतुकीपर्यंत आणि नोकरी कामाच्या ठिकाणापर्यंत विविध प्रकारच्या अत्याचारांना बळी पडणाऱ्या महिलांची संख्या कमी करण्यासाठी, राज्य सरकारांना जनजागृती मोहीम व्यापकपणे हाती घेण्याच्या सूचना करण्यात आल्या आहेत. मंत्रालयाने निर्भया निधींतर्गत एका उच्चाधिकार समितीने नुकतीच महिलांच्या आणि बालकांच्या हिताच्या योजनांच्या अंमलबजावणीचा आढावा घेतला. यासाठी १५० कोटींचा निधी यापूर्वीच वितरित करण्यात आला आहे.

## महिला लोकप्रतिनिधी क्षमता वृद्धी

'महिलांचा विकास ते महिलांच्या नेतृत्वाखाली विकास', हा टप्पा देशाने लवकर गाठला पाहिजे, असे आवाहन प्रधानमंत्र्यांनी केले आहे. त्यानुसार मंत्रालयाने देशातील तब्बल १४ लाख महिला लोकप्रतिनिधींसाठी विशेष क्षमता वृद्धी कार्यक्रम सुरू केला आहे. पंचायत राज कायद्यानुसार 'ग्रामपंचायत ते संसद' या विविध टप्प्यांवर कार्यरत महिला लोकप्रतीनिधींसाठी विशेषतः ग्रामीण आणि निमशहरी भागांतील महिला पदाधिकाऱ्यांसाठी, वेळोवेळी मार्गदर्शन करण्यात येते. याशिवाय त्यांना कायद्याचे व योजना अंमलबजावणीचे प्रशिक्षणही दिले जाते. याचे दोन टप्पे आहेत.

पहिल्या टप्प्यात २७ नोव्हेंबर २०१७ रोजी झालेल्या प्रशिक्षणात मास्टर्स प्रशिक्षकांची निवड व नियुक्ती करण्यात आली. या प्रशिक्षक आता देशाच्या १४ राज्यांच्या ४०६ जिल्ह्यांतील १८ हजार ५७८ महिला लोकप्रतीनिधींच्या प्रशिक्षणाची जबाबदारी पार पाडतील. शासनकर्त्या महिला या 'बदलाचे दूत' असतात असे मनेकाजींनी म्हटले. त्यानुसार अशा महिला दूत जेथे असतात तेथील स्थानिक स्वराज्य संस्थांमध्ये, विकासाचे चक्र परिणामकारकरीत्या फिरते हा अनुभव असल्याने; मंत्रालयाने या योजनेचा विस्तार करण्याचे ठरवले आहे. आज महिला आर्थिकदृष्ट्या स्वावलंबी आणि अनेक क्षेत्रात आत्मनिर्भर होत आहेत. त्यांच्यात सामर्थ्य आणि आत्मविश्वास वाढवण्यासाठी केंद्र सरकारच्या विविध योजनाही व्यापक पद्धतीने प्रयत्नशील आहेत.

**मुक्त पत्रकार-माध्यम संयोजिका, नवी दिल्ली**
**संपर्क: ०९९६८४११३९१**

# आपले सरकार, आपले ॲप्स

**प्रधानमंत्री नरेंद्र मोदी यांनी डिजिटल इंडिया वीक या उपक्रमाचे उद्घाटन करताना देशाला आता 'ई-गव्हर्नन्स'कडून 'एम गव्हर्नन्स'कडे वळण्याची गरज आहे, असे म्हटले होते. 'एम गव्हर्नन्स' म्हणजे 'मोदी गव्हर्नन्स' समजू नका अशी मिश्कील टिपण्णी करत 'एम' म्हणजे 'मोबाइल गव्हर्नन्स' असल्याचे त्यांनी नमूद केले होते. आजघडीला आयुष्याचा अविभाज्य भाग बनलेल्या मोबाइलचा उपयोग करून, शासकीय योजना थेट लोकांपर्यंत पोहोचवणे हा प्रधानमंत्र्यांच्या 'एम गव्हर्नन्स' संकल्पनेचा उद्देश आहे. पण त्याचबरोबर ॲप्सच्या माध्यमातून लोकांना थेट सरकारशी जोडून घेणे शक्य आहे, हेही सरकारने लक्षात घेतले आहे. त्यातून अगदी ऑनलाइन आयकर रिर्टन्स भरणे असो की बँकेचे व्यवहार असोत, सर्वांसाठी केंद्र सरकारने वेगवेगळे ॲप उपलब्ध करून दिले आहेत. आपली आर्थिक, शासकीय, शैक्षणिक आणि इतरही बरीच व्यावहारिक कामे सोपे करणारे हे ॲप्स आहेत.**

**अमृता कदम**

## नरेंद्र मोदी ॲप




ज्याप्रमाणे MYGOV ॲपद्वारे तुम्ही सरकारशी संबंधित यंत्रणांशी संवाद साधता, त्याचप्रमाणे या ॲपच्या माध्यमातून थेट प्रधानमंत्र्यांशी संवाद साधण्याची संधी मिळते. नमो ॲपमुळे देशाच्या प्रधानमंत्र्यांकडूनच तुम्हाला संदेश आणि ई-मेलही येतात. स्वतःच्या नावाने अशा प्रकारचे ॲप असलेले नरेंद्र मोदी हे पहिले राजकीय नेते बनले आहेत. आपले विचार आणि कल्पना अधिकाधिक लोकांपर्यंत पोहोचवण्यासाठी ते या ॲपचा वापर करतात. या ॲपवर 'मन की बात' कार्यक्रमात प्रधानमंत्र्यांनी केलेली सर्व भाषणे, त्यांचे ब्लॉग आणि त्यांच्या चरित्रातील प्रसंग ऐकायला व वाचायला मिळतात.

## माय गव्हर्नमेंट ॲप (MYGOV APP)

या ॲपचे वैशिष्ट्य म्हणजे ते तुम्हाला थेट प्रशासकीय व्यवस्थेशी संवाद साधण्याचा प्लॅटफॉर्म उपलब्ध करून देते. या ॲपच्या माध्यमातून केंद्रातील अनेक खात्यांच्या मंत्रालयांना तुम्ही प्रश्न विचारू शकता. या खात्यांच्या कारभारासंबंधी मत, तुमच्या सर्जनशील सूचनाही तुम्हाला MYGOV APP वर मांडता येतात. सरकारच्या अखत्यारीतील काही महत्त्वाच्या संस्थांनाही हे ॲप जोडलेले आहे.

## ऑनलाइन आरटीआय(OnlineRTI)



भ्रष्टाचाराचा सामना करण्यासाठी सर्वसामान्यांच्या हातातील महत्त्वाचे हत्यार म्हणजे माहितीचा अधिकार अर्थात आरटीआय. हे लक्षात घेऊन, सहजपणे आरटीआय दाखल करता यावा म्हणूनच ऑनलाइन आरटीआय हे ॲप उपलब्ध करून देण्यात आले. या ॲपचा वापर करून, तुम्हाला नेमक्या कोणत्या गोष्टीची माहिती हवी, हे नमूद करायचे आहे. त्यानंतर या ॲपशी संबंधित वकील आणि कायदेतज्ज्ञांची एक टीम तुमचा अर्ज तयार करून, मंजुरीसाठी तुम्हाला परत पाठवते. तुम्ही त्यामध्ये बदल सुचवू शकता किंवा तो जसाच्या तसा मंजूर करू शकता. अर्जाचा मागोवाही तुम्हाला ऑनलाइन आरटीआय ॲप्सवरून घेता येतो. या ॲप्सच्या माध्यमातून युजर्स कम्युनिटी किंवा फोरम बनवून वेगवेगळे प्रश्न तयार करू शकता.

## भीम ॲप (BHIM APP)

तरुण पिढी कार्ड आणि पेटीएम सारख्या ॲप्सना प्राधान्य देते, हे लक्षात घेऊन ३० डिसेंबर २०१६ रोजी भीम ॲप लाँच करण्यात आले. या ॲपचे नाव डॉ. बाबासाहेब आंबेडकरांच्या नावावरून बेतलेले आहे, हे तर स्पष्ट होतेच. पण त्याचबरोबर BHIMचे विस्तारित रूप 'भारत इंटरफेस फॉर मनी' हेसुद्धा आहे. अर्थात पेटीम, एअरटेल मनी, एम-पैसा या सगळ्या ॲप्सप्रमाणे भीम हे मोबाइल वॉलेट नाही. तर ते बँक खात्यातील व्यवहार करण्याचे एक माध्यम आहे. याचे सर्वांत महत्त्वाचे वैशिष्ट्य म्हणजे वेगवेगळ्या बँकांच्या खात्यांमध्ये भीमच्या माध्यमातून पैशांचे व्यवहार करता येतात. अगदी बँक हॉलिडेच्या दिवशीही भीमवरून व्यवहार करता येतात. सरकारी असूनही भीमचे हे वेगळेपणच म्हणायला हवे. भीम ॲपवरून करंट अकाऊंटवरील शिल्लक तपासता येते. पेमेंट आयडी म्हणून तुम्ही जर १२ अंकी आधार नंबरच ठेवला असेल, तर तर भीम ॲपसाठी तुम्हाला बायोमेट्रिक ऑथेंटिफिकेशनचीही आवश्यकता भासत नाही. भीम ॲपमध्ये एक लाख रुपयांपर्यंतच्या आर्थिक व्यवहारांवर कोणतेही शुल्क आकारले जात नाही. सध्या इंग्लिशसह १३ भारतीय भाषांमध्ये हे ॲप कार्यरत आहे. लवकरच राज्यघटनेच्या परिशिष्ट आठमध्ये असलेल्या २२ भाषांमध्ये हे ॲप वापरण्याची सुविधा उपलब्ध होईल.


## स्वच्छ भारत ॲप (SWACHH BHARAT APP)

२ ऑक्टोबर २०१४ रोजी गांधी जयंतीचे निमित्त साधून प्रधानमंत्री नरेंद्र मोदी यांनी या महत्त्वाकांक्षी योजनेची

घोषणा केली होती. नावावरूनच स्पष्ट आहे की, हे ॲप नागरिकांमध्ये स्वच्छतेबद्दल जागरूकता वाढवण्यासाठी बनवले गेले आहे. देशात स्वच्छतेसंबंधी अभिनव प्रयोग कुठे होत आहेत याची माहिती या ॲपमुळे मिळते. सध्या समाजमाध्यमामध्ये आपल्या मित्रमंडळींना जोडून (टॅग) त्यांना काही वेगळे आव्हान देण्याची प्रथा रूढ आहे. नव्या पिढीचे हे आकर्षण लक्षात घेऊन या ॲपमध्ये तुम्ही तुमच्या मित्रांना स्वच्छतेचेही आव्हान देऊ शकाल, अशी सोय उपलब्ध करून देण्यात आली आहे.

## एम पासपोर्ट ॲप (mPASSPORTSEVA APP)

या ॲपमुळे आता नवीन पासपोर्ट (पारपत्र) काढण्याची प्रक्रिया अतिशय सोपी झाली आहे. या ॲपचा वापर केला तर तुम्हालाही ते लक्षात येईलच. तुम्ही ज्या भागात राहता तिथून कुठले पासपोर्ट ॲप्लिकेशन सेंटर जवळ आहे, त्यासाठी किती शुल्क लागते. संबंधित कार्यालयाचे दूरध्वनी क्रमांकाची सगळी माहिती या ॲपमध्ये एका क्लिकवर उपलब्ध आहे. शिवाय तुम्ही पासपोर्टसाठी अर्ज केल्यानंतर त्याची सद्यःस्थिती काय आहे, त्याची प्रक्रिया कुठपर्यंत आली आहे ही सगळी माहिती तुम्ही या ॲपच्या माध्यमातून जाणू शकता. पासपोर्ट अर्ज करतानाचा फाइल नंबर आणि तुमची जन्मतारीख या दोन गोष्टी टाकल्या तरी तुम्हाला पासपोर्टसंबंधी सगळी माहिती या ॲपवरून मिळते.



## गर्व ग्रामीण विद्युतीकरण ॲप (GARV GRAMEEN VIDYUTIKARAN APP)

सरकारने मार्च २०१९ पर्यंत प्रत्येक घरात वीज पोहोचवण्याचे लक्ष्य जाहीर केले होते. ग्रामीण विद्युतीकरणाची ही प्रक्रिया नेमकी कुठपर्यंत आली आहे, किती वेगाने पुढे जात आहे. यावर जनतेला थेट लक्ष ठेवता यावे, यासाठी हे ॲप तयार करण्यात आले आहे. या ॲपच्या डॅशबोर्डवर तुम्हाला या योजनेंतर्गत किती गावांमध्ये हे काम पूर्ण झाले, अजून किती गावे राहिलेली आहेत याची सद्यःस्थितीतील माहिती सातत्याने उपलब्ध करून दिली जात आहे. प्रत्येक राज्यामध्ये या योजनेची स्थिती काय आहे याचाही आढावा तुम्ही 'गर्व' ॲपच्या माध्यमातून घेऊ शकता.

## खोया पाया ॲप (KHOYA PAYA APP)



गायब झालेल्या, हरवलेल्या लहान मुलांची तसेच व्यक्तींची माहिती तातडीने योग्य लोकांपर्यंत पोहोचावी यासाठी हे ॲप बनवण्यात आले आहे. या ॲपवर नोंदणी केल्यानंतर तुम्हाला अशा हरवलेल्या मुलांची माहिती कळू शकते किंवा तुम्हीही कोणी हरवलेली व्यक्ती सापडल्यास त्याची माहिती पोलिसांना देऊन मदत करू शकता. मिळालेल्या माहितीची योग्य खातरजमा केल्यानंतरच ती ॲपवर उपलब्ध करून दिली जाते.

## एमकवच ॲप (M-KAVACH)

सी-डॅक या संस्थेने तयार केलेले हे मोबाइल सुरक्षा ॲप आहे. आजकाल आपला सगळा डेटा, महत्त्वाची माहिती मोबाइलमध्येच असते. त्यामुळे त्याची सुरक्षितता ही खूप महत्त्वाची गोष्ट आहे. हे जाणूनच तुमच्या मोबाइल उपकरणाला व्हायरसच्या संभाव्य धोक्यांपासून वाचवण्यासाठी हे ॲप मदत करते. आजकाल ॲपच्या माध्यमातून तुमच्या वैयक्तिक माहितीचा गैरवापर होण्याची शक्यता वाढली आहे. ती रोखण्यासाठीच हे ॲप विकसित करण्यात आले आहे. तुमचा डाटा सुरक्षित राहावा, डाटा चोरी होऊ नये, अनावश्यक कॉल, एसएमएस रोखायचे असतील तर हे ॲप महत्त्वाचे आहे. वायफाय-ब्लू टुथ-कॅमेरा वापरताना अधिकृत नेटवर्कशीच तुम्ही जोडले जावे याचीही खबरदारी हे ॲप घेते. या ॲपचे आणखी एक वैशिष्ट म्हणजे तुम्ही तुमचा लोकल बॅकअप तयार करू शकता तसेच कॉल लॉग- कॉन्टॅक्स रिस्टोअर करू शकता.

## इन्क्रेडिबल इंडिया ॲप (INCREDIBLE INDIA APP)

पर्यटनवृद्धीला चालना देणारे आणि पर्यटन करताना आवश्यक अशा सर्व गोष्टींची एकाच क्लिकवर माहिती देणारे हे ॲप आहे. अनेकदा पर्यटनाचा बेत केल्यानंतर आपण बनावट एजंट, अनावश्यक सेवांमुळे लुबाडले जाण्याची शक्यता असते. हे ॲप तुम्हाला संबधित पर्यटन स्थळावरच्या अधिकृत एजंट, ऑपरेटरची माहिती पुरवते. विशेष म्हणजे तुम्ही तुमची स्थळनिश्चिती चालू केल्यावर त्या ठिकाणची माहिती लगेच या ॲपवर येत राहते. केंद्रीय पर्यटन मंत्रालयाच्या माध्यमातून हे ॲप बनवण्यात आले आहे.

देशातल्या पर्यटनाबद्दलच्या आकर्षक गोष्टी, कुठल्या स्थळांना भेट द्यायला हवी, कुठल्या हवामानात द्यायला हवी अशी सगळी माहिती या ॲपमध्ये एकत्रितपणे पाहायला मिळते.

(लेखिका दै. लोकमत नवी दिल्ली येथे पत्रकार आहेत. संपर्क: ०९८२०४२९९७७)

**गेल्या ४ वर्षात केंद्र शासनाने अनेक नावीन्यपूर्ण योजना कार्यान्वित केल्या. नागरिकांच्या जीवनात आमूलाग्र बदल घडवून आणणाऱ्या या योजनांचा आढावा..**

# योजना : परिवर्तन घडवणाऱ्या

### प्रधानमंत्री जन-धन योजना (PMJDY)

**प्रारंभ :** २८ ऑगस्ट २०१४

प्रधानमंत्री जन धन योजनेंतर्गत, १० वर्षे वयापुढील कोणतीही व्यक्ती एकही रुपया न भरता बँकेमध्ये खाते उघडू शकते.

**संकेतस्थळ:** http://www.mjdy.gov.in

### प्रधानमंत्री मुद्रा योजना (PMMY)

**प्रारंभ :** ८ एप्रिल २०१५

लघु उद्योगासाठी बँकेकडून ५० हजार ते १० लाख रुपयांपर्यंत तत्काळ कर्ज मिळते.

**संकेतस्थळ:** http://www.mrdra.org.in

### प्रधानमंत्री जीवन ज्योती विमा योजना (PMJJBY)

**प्रारंभ :** ९ मे २०१५

१८-५० वर्षे वयोगटातील व्यक्तीने वर्षाला ३३० रुपये विमा हप्ता भरल्यास २ लाख रुपयांचे विमा संरक्षण मिळते. विमा संरक्षण **कालावधी :** १ जून ते ३१ मे.

**प्रधानमंत्री सुरक्षा विमा योजना :** १८-७० वर्षे वयोगटातील व्यक्ती १२ रुपये वार्षिक विमा हप्ता भरून २ लाख रुपयांचा अपघात विमा संरक्षण मिळवण्यास पात्र होतो. अपघातात कायमचे अपंगत्व आल्यावरही विम्याची रक्कम मिळते. **कालावधी :** १ जून ते ३१ मे.

**अटल पेन्शन योजना :** या योजनेत आपल्या गुंतवणुकीप्रमाणे महिन्याला १ ते ५ हजार रुपये निवृत्तीवेतन मिळते. असंघटित क्षेत्रातील कामगारांसाठी ही योजना आहे. वयाच्या ६० वर्षांनंतर निवृत्तीवेतन लागू होते. उदा. १८ वर्षाच्या व्यक्तीने महिन्याला ४२ रुपये हप्ता भरल्यास त्याला १००० रुपये महिना निवृत्तीवेतन मिळेल.

**संकेतस्थळ:** http://www.jansuraksha.gov.in

### प्रधानमंत्री फसल विमा योजना (PMFBY)

**प्रारंभ :** १३ जानेवारी २०१६

या योजनेंतर्गत शेतकऱ्यांना रब्बी आणि खरीप पिकांसाठी विमा संरक्षण आणि आर्थिक मदत पुरवली जाते.

**संकेतस्थळ:** http://india.gov.in

### प्रधानमंत्री आवास योजना (PMAY)

**प्रारंभ :** २५ जून २०१५

या योजनेंतर्गत २०२२ पर्यंत सर्वांना घरे बांधून दिले जातील. शहरी भागात २ कोटी आणि ग्रामीण भागात ३ कोटी घरे बांधण्यात येत आहेत.

**संकेतस्थळ:** https://pmaymis.gov.in (शहरी), http://www.iay.nic.in (ग्रामीण)

### प्रधानमंत्री सुकन्या समृद्धी योजना (PMSSY)

**प्रारंभ :** २२ जानेवारी २०१५

मुलीचे भविष्य सुरक्षित करण्यासाठीची ही योजना आहे. या योजनेंतर्गत, एक बचत खाते मुलीच्या नावाने उघडले जाऊ शकते आणि ठेवी १४ वर्षे ठेवल्या जाऊ शकतात. मुलीचे वय १८ वर्षे झाल्यानंतर तिचे लग्न किंवा उच्च शिक्षणासाठी ५० टक्के रक्कम काढता येते. मुलीने वयाची २१ वर्षे पूर्ण केल्यावर, संपूर्ण रक्कम काढता येते. प्रत्येक वर्षी १.५ लाख रुपये कमाल गुंतवणूक करता येते. किमान ठेव १००० रुपये आहे. एकापेक्षा अधिक मुलींच्या बाबतीत आई-वडील वेगवेगळे खाते उघडू शकतात. ही योजना

### प्रधानमंत्री ग्राम सिंचाई योजना (PMGSY)

**प्रारंभ :** १ जुलै २०१५

या योजनेचा उद्देश क्षेत्रीय स्तरावर सिंचन प्रणालीमध्ये गुंतवणूक आकर्षित करणे हा आहे. देशात शेती उपयोगी जमीन तयार करणे, पाण्याचा अपव्यय कमी करण्यासाठी, शेतात पाण्याचा वापर कमी करणे, पाणी बचत तंत्रज्ञान आणि सिंचन लागू करून पीक उत्पादन वाढवणे, हे या योजनेचे मुख्य उद्देश आहेत.



**संकेतस्थळ:** http://agricoop.nic.in

फक्त २ मुलींसाठीच आहे.

**संकेतस्थळ:** http://www.nsiindia.gov.in



## प्रसाद (Pilgrimage Rejuvenation and Spiritual Augmentation Drive)

**प्रारंभ :** ९ मार्च २०१५

या योजनेंतर्गत अमृतसर, अजमेर, अमरावती, द्वारका, गया, कांचीपूरम, केदारनाथ, कामाख्य, मथुरा, पुरी, वाराणसी, वेल्लंकनी या तीर्थक्षेत्रांमध्ये जागतिक दर्जाच्या पर्यटनासाठी पायाभूत सुविधा विकसित करण्यात येत आहेत.

**संकेतस्थळ:** http://tourism.gov.in

## उडान योजना

**प्रारंभ :** १४ नोव्हेंबर २०१४. या योजनेंतर्गत उच्च तांत्रिक शिक्षणासाठी मुलींना प्रोत्साहन दिले जाते.

**संकेतस्थळ:** http://www.skilldevelopment.gov.in/udaan.html

## प्रधानमंत्री उज्ज्वला योजना

**प्रारंभ:** १ मे २०१६. या योजनेंतर्गत देशातील दारिद्र्य रेषेखालील ५ कोटी महिलांना मोफत गॅस कनेक्शन दिले जाणार आहे.

**संकेतस्थळ:** http://www.pmujjwalayojana.com

## नमामि गंगे प्रकल्प

**प्रारंभ:** १० जुलै २०१४. गंगा नदीचे शुद्धीकरण, संरक्षण आणि संवर्धन करण्यासाठी ही योजना राबवण्यात येत आहे.

**संकेतस्थळ:** http://nmcg.nic.in

## सेतू भारतम प्रकल्प

**प्रारंभ:** ४ मार्च २०१६. रेल्वे क्रॉसिंगपासून सर्व राष्ट्रीय महामार्ग मुक्त करण्यासाठी आणि २०१९ पर्यंत राष्ट्रीय महामार्गावरील जुन्या पुलांच्या दुरुस्तीसाठी ही योजना राबवण्यात येत आहे. यासाठी ५० हजार कोटी रुपयांची गुंतवणूक केली जाईल. **संकेतस्थळ:** http://morth.nic.in

## दीनदयाळ अंत्योदय योजना

राष्ट्रीय शहरी आजीविका मिशन आणि राष्ट्रीय ग्रामीण आजीविका मिशन या दोन योजनाचे एकत्रीकरण करून दीनदयाळ अंत्योदय योजना तयार करण्यात आली आहे. शहरातील गरीब कुटुंबाना रोजगार प्राप्त व्हावा म्हणून प्रशिक्षणासाठी १५,००० रुपयाची तरतूद करण्यात आली आहे. जम्मू-काश्मीरसाठी १८,००० रुपयाची तरतूद करण्यात आली आहे.

**संकेतस्थळ:** https://www.india.gov.in

**दीनदयाळ उपाध्याय ग्रामज्योती योजना :** देशातील संपूर्ण ग्रामीण भागात वीज उपलब्ध करून देण्यासाठी दीनदयाळ उपाध्याय ग्रामज्योती ही योजना आहे. सरकारने १ मे २०१८ पर्यंत १८,४२५ गावात शेती आणि गावांना अखंडित वीज उपलब्ध करून देण्याचा संकल्प केला आहे. राजीव गांधी ग्रामीण विद्युतीकरण योजनाचा समावेश दीनदयाळ उपाध्याय ग्रामज्योती योजनेत करण्यात आला आहे.

**संकेतस्थळ:** www.india.gov.in, www.ddugjy.gov.in

## स्टार्टअप इंडिया, स्टँडअप इंडिया

**प्रारंभ:** १६ जानेवारी २०१६

या योजनेंतर्गत नवउद्योजकांना त्यांचा व्यवसाय (स्टार्टअप) सुरू करण्यासाठी साहाय्य केले जाते. नावीन्यपूर्ण कल्पनांना प्रोत्साहन देणे. नवीन उद्योग स्थापन करण्यासाठी सुलभ कर्ज उपलब्ध करणे. अर्थिक प्रगती आणि मोठ्या प्रमाणात रोजगाराच्या संधी निर्माण करणे. या साठी स्टार्टअप इंडिया हा भारत सरकारचा एक प्रमुख उपक्रम आहे. उद्योग सुरू करण्यासाठी लागणारे परवाने या अंतर्गत सुलभ करण्यात आले. **संकेतस्थळ:** www.startupindia.gov.in

## दीनदयाळ उपाध्याय ग्रामीण कौशल्य योजना (डीडीयू-जीकेवाई)

**प्रारंभ :** २५ सप्टेंबर २०१४

या योजनेचा मुख्य उद्देश ग्रामीण युवकांना रोजगार व स्वयंरोजगारासाठी प्रशिक्षित करणे आहे. ग्रामीण क्षेत्रातील गरीब युवकांना कौशल्य प्रशिक्षण देणे. स्वावलंबी बनवणे. रोजंदारीपेक्षा अधिक नियमित मासिक वेतन मिळवून देणे. देशाची गरिबी कमी करणे हे या योजनाचे ध्येय आहे. प्रशिक्षणार्थींना प्रशिक्षण, निवास, भोजन, नि:शुल्क दिले जाते.

**संकेतस्थळ:** www.ddugky.gov.in

## बेटी बचाओ, बेटी पढाओ

आपल्या देशातील ० – ६ वर्ष या वयोगोटातील प्रत्येक हजार मुलांमागे असलेल्या मुलींच्या जन्मदराचे म्हणजेच बाल लिंग गुणोत्तर प्रमाण २०११ मध्ये ९१८ आहे. हा बालिका जन्मप्रमाणाचा आकडा बाल लिंग गुणोत्तर (Child Sex Ratio) असे दर्शवतो की समाजात बाळाच्या जन्मापूर्वी लिंगपरीक्षण करून घेऊन, कोणत्या बाळाला जन्म घेऊ द्यायचा हे ठरवले जाते आणि जन्मानंतर मुलींना व मुलांना पूर्वग्रहानुसार वेगवेगळी वागणूक दिली जाते.

जनगणना २०११ च्या माहितीनुसार निर्देशित केलेली मोठी घट ही चिंतेची बाब आहे. या समस्येवर एकत्रितपणे काम करून एकमेकांशी सहकार्य करण्याची आवश्यकता आहे. ही बाब लक्षात घेऊन सरकारने 'बेटी बचाओ, बेटी पढाओ' ही योजना सुरू केली आहे.

मुलींच्या कमी होत जाणाऱ्या जन्मदराच्या समस्येला तोंड देण्यासाठी ही योजना २०१४ च्या ऑक्टोबर महिन्यापासून सुरु करण्यात आली. त्यामुळे आता ही देशव्यापी चळवळ बनली आहे. कमी होत जाणाऱ्या मुलींच्या जन्मदरानुसार बाल लिंग गुणोत्तर प्रमाणावर लक्ष केंद्रित करण्यासाठी देशातील सर्व राज्ये आणि केंद्रशासित प्रदेशातील मिळून १०० जिल्हे निवडण्यात आले आहेत. महिला व बालविकास मंत्रालय, आरोग्य आणि कुटुंबकल्याण मंत्रालय, मानव संसाधन मंत्रालय या मंत्रालयांनी एकत्र येऊन ही योजना राबवण्याचे ठरवले आहे.

**या उपक्रमाचे उद्दिष्ट्ये पुढीलप्रमाणे :**
■ लिंग–आधारित भ्रूणहत्या टाळणे. ■ मुलींचे अस्तित्व टिकवून ठेवणे आणि संरक्षण देणे. ■ मुलींचे शिक्षण आणि सहभाग सुनिश्चित करणे. **संपर्क :** महिला व बाल विकास मंत्रालय, भारत सरकार, शास्त्री भवन, नवी दिल्ली.

**दूरध्वनी:** ०११–२३३८६४२३
**ई–मेल:** nic-mwcd@gov.in,
**संकेतस्थळ:** www.wcd.nic.in

## मृदा स्वास्थ्य कार्ड योजना

सॉयल हैल्थ कार्ड
स्वस्थ धरा, खेत हरा

मातीचे आरोग्य तपासणे. उत्पादकता सुधारणे; जमिनीची सुपीकता वाढवण्यासाठी शेतकऱ्यांना माती आणि सेंद्रीय खतांचे परीक्षण करण्याची सुविधा उपलब्ध करून देणे. मातीत असणाऱ्या पोषक मुलद्रव्याची माहिती मृदा स्वास्थ्य कार्डवर देणे, मूलद्रव्याच्या आधारे पिकाची लागवड करणे, शेतकऱ्याचे उत्पादन वाढवणे ही या योजनेची प्रमुख उद्दिष्ट्ये आहेत.

**संकेतस्थळ:**
https://soilhealth.dac.gov.in

## प्रधानमंत्री कौशल विकास योजना(PMKVY)

ही युवकांच्या कौशल्य प्रशिक्षणासाठी एक मुख्य योजना आहे. या योजनेंतर्गत अभ्यासक्रमात सुधारणा, योग्य शिक्षण आणि प्रशिक्षित शिक्षकांवर अधिक लक्ष केंद्रित करण्यात आले आहे. या प्रशिक्षणामध्ये व्यवहार कुशलता व व्यवहार परिवर्तन याचादेखील समावेश आहे. युवकांच्या इच्छेनुसार परिणामकारक कौशल्य प्रशिक्षण देणे व जीवन जगण्यासाठी सक्षम बनवणे हा उद्देश्य निर्धारित करण्यात आला आहे.

कौशल्य विकास व उद्योग मंत्रालय राष्ट्रीय कौशल्य विकास महामंडळाच्या (एनएसडीसी) माध्यमातून या कार्यक्रमाची अंमलबजावणी करते. या कार्यक्रमांतर्गत स्वतंत्र मूल्यांकन संस्थांनी केलेल्या मूल्यांकन व प्रमाणपत्रानुसार प्रशिक्षणार्थींना रोख पारितोषिक दिले जाते. केंद्र व राज्य सरकार, उद्योग आणि व्यावसायिक समूहांसोबत विचारविनिमय केल्यानंतर भविष्यातील मागणीचा अंदाज घेतला जातो. याकरिता, मागणी समूह मंचदेखील सुरु करण्यात आला आहे. कौशल्य विकासाचे लक्ष्य निश्चित करते वेळी 'मेक इन इंडिया, डिजिटल इंडिया, राष्ट्रीय सौर ऊर्जा अभियान व स्वच्छ भारत अभियान' या योजनांमधील मागणी लक्षात घेतली जाते.



**संकेतस्थळ:** http://www.pmkvyofficial.org

## डिजिटल साक्षरता अभियान

ई-गव्हर्नन्सच्या अनुषंगाने नागरिक-केंद्रित सेवांवर भर देण्यात येत आहे. शासनाच्या प्रमुख माहिती तंत्रज्ञान पुढाकारामध्ये रेल्वे संगणकीकरण, जमिनीच्या अभिलेखांचे संगणकीकरण, आदी प्रकल्पांचा समावेश आहे. अनेक राज्यांनी नागरिकांना इलेक्ट्रॉनिक सेवा पुरवण्याच्या उद्देशाने वैयक्तिक ई-गव्हर्नन्स प्रकल्प सुरू केले आहेत. डिजिटल इंडिया कार्यक्रमाचा उद्देश्य नागरिकांना अधिक गतिमानतेने व पारदर्शकरीत्या सेवा पुरवणे हा असून डिजिटल साक्षर समाज निर्मिती यामुळे साध्य होणार आहे. **संपर्क :** इलेक्ट्रॉनिक्स आणि माहिती तंत्रज्ञान मंत्रालय. भारत सरकार, इलेक्ट्रॉनिक्स निकेतन, ६, सीजीओ कॉम्प्लेक्स, लोदी रोड, नवी दिल्ली ११०००३.

**ई-मेल :** webmaster@digitalindia.gov.in
**संकेतस्थळ :** digitalindia.gov.in
**दूरध्वनी:** ०११-२४३०१८५१
**फॅक्स:** ०११-२४३६३१०१

## सांसद आदर्श ग्राम योजना

महात्मा गांधी यांनी सांगितले होते की, भारत गावांमध्ये राहतो. त्यामुळे प्रथम आपण गावांचा विकास करणे आवश्यक आहे. या गावांमध्ये रुग्णालये, शाळा, पक्की घरे, सार्वजनिक संस्था-आंगणवाडी, ग्रामपंचायत इत्यादींसाठी कायमस्वरूपी बांधकामे, पाणीपुरवठा या मूलभूत सोयी उपलब्ध करून देणे आवश्यक ठरते. त्यासाठी प्रधानमंत्री नरेंद्र मोदी यांनी ११ ऑक्टोबर २०१४ रोजी सांसद आदर्श ग्राम योजना सुरू केली. त्याचा मुख्य उद्देश देशातील गावांची स्थिती बदलणे हा आहे. त्यामुळे या योजनेंतर्गत प्रत्येक खासदाराला एक गाव दत्तक घ्यावे लागते. ते त्याच्या किंवा कुटुंबीयांशी संबंधितांचे गाव नसावे. त्या गावाचा विकास या संसद सदस्याने सर्वांगीण विकास करावा.

पक्की घरे, पिण्याच्या पाण्याची सुविधा, रस्ता जोडणी, शाळा, रूग्णालय, आरोग्य केंद्र, ग्रामीण बाजार, बँक, औद्योगिकीकरण, पोस्ट ऑफिस, अन्न सुरक्षा अशासारख्या मूलभूत सोयीसुविधा उपलब्ध करून द्याव्यात.

**वैशिष्टे :** ३१ मार्च २०१९ पर्यंत सांसद ग्राम योजनेंतर्गत प्रत्येक खासदारांना तीन आदर्श गावे विकसित करणे आवश्यक आहे. पुढे ही आदर्श गावे इतर गावांना प्रेरणा देऊ शकतात.
**संपर्क : दूरध्वनी:** २३७८२३२७, २३७८२३७३, २३३८३५४८.
**संकेतस्थळ:** saanjhi.gov.in

**टीम लोकराज्य**

## स्वच्छ भारत अभियान

प्रधानमंत्री नरेंद्र मोदी यांनी स्वच्छ भारताचे महात्मा गांधींचे स्वप्न पूर्ण करण्यासाठी 'स्वच्छ भारत अभियान' सुरू केले. महात्मा गांधी स्वच्छतेबाबत आग्रही होते. महात्मा गांधींनी आपले जीवन समर्पित करून भारताला 'स्वराज्य' प्राप्त करून दिले. आता मातृभूमीच्या स्वच्छतेसाठी स्वत:ला समर्पित करण्याची वेळ आली आहे. २०१९ मध्ये महात्मा गांधी यांची १५० वी जयंती साजरी करताना, आम्ही महात्मा गांधींना स्वच्छ भारत अर्पण करू. स्वच्छ भारत अभियानामध्ये तुम्ही जास्तीत जास्त ९ व्यक्तींना आवाहन करू शकता. त्याचप्रमाणे, यापैकी प्रत्येक ९ व्यक्ती आणखी ९ व्यक्तींना आव्हान करू शकतात.

**स्वच्छ भारत कार्यक्रम :** स्वच्छ भारत अभियानातील आपल्या योगदानाचे छायाचित्र आणि चित्रफित शेअर करू शकता. स्वच्छ भारत अभियानाविषयीच्या आपले अनुभव विशिष्ट क्षेत्रात, परिसरात सांगू शकता. **संपर्क :** मुख्य कार्यकारी अधिकारी, मायगोव्हचे कार्यालय, तिसरा मजला, खोली क्रमांक -३०१५, इलेक्ट्रॉनिक्स आणि माहिती तंत्रज्ञान मंत्रालय (भारत सरकार), इलेक्ट्रॉनिक्स निकेतन,
६, सीजीओ कॉम्प्लेक्स, लोदी रोड, नवी दिल्ली - ११०००३.
**दूरध्वनी:** ०११-२४३६४७०६
**संकेतस्थळ:** www.swachhbharat.mygov.in, mygov.nic.in



**केंद्र शासनाच्या जनकल्याण योजना व त्यांची गेल्या चार वर्षात राज्यात झालेली प्रभावी अंमलबजावणी, यामुळे विविध क्षेत्रात आघाडीचे राज्य ही महाराष्ट्राची ओळख पुन्हा एकदा अधोरेखित झाली आहे. उद्योजकांना प्रोत्साहन देणाऱ्या मुद्रा योजनेंतर्गत राज्यातील उद्योजकांनी घेतलेला लाभ उल्लेखनीय आहे. विविध आणि पायाभूत सुविधांमध्ये केंद्र शासनाने राज्याला दिलेला भरभरून निधी व त्याच्या अंमलबजावणीत महाराष्ट्राने गौरवास्पद कामगिरी केली आहे.**

# डिजिटल भारतात महाराष्ट्राची आघाडी

**दयानंद कांबळे** (उपसंचालक), **रितेश भुयार** (उपसंपादक)

उच्च शिक्षण घेणाऱ्यांमध्ये राज्याची देशात असलेली आघाडी, 'स्वच्छ भारत मिशन'अंतर्गत राज्याच्या ग्रामीण भागात स्वच्छतागृह उभारणी व 'भारतनेट' योजनेंतर्गत इंटरनेट जोडणीच्या कामातील उल्लेखनीय घौडदौड तसेच, काळाची पाऊले ओळखत थेट हस्तांतरणाच्या केंद्राच्या योजनेमध्ये राज्याची वाटचाल मोलाची आहे. आधार कार्ड नोंदणीतील आघाडी, जनधन योजनेंतर्गत राज्यात उघडण्यात आलेली बँक खाती, उज्ज्वला योजनेंतर्गत गॅस जोडणी, प्रधानमंत्री आवास योजनेंतर्गत राज्याला मंजूर झालेली घरे, आदिवासी कल्याण योजनेत राज्याला मंजूर निधी यासह पर्यटन व सिंचन व्यवस्थापनातही राज्याने आघाडी घेतली आहे.




## पायाभूत सुविधेत राज्य अव्वल

केंद्र शासनाच्या आर्थिक व्यवहार विभागाने देशातील पायाभूत सुविधा प्रकल्पांची ३१ मार्च २०१८ अखेर पर्यंतची माहिती जाहीर केली आहे. अहवालानुसार पायाभूत सुविधा निर्माण करण्यात महाराष्ट्र देशात अव्वल ठरले आहे. गेल्या चार वर्षात राज्यात २८४ पायाभूत प्रकल्प मंजूर झाले असून, या प्रकल्पांची किंमत १ लाख ४३ हजार ७३६ कोटी इतकी आहे.

या पायाभूत सुविधा प्रकल्पांमध्ये शासकीय पायाभूत सुविधा प्रकल्प, सार्वजनिक क्षेत्रातील प्रकल्प, सार्वजनिक खासगी भागीदारी प्रकल्प व शासकीय पायाभूत सुविधा प्रकल्पांचा समावेश आहे. ५ ते ५० कोटींहून अधिक किमतीच्या पायाभूत प्रकल्पांचा यात समावेश आहे.

**वर्षनिहाय पायाभूत सुविधा प्रकल्पांची कामे**

महाराष्ट्रात २०१४-१५ या वर्षात २१ हजार ५७९ कोटी ९१ लाख किमतीचे ९८ प्रकल्प हाती घेण्यात आले. २०१५-१६ या वर्षात ३२ हजार ९७६ कोटी ७३ लाख रुपयांचे ८२ प्रकल्प. २०१६-१७ या वर्षात ६० हजार २७० कोटी ७१ लाख किमतीचे ८२ प्रकल्प, तर २०१७-१८ या वर्षात २८ हजार ९०९ कोटी रुपयांचे ४१ पायाभूत सुविधा प्रकल्प हाती घेण्यात आले.

गेल्या चार वर्षात देशात १५ लाख ८२ हजार कोटी किमतीच्या ३४७० पायाभूत सुविधा प्रकल्पांची कामे हाती घेण्यात आली. यामध्ये इतर राज्यांच्या तुलनेत सर्वाधिक १ लाख ४३ हजार ७३६ कोटी किमतीचे २८४ प्रकल्प हे महाराष्ट्रातील आहेत. गेल्या २८ वर्षात सरासरी वर्षाला ४० पायाभूत सुविधा प्रकल्प राज्यात हाती घेण्यात येत होते. या तुलनेत गेल्या चार वर्षात प्रतिवर्षी ७१ पायाभूत सुविधा प्रकल्प महाराष्ट्रात राबवण्यात येत आहेत.

## डीबीटीद्वारे बँक खात्यात ३ हजार कोटी

विविध शासकीय योजनांचा लाभ देताना होणारी गळती थांबवण्यासाठी थेट लाभ हस्तांतरण योजना (डीबीटी) २०१३ साली सुरू करण्यात आली. या योजनेद्वारे आजपर्यंत देशात २ लाख ७३ हजार १८३ कोटी रुपये वितरित करण्यात आले. महाराष्ट्रात ३ हजार २१० कोटींचा निधी डीबीटीद्वारे लाभार्थ्यांच्या बँक खात्यात जमा करण्यात आला.

या योजनेच्या माध्यमातून सध्या ५६ मंत्रालयांच्या ४१० योजनांचा निधी डीबीटीद्वारे थेट लाभार्थ्यांच्या बँक खात्यात जमा करण्यात येतो. या योजनेमुळे गेल्या ४ वर्षात ५७ हजार कोटींची बचत झाली.

महाराष्ट्रात १८ लाख ३५ हजार ३६४ लाभार्थ्यांना डीबीटी योजनेशी जोडण्यात आले. सामाजिक न्याय व विशेष साहाय्य विभागाच्या विविध योजनांच्या लाभासाठी १३ लाख ३० हजार लाभार्थ्यांची नोंदणी करण्यात आली. अल्पसंख्याक विभागात

४१,३१० लाभार्थ्यांनी नोंदणी केली. आदिवासी विकास विभागात १ लाख ४३ हजार, उच्च व तंत्र शिक्षण विभागात ३ लाख ८ हजार, शालेय शिक्षण विभागात १२ हजार १५६ लाभार्थ्यांची नोंदणी आजपर्यंत ऑनलाइन पद्धतीने झाली. डीबीटीच्या माध्यमातून प्रामुख्याने गॅस सबसिडी, रोजगार हमी योजना, छात्रवृत्ती व शिष्यवृत्ती योजना, राष्ट्रीय साहाय्य योजना, सामाजिक न्याय योजनांना निधी वितरित करण्यात आला.

## ९२ टक्के नागरिकांना आधार कार्ड

डिसेंबर २०१७ अखेर देशात ८८.५ टक्के नागरिकांना आधार कार्डांचे वितरण झाले. महाराष्ट्रात ९२.६ टक्के नागरिकांना आधार कार्ड वितरित झाली. देशातील ११६ कोटी ५४ लाख २८ हजार ३७७ नागरिकांना ३१ डिसेंबर २०१७ अखेर आधार कार्डे देण्यात आली. महाराष्ट्रात ११ कोटी ७९ लाख १ हजार १८९ नागरिक आधार कार्डाशी जोडले गेले. हे प्रमाण राज्यातील एकूण लोकसंख्येच्या ९२.६ टक्के इतके आहे.




**४० लाख बालकांना आधार कार्ड :** राज्यातील पाच वर्षांखालील ९९ लाख ६२ हजार ६०३ बालकांपैकी डिसेंबर २०१७ अखेर ४० लाख ९० हजार १५२ बालकांची आधार नोंदणी झाली. हे प्रमाण ४१.१ टक्के इतके आहे. देशातील ४३.५ टक्के बालकांची आधार नोंदणी करण्यात आली. देशातील पाच वर्षांखालील १२ कोटी २९ लाख ५८ हजार ७४९ बालकांपैकी ५ कोटी ३४ लाख ७५ हजार ४३४ बालकांची आधार नोंदणी करण्यात आली.

**अठरा वर्षांखालील २ कोटी मुलांना आधारकार्ड :** महाराष्ट्रातील पाच ते अठरा वयोगटातील २ कोटी ९५ लाख ९ हजार ४८६ किशोरवयीन युवकांना २ कोटी ३९ लाख ६ हजार ८९७ आधार कार्डे देण्यात आली. राज्यातील आधार नोंदणीचे हे प्रमाण ८२.६ टक्के इतके आहे. देशातील ३६ कोटी १० लाख ५४ हजार ३६९ पाच ते अठरा वयोगटातील किशोरवयीन युवकांपैकी २७ कोटी ६७ लाख ४२ हजार ३२७ किशोरवयीन युवकांची आधार नोंदणी करण्यात आली. देशपातळीवरील आधार नोंदणीचे हे प्रमाण ७६.६ टक्के इतके आहे.

## राष्ट्रीय महामार्गांची सर्वाधिक कामे

देशात ४ लाख ३२ हजार ५३८ कोटींची राष्ट्रीय महामार्गांची कामे सुरू असून, यात सर्वात जास्त २६ हजार ८४१ कोटींची १०७ कामे महाराष्ट्रात सुरू आहेत. राज्य व केंद्रशासित प्रदेशांमध्ये राष्ट्रीय महामार्गांच्या एकूण १ हजार ४७० प्रकल्पांची कामे सुरू आहेत. या अंतर्गत एकूण ४ लाख ३२ हजार ५३८ कोटी खर्चातून ४४ हजार १०८ किमी. लांबीच्या रस्त्यांची कामे सुरू आहेत. यात सर्वात जास्त १०७ प्रकल्प हे महाराष्ट्रातील आहेत. राज्यात २६ हजार ८४१ कोटी खर्चातून ३ हजार ३२० किमी.च्या राष्ट्रीय महामार्गांचे बांधकाम सुरू आहे.

महाराष्ट्राशिवाय कर्नाटकात ४ हजार ७४९ कोटींचे ८३ प्रकल्प, उत्तराखंडमध्ये ४ हजार ८२७ कोटींचे ६१ प्रकल्प, हिमाचल प्रदेश १ हजार ३६ कोटींचे ४७ प्रकल्प, तामीळनाडूमध्ये १ हजार ३२० कोटींचे ४६ प्रकल्प आणि बिहारमधील ५ हजार १०६ कोटींच्या ४३ प्रकल्पांसह देशातील ३० राज्य व केंद्रशासित प्रदेशांचा यात समावेश आहे.

**मुंबई शहर वाहतुकीसाठी ६५ हजार कोटींची कामे:** मुंबई शहर वाहतूक प्रकल्प (एम.यू.टी.पी) टप्पा ३ व टप्पा ३(अ) साठी एकूण ६५ हजार ७२४ कोटी रुपयांची कामे हाती घेण्यात आली आहेत. प्रधानमंत्री नरेंद्र मोदी यांनी डिसेंबर २०१६ साली एम.यू.टी.पी. अंतर्गत १०,९४७ कोटी रुपयांच्या कामाचा शुभारंभ केला आहे. यामध्ये पनवेल–कर्जत नवीन उपनगरीय मार्गांच्या कामाचा समावेश आहे. यासाठी २७८२ कोटी रुपये तर ४७६ कोटी रुपयांच्या ऐरोली–कळवा

## भारतनेटच्या पहिल्या टप्प्यात राज्याची आघाडी

आधुनिक युगाची कास धरत देशातील ग्रामीण भाग हायस्पीड ब्रॉडबँड इंटरनेट सेवेच्या माध्यमातून जोडण्यासाठी केंद्र शासनाने ‘भारतनेट’ हा महत्त्वाकांक्षी कार्यक्रम हाती घेतला आहे. देशातील १ लाखांहून अधिक ग्रामपंचायती ‘भारतनेट’च्या पहिल्या टप्प्यात हायस्पीड ब्रॉडबँडद्वारे जोडण्यात आल्या आहेत. या कार्यक्रमाच्या पहिल्या टप्प्यात ग्रामपंचायतींना हायस्पीड ब्रॉडबँडद्वारे जोडण्याच्या कामात महाराष्ट्र उत्कृष्ट राज्य ठरले आहे. राज्यातील १२ हजार ३७८ ग्रामपंचायतीमध्ये इंटरनेट सेवा उपलब्ध झाली आहे. १४ हजार ८७८ ग्रामपंचायतींमध्ये ‘भारतनेट’च्या कामास सुरुवात झाली आहे. महाराष्ट्राबरोबर उत्तर प्रदेश (पूर्व) मध्य प्रदेश, छत्तीसगड, राजस्थान, आणि झारखंड ही राज्येसुद्धा भारत नेटच्या पहिल्या टप्प्यात उत्कृष्ट ठरली आहेत.



देशात ३१ डिसेंबर २०१७ अखेर २ लाख ५४ हजार ८९५ किलोमीटर ऑप्टिकल फायबरचे जाळे निर्माण केले गेले. याद्वारे हायस्पीड ब्रॉडबँड सेवेने देशातील १ लाख १ हजार ३७० ग्रामपंचायतींना ‘भारत नेट’च्या पहिल्या टप्प्यात हायस्पीड ब्रॉडबँड इंटरनेट सेवेने जोडण्यात आले.

## उच्च शिक्षणात आघाडीवर

केंद्रीय मनुष्यबळ विकास मंत्रालयाने उच्च शिक्षणाची देशातील सद्य:स्थिती दर्शवणारा २०१६-१७ चा अहवाल नुकताच प्रसिद्ध केला. त्यानुसार देशात विद्यापीठस्तरीय अभ्यासक्रमांसाठी प्रवेश घेणाऱ्या विद्यार्थ्यांच्या नोंदणीमध्ये, महाराष्ट्र देशात अव्वल ठरला. महाराष्ट्रात ९ लाख ४० हजार ४८० विद्यार्थ्यांनी प्रवेश नोंदणी केली. तामिळनाडू ८ लाखांहून अधिक विद्यार्थ्यांसह दुसऱ्या तर दिल्ली ७ लाखांहून अधिक विद्यार्थी प्रवेशासह देशात तिसऱ्या स्थानावर आहे. याशिवाय तंत्रशिक्षण, दूरशिक्षण, शिक्षक, प्रशिक्षण व विद्यार्थी प्रवेश आदी क्षेत्रात; महाराष्ट्र आघाडीवर आहे. केंद्रीय मनुष्यबळ विकास मंत्रालयाने, देशातील शैक्षणिक संस्थांची राष्ट्रीय संस्थात्मक मानांकनानुसार देशातील शंभर उत्कृष्ट संस्थांमध्ये महाराष्ट्रातील ११ शैक्षणिक संस्थांचा समावेश आहे.



### दूरशिक्षणात महाराष्ट्र प्रथम


देशातल्या दूरशिक्षणाच्या अभ्यासक्रमांसाठी प्रवेश घेणाऱ्या विद्यार्थी नोंदणीमध्ये महाराष्ट्र अव्वल आहे. देशात ४० लाख ८९ हजार ७८१ विद्यार्थी दूरशिक्षणाच्या माध्यमातून शिक्षण घेत आहेत. यात १७.१ टक्के वाटा महाराष्ट्राचा आहे. राज्यात सुमारे ७ लाख विद्यार्थी दूरशिक्षणाच्या माध्यमातून शिक्षण घेत आहेत.

### महाराष्ट्रात सर्वाधिक शिक्षक प्रशिक्षण संस्था

देशात सर्वाधिक महाराष्ट्रात ४ हजार ३०८ शिक्षक प्रशिक्षण संस्था आहेत. या संस्थांमध्ये प्रवेश घेणाऱ्या विद्यार्थी संख्येत महाराष्ट्र अव्वल आहे. एकूण ३९ हजार ६५७ विद्यार्थी या संस्थांमध्ये प्रशिक्षण घेत आहेत. यात २९ हजार ८२२ विद्यार्थिनींचा समावेश आहे. शिक्षक प्रशिक्षण अभ्यासक्रमासाठी मुलींच्या प्रवेशामध्ये राज्याचा देशात दुसरा क्रमांक आहे, तर तामिळनाडू मुलींच्या प्रवेशात अव्वल ठरले आहे.

उन्नत मार्गाच्या कामाचा समावेश आहे. विरार-डहाणू या मार्गाच्या चौपदरीकरण कामासाठी ३५७८ कोटी रुपयांची कामे हाती घेण्यात आली आहेत. छत्रपती शिवाजी महाराज टर्मिनस ते पनवेल हा जलद उन्नत कॉरिडॉर, विरार-वसई -पनवेल नवीन उपनगरीय कॉरिडॉर, हार्बर मार्गाचा गोरेगाव- बोरिवली असा विस्तार, कल्याण - आसनगाव या मार्गावर चौपदरीकरण तसेच विविध रेल्वे स्टेशनची सुधारणा यासाठी मुंबई शहर वाहतूक प्रकल्पांतर्गत ५४ हजार ७७७ कोटी रुपयांची कामे प्रगतिपथावर आहेत.

## २० नवी पासपोर्ट सेवा केंद्रे



नागरिकांना त्यांच्या जिल्ह्यातच पासपोर्ट मिळावा यासाठी परराष्ट्र व्यवहार मंत्रालयाने पासपोर्ट आपल्या दारी या कार्यक्रमांतर्गत पोस्ट विभागाच्या मदतीने, जानेवारी २०१७ मध्ये देशभरात २५१ पासपोर्ट केंद्रे उभारण्याचा कार्यक्रम हाती घेतला. या कार्यक्रमांतर्गत एक वर्षात महाराष्ट्रात २० नवीन पासपोर्ट सेवा केंद्रे सुरू झाली आहेत.

**नवीन पासपोर्ट सेवा केंद्रे:** जानेवारी २०१७ पासून सुरू झालेल्या देशव्यापी कार्यक्रमानुसार एप्रिल २०१८ अखेरपर्यंत दोन टप्प्यात देशभरात एकूण २५१ पासपोर्ट सेवा केंद्रे उघडण्यात आली. त्यामध्ये महाराष्ट्रात आतापर्यंत वर्धा, जालना, औरंगाबाद, सांगली, कोल्हापूर, घाटकोपर-विक्रोळी, पिंपरी-चिंचवड, सिंधुदुर्ग, लातूर, अहमदनगर, पंढरपूर सातारा, बीड, मुंबई उत्तर-मध्य, मुंबई दक्षिण-मध्य, नवी मुंबई, डोंबिवली, पनवेल, नांदेड आणि जळगाव या केंद्रांचा समावेश आहे.

**तिसऱ्या टप्प्यात उर्वरित केंद्रे:** देशात दर ५० किमी. अंतरावर पासपोर्ट सेवा केंद्र उभारण्याचे उद्दिष्ट असून २०१८-१९ या वित्तीय वर्षात 'पासपोर्ट तुमच्या दारी' या कार्यक्रमाचा तिसरा टप्पा सुरू होणार आहे. या कार्यक्रमांतर्गत महाराष्ट्रासह देशातील विविध राज्यांमध्ये उर्वरित ठिकाणी नवीन पासपोर्ट सेवा केंद्र उभारण्यात येणार आहेत. पासपोर्ट विस्ताराच्या या कार्यक्रमामुळे देशातील सामान्य माणसाला पासपोर्ट मिळणे सहज शक्य होणार आहे.

## मुद्रा योजना: ४२ हजार कोटींचे कर्ज वितरण

देशातील असंघटित लघू उद्योगांच्या विकासाकरिता वित्तीय गरजा पूर्ण करण्यासाठी केंद्र शासनाने एप्रिल २०१५ रोजी मुद्रा योजना सुरू केली. या योजनेत महाराष्ट्राची कामगिरी उल्लेखनीय ठरली आहे. गेल्या तीन वर्षात राज्यात ४२ हजार ८६० कोटी रुपयांचे कर्ज वितरित करण्यात आले.

प्रधानमंत्री mudra योजना
पूंजी, सफलता की कुंजी

या योजनेत शिशू, किशोर व तरुण कर्ज अशा तीन टप्प्यात बँकांमार्फत ५० हजार ते १० लाख रुपयांपर्यंत कर्ज पुरवठा करण्यात येतो. या योजनेंतर्गत महाराष्ट्रात गेल्या तीन वर्षात ९१ लाख ५३ हजार ६१९ कर्ज प्रकरणांना मंजुरी देण्यात आली असून ४४ हजार ४९ कोटी रुपयांचे कर्ज मंजूर करण्यात आले. ४२ हजार ८६० कोटी रुपये लघुउद्योजकांना वितरित करण्यात आले. २०१५-१६ या वर्षात १३ हजार ३७२ कोटी रुपयांचे कर्ज प्रत्यक्षात वितरित करण्यात आले. २०१६-१७ या वर्षात १६ हजार कोटी रुपये तर २०१७-१८ यावर्षात १२ हजार ५११ कोटी रुपये इतके कर्ज लघू उद्योजकांना वितरित करण्यात आले.

देशात मुद्रा योजनेंतर्गत तीन वर्षात १० कोटींहून अधिक कर्ज प्रकरणे मंजूर करण्यात आली असून, लघू उद्योगांना ४ लाख ४३ हजार ४९६ कोटी रुपयांचे कर्ज वितरित करण्यात आले. महाराष्ट्र, कर्नाटक व तामीळनाडू ही राज्ये मुद्रा योजनेच्या अंमलबजावणीमध्ये पहिल्या तीनमध्ये समाविष्ट आहेत.

### ५० लाख शौचालयांची उभारणी

केंद्रीय पेयजल व स्वच्छता मंत्रालयाच्यावतीने देशाच्या ग्रामीण भागात 'स्वच्छ भारत मिशन ( ग्रामीण)' हा कार्यक्रम राबवण्यात येत आहे. या कार्यक्रमांतर्गत देशात गेल्या तीन वर्षात ५ कोटींहून अधिक घरगुती शौचालये बांधण्यात आली. महाराष्ट्रातील ग्रामीण भागात गेल्या तीन वर्षात ५० लाख ८ हजार ६०१ शौचालयांची उभारणी करण्यात आली. राज्यातील १६ जिल्हे व ३४ हजार गावे हागणदारीमुक्त म्हणून घोषित करण्यात आली.

### महाराष्ट्राचा स्वच्छता आलेख

गेल्या तीन वर्षांत महाराष्ट्रात ५० लाख ८ हजार ६०१ घरगुती शौचालये बांधण्यात आली आहेत. २०१४- १५ या वर्षात राज्यात ४ लाख ३१ हजार ३४ शौचालये बांधण्यात आली. २०१५-१६ या वर्षांत ८ लाख ८२ हजार ८८, २०१६-१७ या वर्षात १९ लाख १७ हजार १९१ तर २०१७-१८ या वर्षात १७ लाख ७८ हजार २८८ शौचालये बांधण्यात आली आहेत. २०१५- १६ साली महाराष्ट्रातील १४.९४ टक्के गावे हागणदारीमुक्त होती. सद्यःस्थितीत १८ एप्रिल २०१८ रोजी राज्यातील ३४ जिल्हे पूर्णतः हागणदारीमुक्त म्हणून घोषित झाले आहेत. केंद्र शासनाने १५ सप्टेंबर ते २ ऑक्टोबर २०१७ या कालावधीत सर्व राज्यांमध्ये 'स्वच्छता ही सेवा' हा उपक्रम घेतला होता. यामध्ये महाराष्ट्र राज्याला संपूर्ण देशात प्रथम क्रमांक मिळाला आहे.

### उज्ज्वला योजना : १७ लाख गॅस कनेक्शन

'प्रधानमंत्री उज्ज्वला योजने'अंतर्गत देशात ३ कोटीहून अधिक गॅस जोडणी करण्यात आली. जानेवारी २०१८ पर्यंत महाराष्ट्रात १७ लाखांहून अधिक गॅस कनेक्शन देण्यात आली.







देशातील दारिद्र्य रेषेखालील कुटुंबातील महिलांना गॅस जोडणी देणाऱ्या 'प्रधानमंत्री उज्ज्वला योजनेचा' शुभारंभ प्रधानमंत्री नरेंद्र मोदी यांनी १ मे २०१६ रोजी केला. देशातील ५ कोटी दारिद्र्य रेषेखालील कुटुंबाला एलपीजी गॅस जोडणी देण्याचे उद्दिष्ट ठेवण्यात आले आहे.

महाराष्ट्रात या योजनेचा शुभारंभ ऑक्टोबर २०१६ मध्ये झाला. गेल्या १५ महिन्यांच्या कालावधीत राज्यात १७ लाख १२ हजार ४२५ गॅस कनेक्शन देण्यात आली. मार्च २०१७ अखेर महाराष्ट्रात ८ लाख ५८ हजार ८०८ कनेक्शन देण्यात आली होती. गेल्या १० महिन्यात सुमारे ९ लाख गॅस कनेक्शन देण्यात आली आहेत.

### उजाला योजना : २ कोटी एलईडी बल्बचे वितरण

ऊर्जा बचतीसाठी एलईडी बल्ब हा एक पर्याय आहे. केंद्र शासनाने ऊर्जा बचतीच्या उद्देशाने एलईडी बल्ब वापरास प्रोत्साहन देण्यासाठी 'उजाला' योजना सुरू केली आहे. आजपर्यंत देशात २८ कोटींहून अधिक एलईडी बल्बचे वितरण करण्यात आले. या योजनेंतर्गत एलईडी बल्ब वापरास प्रोत्साहन देण्यासाठी महाराष्ट्रातील प्रत्येक जिल्ह्यात वितरण केंद्रे उघडण्यात आले. महाराष्ट्रात आतापर्यंत २ कोटी १६ लाख २१ हजार ३८२ इतक्या एलईडी बल्बचे वितरण करण्यात आले. ९२ हजार ७६९ एलईडी ट्युबलाईटचे वितरण करण्यात आले.

### जन धन योजनेच्या ४ हजार कोटींच्या ठेवी

प्रत्येक कुटुंबात किमान एक बँक खाते असावे, या उद्देशाने 'प्रधानमंत्री जन धन योजना' २८ ऑगस्ट २०१४ रोजी सुरू करण्यात आली. आर्थिक समावेशन हा या योजनेचा प्रमुख उद्देश आहे. या योजनेंतर्गत डिसेंबर २०१७ अखेर देशभरात ३० कोटींहून अधिक बँक खाती उघडण्यात आली. या बँक खात्यात ७१ हजार कोटींहून अधिक ठेवी जमा झाल्या आहेत. यामध्ये महाराष्ट्राचा वाटा ४ हजार ३२ कोटी रुपयांचा आहे. डिसेंबर २०१७ अखेर राज्यात २ कोटी १७ लाख ६९ हजार ३२४ बँक खाती उघडण्यात आली आहेत. यामध्ये ग्रामीण व निमशहरी बँकांमध्ये १ कोटी ४७ लाख १ हजार ६५७ बँक खाती तर शहरी व महानगरातील बँकांमध्ये १ कोटी २९ लाख ७ हजार ६६७ बँक खाती उघडण्यात आली. या बँक खात्यात एकूण ४ हजार ३२ कोटी ९९ लाख रुपयांच्या ठेवी जमा झाल्या आहेत.

### पाणथळ क्षेत्र व खारफुटी जंगलात वाढ

जलयुक्त शिवार योजना, पाणथळ विकास कार्यक्रम आदींच्या प्रभावी अंमलबजावणीमुळे राज्याच्या जंगलातील पाणथळ क्षेत्रात वाढ झाली असून, राज्यातील खारफुटी जंगलही ८२ चौ.किमी ने वाढल्याचे देशाच्या वर्ष-२०१७ वन अहवालातून स्पष्ट झाले. या

अहवालानुसार जंगलातील पाणथळ क्षेत्रात महाराष्ट्र पहिल्या क्रमांकावर आहे. राज्याच्या जंगलातील पाणथळ क्षेत्र ४३२ चौ.किमी. आहे. ४२८ चौ.किमी.सह गुजरात दुसऱ्या क्रमांकावर आहे. ३८९ चौ. किमी.सह मध्यप्रदेश तिसऱ्या क्रमांकावर आहे.

देशातील खारफुटी जंगलात एकूण १८१ चौ. किमी. एवढी वाढ झाली असून यात एकट्या महाराष्ट्राचा वाटा ८२ चौ. किमी. एवढा आहे. राज्यातील ठाणे (३१), रायगड (२९), मुंबई उपनगर (१६), सिंधुदुर्ग (५),रत्नागिरी (१) या जिल्ह्यांचा समावेश आहे.

### सिंचन व्यवस्थापनासाठी प्रथम पुरस्कार

देशात सर्वात जास्त पाणी वापर संस्था स्थापन करून, विक्रमी सिंचन व्यवस्था निर्माण करणाऱ्या महाराष्ट्र शासनाच्या जलसंपदा विभागाला; केंद्र शासनाच्या केंद्रीय सिंचन व ऊर्जा मंडळाच्या वतीने, उत्कृष्ट सिंचन व्यवस्थापनाचा प्रथम पुरस्कार प्रदान करण्यात आला. राज्यात सुमारे १३ लक्ष लाभक्षेत्रावर ३ हजार २४२ पाणी वापर संस्था स्थापन झाल्या आहेत.

### शहरी गरिबांसाठी १० हजार ६३९ घरे मंजूर

केंद्र शासनाकडून प्रधानमंत्री आवास योजना (शहरी) अंतर्गत महाराष्ट्रातील १५ शहरांतील गरिबांसाठी १० हजार ६३९ घरे मंजूर झाली आहेत. देशात एकूण ३ लाख २१ हजार ५६७ घरे मंजूर करण्यात आली. केंद्रीय गृह निर्माण व नगर विकास मंत्रालयाच्या केंद्रीय मंजुरी व देखरेख समितीच्या ३२ व्या बैठकीत, ही मंजुरी देण्यात आली. या बैठकीत महाराष्ट्रातील १५ शहरातील गरिबांसाठी ८६३ कोटींची गुंतवणूक आणि १५६ कोटींच्या साहाय्यासह १० हजार ६३९ घरे मंजूर करण्यात आली.

**यात राज्यातील पुढील शहरांचा समावेश :** पुणे शहर (पुणे), बार्शी (सोलापूर), कोल्हापूर शहर (कोल्हापूर), त्रिंबक (नाशिक), यावल (नाशिक), सिन्नर (नाशिक), जामनेर (अहमदनगर), बुलडाणा शहर (बुलडाणा), वरूड (अमरावती), अंमळनेर (जळगाव), चोपडा (जळगाव), मनमाड (नाशिक), लोहा (नांदेड), धर्माबाद (नांदेड) आणि पंढरपूर (सोलापूर) या शहरांमध्ये २०१७-१८ साठी एकूण १० हजार ६३९ घरे मंजूर झाली. या बैठकीत १८ हजार २०३ कोटींची गुंतवणूक व ४ हजार ७५२ कोटींच्या साहाय्यासह देशभरातील ३५ राज्य व केंद्रशासित प्रदेशांसाठी ३ लाख २१ हजार ५६७ घरे मंजूर करण्यात आली.

### आदिवासी विकासासाठी एक हजार कोटी

केंद्रीय आदिवासी मंत्रालयाच्यावतीने आदिवासी समाजाच्या विकासाकरिता आर्थिक वर्ष २०१७-१८ मध्ये देशासाठी २५ हजार २८५ कोटी ९० लाख रुपये मंजूर करण्यात आले. यात महाराष्ट्राला १ हजार १२० कोटी ८७ लाखांचा निधी मंजूर करण्यात आला.



आदिवासी समाजाच्या विकासासाठी देशभर केंद्र शासनाच्यावतीने २७३ योजना राबवण्यात येतात. या योजना राबवण्यासाठी केंद्र शासनाचे ३२ विभाग तसेच देशातील ३३ राज्य व केंद्रशासित प्रदेशांना ३० हजार ९७० कोटी ४९ लाखांच्या निधींचे वाटप करण्यात आले तर २५ हजार २८५ कोटी ९० लाख रुपये मंजूर करण्यात आले होते. देशातील ३३ राज्य व केंद्रशासित प्रदेशांसाठी एकूण २१ हजार २२९ कोटी २७ लाखांचा निधी मंजूर करण्यात आला. महाराष्ट्रासाठी १ हजार १२० कोटी ८७ लाखांच्या निधीस मंजुरी देण्यात आली. राज्य शासनाच्या एकूण ९ विभागांच्यावतीने आदिवासी विकासाच्या ३१ योजना राबवण्यात येतात. त्यानुसार संबंधित विभागाला हा निधी विभागून देण्यात येतो.

### चार जिल्ह्यात चार हजार घरे

देशातील जनतेला हक्काची घरे देण्यासाठी केंद्रीय ग्रामीण विकास मंत्रालयाच्यावतीने २० नोव्हेंबर २०१६ रोजी प्रधानमंत्री आवास योजनेची (ग्रामीण) सुरुवात करण्यात आली. या योजनेंतर्गत देशातील ११५ महत्त्वाकांक्षी जिल्ह्यांची निवड करण्यात आली असून महाराष्ट्रातील गडचिरोली, नंदुरबार, उस्मानाबाद व वाशिम या जिल्ह्यांचा समावेश आहे. या जिल्ह्यांतील ग्रामीण भागात १४ महिन्यांत एकूण ४ हजार ३७० घरे बांधण्यात आली आहेत.

**महाराष्ट्र परिचय केंद्र, नवी दिल्ली. संपर्क: ०८५८६९२७११२**

### विकास पर्यटन स्थळांचा...

देशातील महत्त्वाच्या पर्यटन स्थळांच्या विकासासाठी केंद्रीय पर्यटन मंत्रालयाच्यावतीने 'प्रतिष्ठित पर्यटन स्थळ प्रकल्प' हाती घेण्यात आला आहे. या प्रकल्पांतर्गत देशभरातील महत्त्वाच्या १२ पर्यटन स्थळांची निवड करण्यात आली आहे. यादीत उत्तर प्रदेशातील ताजमहल आणि फत्तेपूर सिक्री, महाराष्ट्रातील अंजिठा व वेरूळ लेण्या, दिल्लीतील हुमायुं मकबरा, कुतुबमिनार आणि लाल किल्ला, गोव्यातील कोळवा समुद्र किनारा, राजस्थानातील आमेर किल्ला, गुजरात मधील सोमनाथ मंदिर आणि ढोलाविरा, मध्यप्रदेशातील खजुराहो, कर्नाटकातील हंपी, तामीळनाडूतील महाबलीपूरम, आसाम मधील काझीरंगा अभायारण्य, केरळ मधील कुमारकोम आणि बिहार मधील महाबोधी विहाराचा समावेश करण्यात आला आहे.



# विधायक निर्धार

४ वर्षे नवभारताच्या उभारणीची



हंसराज अहिर, केंद्रीय गृहराज्य मंत्री

**नक्षलवाद हा महाराष्ट्राबरोबरच देशासाठी मोठी गंभीर समस्या आहे. वेळोवेळी जवानांवर नक्षलवाद्यांकडून हल्ले होतात. त्याला प्रत्युत्तर देण्यास आपले जवान आणि सुरक्षा यंत्रणा सक्षम आहे. गडचिरोलीच्या नक्षलप्रभावित क्षेत्रात सुरक्षा रक्षकांनी नुकतीच मोठी कारवाई करून ३१ पेक्षा जास्त नक्षलवाद्यांना कंठस्नान घातले. नक्षलवादाचा बीमोड, आत्मसमर्पण करणाऱ्या नक्षलवाद्यांचे पुनर्वसन, सुरक्षा दलाचे सशक्तीकरण आणि सागरी सीमेची सुरक्षा यासंबंधी केंद्रीय गृहराज्यमंत्री हंसराज अहिर यांनी लोकराज्यला दिलेल्या मुलाखतीत माहिती दिली.**

**राहुल पारचा**

**नक्षलवादाच्या उच्चाटनासाठी शासनाकडून केल्या जाणाऱ्या प्रयत्नांविषयी काय सांगाल?**

देशात गेल्या ३० वर्षांपेक्षा अधिक काळापासून नक्षलवादाने पाय रोवले आहेत. आपले सरकार आल्यानंतर प्रधानमंत्री नरेंद्र मोदी आणि गृहमंत्री राजनाथ सिंग यांनी नक्षलवादाचे समूळ उच्चाटन करण्याचा निर्धार केला. आम्ही त्या दिशेने निर्णायक पावले टाकत आहोत. घनदाट जंगलांना नक्षलवाद्यांनी आपला तळ बनवला आहे. त्यामुळे नक्षलवाद प्रभावित भागावर लक्ष केंद्रीत करून कठोर कारवाई केली जात आहे. १२६ जिल्ह्यांत नक्षलवाद्यांचा प्रभाव होता. या कठोर कारवायांमुळे हा आकडा आता ९० वर आला आहे. त्यातही नक्षलप्रभावित ९० जिल्ह्यांपैकी गेल्या वर्षभरात ५८ जिल्ह्यांमध्ये एकही नक्षलवादी हल्ला झालेला नाही. हे नक्षलविरोधी मोहिमेचे मोठे यश म्हणावे लागेल.



**गडचिरोली येथे आत्मसमर्पण केलेल्या नक्षलवाद्यांना जीवनोपयोगी साहित्याचे वाटप करताना केंद्रीय गृह राज्यमंत्री हंसराज अहिर.**

**आत्मसमर्पित नक्षलवाद्यांच्या पुनर्वसनासाठी कोणते प्रयत्न केले जात आहेत?**

आत्मसमर्पण करणाऱ्यांचे योग्य पुनर्वसन केले जात आहे. त्यांच्या सुरक्षेच्या दृष्टीने त्यांना हवा तेथे अधिवास करण्याचे तसेच त्यांच्या इच्छेप्रमाणे जगण्याचे स्वातंत्र्य त्यांना देण्यात आले आहे. त्यांना सुरक्षेची हमी दिली जाते. त्यांच्या पुनर्वसनासाठी सरकार अनेक योजना राबवत आहे. त्यांना मुख्य प्रवाहात आणले जात आहे. रोजगार संधी उपलब्ध करून दिल्या जात आहेत. त्यासाठी कौशल्य विकास अभ्यासक्रमही राबवला जात आहे. तीन महिन्यांच्या कौशल्य अभ्यासक्रमातून त्यांना प्रशिक्षित केले जाते. त्यांना रोजगारक्षम बनवले जाते. कसण्यायोग्य जमीन आणि राहण्यासाठी घर उपलब्ध करून दिले जाते. त्याचबरोबर शैक्षणिक पात्रतेनुसार त्यांना नोकरीही दिली जाते. अन्नधान्य, आरोग्य विमा आदी विविध योजनांना लाभ विनामूल्य दिला जात आहे.

**महाराष्ट्र, तेलंगणा आणि छत्तीसगड राज्यांच्या सीमेवर पोलिसांना चकमा देणाऱ्या नक्षलवाद्यांचा सामना कसा केला जात आहे?**

तीनही राज्यातील पोलीस एकमेकांशी समन्वय साधून या समस्येचा सामना करत आहेत. महाराष्ट्र आणि तेलंगणाच्या पोलिसांनी यामध्ये मोठे यश संपादन केले आहे. छत्तीसगढ पोलीसही चांगले काम करत आहेत.

**सागरी सुरक्षेची काय स्थिती आहे?**

सागरी किनाऱ्यांवर सागरी पोलीस दुर्बिणीद्वारे पाळत ठेवून असतात. यासाठी ड्रोन कॅमेऱ्यांचादेखील उपयोग करण्याचे विचाराधीन आहे. केंद्र आणि राज्य शासन सागरी सीमा सुरक्षेच्या दृष्टीने हातात हात घालून काम करत आहे. सागरी पोलिसांना बोट व इतर आवश्यक साधनसामुग्री पुरेशा प्रमाणात पुरवली जात आहे. वेळोवेळी सागरी सुरक्षा जवानांना प्रशिक्षणही दिले जाते.

**दिल्ली पोलीस भरती प्रक्रियेच्या केंद्रीकरणाबाबत काय सांगाल?**

या पोलीस भरती प्रक्रियेचे केंद्रीकरण आवश्यक आहे. देशातील उमेदवारांना भरती प्रक्रियेसाठी दिल्लीला येण्याची गरज भासणार नाही. त्यादृष्टीने महाराष्ट्रातील उमेदवारांसाठी नागपूरमध्ये ही सुविधा उपलब्ध करून देण्यात आली. पूर्व-ईशान्य भारतातील युवकांसाठी अशी सुविधा उपलब्ध करून देण्याचा प्रयत्न आहे.

**मुख्य प्रवाहात येऊ इच्छिणाऱ्या नक्षलवाद्यांना काय सांगाल?**

महान पुरुषांचा आदर्श डोळ्यासमोर ठेवून नक्षलवाद्यांनी शस्त्राची भाषा सोडावी. त्यांनी मुख्य प्रवाहात यावे. कुठल्याही सरकारविरोधात आपल्या लोकशाहीत, संविधानिक मार्गाने विरोध करता येतो. त्यासाठी शस्त्रांची गरज नाही.

**(लेखक दिल्ली येथे पत्रकार आहेत.)**

**खुल्या प्रवर्गातील आर्थिक दुर्बल घटकातील विद्यार्थ्यांसाठी महाराष्ट्र शासनाने १३ ऑक्टोबर २०१६ रोजी सुरू केलेली डॉ. पंजाबराव देशमुख वसतिगृह निर्वाह भत्ता योजना खुल्या प्रवर्गातील आर्थिकदृष्ट्या दुर्बल घटकातील विद्यार्थ्यांच्या शिक्षणाला उभारी देणारी योजना ठरत आहे.**

# राहण्याची चिंता मिटली...

**हर्षल आकुडे**

महाराष्ट्र हे पुरोगामी व कल्याणकारी राज्य आहे. महाराष्ट्राने वंचित घटकांसाठी अनेक महत्त्वपूर्ण निर्णय घेतले आहेत. तथापि, सर्वसाधारण गटातील गरीब मुलांचा प्रश्न राज्यासमोर होता. यावर उपाय म्हणून १३ ऑक्टोबर २०१६ रोजी शासननिर्णय निर्गमित करून विद्यार्थ्यांच्या हिताचा निर्णय घेतला गेला. आर्थिक परिस्थितीमुळे शिक्षण घेऊ न शकणारे किंवा वेळप्रसंगी शिक्षण सोडून देणाऱ्या विद्यार्थ्यांसाठी, या निर्णयाने मोठी संधी प्राप्त झाली आहे. शिक्षणापासून कोणीही वंचित राहू नये यासाठी मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी हा धाडसी निर्णय घेतला आहे.



### योजनेचे स्वरूप

या योजनेंतर्गत खुल्या प्रवर्गातील आर्थिक दुर्बल घटकातील

> डॉ. पंजाबराव देशमुख वसतिगृह निर्वाह भत्ता योजना सुरू झाल्यानंतर माझ्या समस्या बऱ्यापैकी सुटल्या आहेत. योजनेतून मिळालेल्या पैशातून जेवण व राहण्याचा खर्च भागतो. त्यामुळे घरी पैसे मागण्याची वेळ येत नाही.
>
> **– वंदना शिवाजी गलधर, शासकीय तंत्रनिकेतन, पुणे, (मु. पो. आडपिंपरी, ता. गेवराई, जि. बीड)**

केंद्रीभूत प्रवेश प्रक्रियेद्वारे प्रवेशित विद्यार्थ्यांना दरमहा वसतिगृह निर्वाह भत्ता देण्यात येतो. यात राज्यातील महानगरांमध्ये (मुंबई, पुणे महानगर प्रादेशिक विकास प्राधिकरण क्षेत्रातील सर्व शहरे, औरंगाबाद, नागपूर इत्यादी) वसतिगृहात राहून व्यावसायिक शिक्षण घेणाऱ्या विद्यार्थ्यांना प्रतिमहा ३००० तर अन्य ठिकाणी असलेल्या वसतिगृहांमधील विद्यार्थ्यांसाठी प्रतिमहा २००० रुपये निर्वाह भत्ता (हॉस्टेल मेन्टेनन्स अलाऊन्स) देण्याची तरतूद आहे. ज्या विद्यार्थ्यांचे पालक अल्पभूधारक शेतकरी किंवा नोंदणीकृत मजूर आहेत, ज्यांचे वार्षिक उत्पन्न सहा लाख रुपयांपेक्षा कमी आहे, असे विद्यार्थी या योजनेचा लाभ घेण्यास पात्र ठरतात. शैक्षणिक वर्ष २०१७–१८ साठी योजनेची उत्पन्न मर्यादा सहा लाखांवरून आठ लाख रुपये करण्यात आली आहे.

पालक अल्पभूधारक शेतकरी किंवा नोंदणीकृत मजूर नाहीत, परंतु ज्यांचे वार्षिक उत्पन्न एक लाख किंवा त्यापेक्षा कमी आहे, अशा विद्यार्थ्यांनाही योजनेचा लाभ घेता येऊ शकतो. या विद्यार्थांना प्रचलित व नव्याने समाविष्ट करण्यात येणाऱ्या निवडक व्यावसायिक अभ्यासक्रमांसाठी शैक्षणिक वर्षातील १० महिन्यांकरिता एकूण ३००० रुपये निर्वाह भत्ता अदा करण्यात येतो. डॉ. पंजाबराव देशमुख वसतिगृह निर्वाह भत्ता योजनेचा लाभ कुटुंबातील केवळ दोन अपत्यांपर्यंत मर्यादित आहे.

डॉ. पंजाबराव देशमुख वसतिगृह निर्वाह योजनेंतर्गत २०१६–१७ या एका वर्षात पुणे विभागातील पाच जिल्ह्यांमध्ये १० हजार ८३२ विद्यार्थ्यांना लाभ मिळाला. यासाठी २५ कोटी ७० लाख रुपये इतका निधी खर्च झाला. तर २०१७–१८ मध्ये लाभार्थी विद्यार्थ्यांच्या संख्येत वाढ होऊन हा आकडा वाढून १३ हजार ६८० पेक्षा वर गेला. ही योजना ही खुल्या प्रवर्गातील आर्थिक दुर्बल घटकातील विद्यार्थ्यांसाठी एक महत्त्वाकांक्षी योजना आहे.

**संहिता लेखक, विभागीय माहिती कार्यालय, पुणे.**
**संपर्क : ०९६३७१४३५४४**

> शासकीय तंत्रनिकेतनमध्ये व्यावसायिक शिक्षणास प्रवेश घेतल्यानंतर अनेक वेळा अपेक्षेपेक्षा जास्त खर्च होतो. त्यामुळे माझ्यासारख्या गरीब मराठा समाजातील विद्यार्थ्यांसाठी डॉ. पंजाबराव देशमुख वसतिगृह निर्वाह भत्ता योजना वरदान ठरली आहे.
>
> **– आशिष जालिंदर चतुर, शासकीय तंत्रनिकेतन, पुणे, (धुमाळवाडी, ता. कोरेगाव, जि. सातारा)**

आपले सरकार आपल्या योजना

**गेल्या ४६ वर्षांपासून आदिवासी विद्यार्थ्यांना शिक्षणाच्या मुख्य प्रवाहात आणणाऱ्या आदिवासी विकास विभागाने, आता दरवर्षी २५ हजार विद्यार्थ्यांना नामांकित इंग्रजी शाळांमधून शिक्षण देऊन एकप्रकारे 'वाघिणीचे दूध' पाजण्यास सुरुवात केली आहे. दरवर्षी ५० हजार विद्यार्थ्यांसाठी इंग्रजी माध्यमातील शिक्षणाचे दरवाजे उघडून त्यांना समाजाच्या मुख्य प्रवाहात आणले जात आहे.**



# एकलव्यांची इंग्रजी

**नरेंद्र जोशी**

१९७२ च्या सुमारास आदिवासी विकास विभागाची स्थापना झाली. त्यानंतर प्राथमिक शिक्षण या खात्याने सुरू केले. आदिवासीबहुल १७ जिल्हे व ६८ तालुक्यांमध्ये शिक्षणाची गंगा नेली. ५३१ आश्रमशाळांच्या माध्यामातून दुर्गम खेड्यापाड्यांपर्यंत शिक्षण पोहोचवले. प्रारंभी सातवीपर्यंत शिक्षण दिले. आता १२वी पर्यंत शिक्षणाची जबाबदारी सांभाळली आहे. मराठी माध्यमातून शिक्षण दिले जात असले तरी इंग्रजीचे वाढते महत्त्व लक्षात घेऊन, या विद्यार्थ्यांनाही इंग्रजी माध्यमातून शिक्षण दिले पाहिजे, असा एक मतप्रवाह व्यक्त झाला. २००५ पासून इंग्रजी माध्यमातून शिक्षण देण्याचे प्रयत्न आदिवासी विकास विभागामार्फत सुरू करण्यात आले.

पहिली ते पाचवीपर्यंत इंग्रजी माध्यमातून शिक्षणास सुरुवात करताना प्रथम १४ एकलव्य व ११ आश्रमाशाळातून इंग्रजीतून शिकवण्यास सुरुवात झाली. एकलव्य शाळांमधून ५,८८० विद्यार्थी व ११ इंग्रजी आश्रमाशाळांमधून साडे पाच हजार विद्यार्थी यातून शिक्षण घेत होते. मात्र इंग्रजीचे महत्त्व वाढतच जाऊन पालकांचा ओढाही त्याकडे कायम होता. काळाची गरज ओळखून नामांकित इंग्रजी शाळांचा पर्याय पुढे आला.

२०११ पासून शासनाने दरवर्षी अडीच हजार विद्यार्थ्यांना नामांकित शाळेत प्रवेश देऊन त्यांचे शुल्क त्या शाळांना देण्यास सुरुवात केली. २०१४ पर्यंत अडीच हजार विद्यार्थ्यांना नामांकित शाळेत पाठवले जात होते.

२०१५ ला आदिवासी विकास विभागाने अडीच हजाराची मर्यादा दहापटीने वाढवली. तब्बल २५ हजार विद्यार्थ्यांना नामांकित शाळेचा मार्ग मोकळा करून दिला. राज्यात १८५ नामांकित शाळेत हे विद्यार्थी शिक्षण घेत आहेत. उद्दिष्ट २५ हजाराचे असले तरी तेवढे विद्यार्थी अद्याप साध्य झालेले नाही. सध्या १९ हजार विद्यार्थी यात शिक्षण घेत आहे. अशा प्रकारे किमान ५० हजार विद्यार्थ्यांना इंग्रजीतून शिक्षणाचा मार्ग मोकळा झाला आहे.

आजमितीस १ लाख ६६ हजार विद्यार्थ्यांसाठी आदिवासी विकास विभागाच्या ५०२ शासकीय व ५५६ अनुदानित आश्रमशाळा कार्यरत आहेत. ६० हजार विद्यार्थी वसतिगृहात राहून शिक्षण घेत आहेत. ५५ हजार विद्यार्थ्यांना शिष्यवृत्तीचा लाभ होत आहे. एकूण २० लाख आदिवासी विद्यार्थ्यांच्या या विभागामुळे शिक्षणाचा लाभ झाला आहे. १४ लाख विद्यार्थी १०वी पर्यंत शिक्षण घेत आहे. १२ वर्षांपूर्वी ज्यांना इंग्रजी माध्यमातून धडे गिरवण्यास सुरुवात केली. ते आता वैद्यकीय व अभियांत्रिकी शाखेत प्रवेश घेत आहेत. काही विद्यार्थी स्पर्धा परीक्षेतून मोठमोठी पदे मिळवत आहेत. ते जेव्हा आदिवासी विकास विभागात कामानिमित्त येऊन फाड फाड इंग्रजीतून संभाषण करतात, त्या वेळी येथील कर्मचाऱ्यांना त्यांची प्रगती पाहून अभिमानाने उर भरून आल्याशिवाय राहत नाही.

## अशा निवडल्या जातात नामांकित शाळा

नामांकित शाळा निवडण्यासाठी एक समिती असते. ज्या शिक्षण संस्थेच सर्व सोयी आहेत. ज्यांच्या शिक्षणाचा दर्जा उच्च आहे. त्यांची निवड केली जाते. सर्वसाधारण महापालिका हद्दीतील शाळा असल्यास प्रतिविद्यार्थी ५० हजार रुपये, जिल्हास्तरीय मुख्यालयीन शाळेला ४५ हजार रुपये, तालुकास्तरीय शाळेला ४० हजार रुपये, पाचगणी, महाबळेश्वर, चिखलदरा, लोणावळा, पन्हाळा या थंड हवेच्या ठिकाणी ५० हजार रुपये दिले जातात. त्यातही गुणांकानुसार चार प्रकार आहेत. ज्या शाळा ८० व त्यापेक्षा जादा गुणांक मिळवतात. त्यांना ७० हजार, ७० ते ७९ गुणांक मिळवणाऱ्या शाळांना साठ हजार, ६० ते ६९ गुणांक मिळवणाऱ्यांना ५० हजार व साठपेक्षा कमी गुणांक असणाऱ्यांना बाद ठरवले जाते. नामांकित म्हणवणाऱ्या शाळांमध्ये उच्चप्रतीच्या शिक्षणाबरोबरच स्वतंत्र प्रयोगशाळा, ग्रंथालय, क्रिडांगण पाहिजे. क्रीडा व कला शिक्षकाची नियुक्ती हवी, भोजनासाठी अद्ययावत व्यवस्था असावी, सहलीचे आयोजन केले जावे. २० मुलांमागे एक स्नानगृह, एक शौचालय असावे. पूर्णवेळ वैद्यकीय सेवा उपलब्ध हवी. विद्यार्थ्यांनी समाधान व्यक्त केलेले असावे. या सर्व अटी शर्ती पूर्ण करणाऱ्यांनाच मान्यता मिळते. शालेय तपासणी कधीही केली जाते. दर्जा टिकवून ठेवलेला नसल्यास मान्यता रद्द केली जाते.

दै.सकाळ नाशिक

**महाराष्ट्राच्या आर्थिक व सामाजिक विकासासाठी सर्वसमावेशक व सहभागाची संकल्पना प्रत्यक्षात राबवण्यासाठी मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी मुख्यमंत्री कार्यालयामध्ये 'सहभाग' – सामाजिक उत्तरदायित्व व्यासपीठाची स्थापना केली आहे.**

# सर्वसमावेशक 'सहभाग'

**किरण राजेंद्र पवार**

प्रत्येक समाजघटकाला राज्याच्या विकासात योगदान देता यावे व विविध समाजघटकांचे असे प्रयत्न अधिक प्रभावी व्हावेत, यासाठी त्यांच्यामध्ये एकसूत्रता आणणे हा सहभागच्या स्थापनेमागील उद्देश. विकासाच्या प्रक्रियेत सरकारी व बिगर-सरकारी यंत्रणांना एकत्र आणणारे प्रमुख व्यासपीठ म्हणून भूमिका बजावण्यास 'सहभाग' उत्सुक आहे. खासगी कंपन्या, सामाजिक संस्था, शैक्षणिक संस्था, नागरिक यांचा विकास कामातील सहभाग सुलभ व्हावा यासाठी या व्यासपीठाद्वारे प्रयत्न केले जातात. सीएसआर प्रकल्पांतर्गत खासगी कंपन्या व प्रशासनामध्ये समन्वय साधणे, सरकारी व खासगी भागीदारीतून प्रकल्प राबवणे, नागरिक व विद्यार्थ्यांसाठी स्वेच्छेने काम करण्यासाठी संधी, इंटर्नशिपच्या संधी अशा एक ना अनेक माध्यमातून समाजाचा सहभाग विकास प्रक्रियेत मिळवण्यासाठी 'सहभाग' प्रयत्नशील आहे.

## सामाजिक विकासाचे प्रकल्प

पालघर जिल्ह्यामध्ये गावांच्या सामूहिक विकासासाठी टाटा मोटर्ससोबत भागीदारी, अमरावतीमधील महिलांना सौर ऊर्जेवर चालणाऱ्या चरख्यांच्या माध्यमातून खादी उद्योगासाठी आयसीआयसीआय-टीएफजीच्या माध्यमातून सहकार्य, चेंबूर येथील स्वामी विवेकानंद कॉलेजच्या विद्यार्थ्यांकडून महिला बचतगटांना संगणक, संवाद कौशल्य यासाठी दिलेले प्रशिक्षण अशा प्रकल्पांवर सहभाग कार्यरत आहे. महिला आर्थिक विकास महामंडळ, खादी व ग्रामोद्योग मंडळ या सारख्या सरकारी संस्था, ग्रामविकास व शेती क्षेत्रात काम करणारी बायफ, अपंगांसाठी काम करणारी हेलन केलर, कला व संस्कृती क्षेत्रात काम करणारी काळा घोडा असोसिएशन अशा अनेक अशासकीय संस्थांसोबत विविध प्रकल्पांवर 'सहभाग' काम करत आहे. मुख्यमंत्र्यांच्या विशेष कार्य अधिकारी प्रिया खान, निधी कामदार यांच्यासोबत मुख्यमंत्री फेलोजची टीम असे अनेक प्रकल्प मार्गी लावण्यासाठी व सामूहिक भागीदारीने शाश्वत सामाजिक विकासाचे प्रकल्प राबवण्यासाठी झटत आहेत.

## काळा घोडा कला महोत्सव

अलीकडेच सहभागच्या माध्यमातून राज्याच्या विविध भागातील आदिवासी व महिला कारागिरांना देशातील सर्वात मोठ्या काळा घोडा



कला महोत्सवात आपली कला सादर करण्याची व वस्तूंच्या विक्रीतून उत्पन्न मिळवण्याची संधी मिळाली. ३ ते ११ फेब्रुवारी या ९ दिवसात हजारो देशी विदेशी नागरिकांनी, कलारसिकांनी या महोत्सवास भेट दिली. विविध कलाविष्कार व कलात्मक वस्तूंच्या स्टॉलबरोबरच सहभागने उभा केलेला स्टॉल सर्वांचे लक्ष वेधून घेत होता.

या स्टॉलवर राज्याच्या विविध प्रांतातील हस्तकला प्रदर्शित केल्या होत्या. पालघरच्या वारली कलाकारांनी नैसर्गिक रंगांमधून साकारलेली वारली चित्रे, कलात्मक वस्तू, कागदाच्या लगद्यापासून

> या महोत्सवात सहभागी होण्याची व ग्राहकांशी प्रत्यक्ष संवाद साधण्याची संधी देण्यासोबतच, आम्हाला आवश्यक सुविधा मिळाव्यात, यासाठी मुख्यमंत्री कार्यालयातील सहभाग टीमचे खूपच सहकार्य मिळाले.
>
> **– कल्पेश गोवारी, वारली कलाकार, डहाणू.**

> आम्ही तयार केलेल्या वस्तूंचे पॅकेजिंगही आकर्षक असले पाहिजे हे आमच्या लक्षात आले. ग्राहकांशी संवाद साधून त्यांना प्रत्येक कलाकृती तयार करण्याची प्रक्रिया व त्यासाठी घेतलेली मेहनत ही सांगायला हवी हे आम्हाला समजले.
>
> **– रूणाल आडेवार, बांबू संशोधन व प्रशिक्षण संस्था, चंद्रपूर**

तयार केलेल्या वस्तू, सुकलेल्या दुधी भोपळ्यापासून बनवलेली तारपा व इतर वाद्ये, अमरावतीतील महिलांनी सौर चरखा व हातमागावर बनवलेली खादीची वस्त्रे, ओवा, सूर्यफूल अशा विविध फुलांचा कोल्हापूर येथील मध, भंडाऱ्यातील महिलांनी तयार केलेल्या टसरच्या साड्या, मुंबईतील अल्पसंख्याक महिलांच्या गटाने बनवलेली आभूषणे, चंद्रपूरच्या आदिवासी कलाकारांनी तयार केलेल्या बांबूच्या विविध वस्तूंनी सहभागचा स्टॉल ओसंडून वाहत होता. स्वत: कलाकार या स्टॉलवर उपस्थित होते. आपली कला व कलावस्तूंची माहिती लोकांना सांगत होते. हे 'सहभाग'च्या स्टॉलचे वैशिष्ट!

शहरी नागरिकांशी स्वत: संवाद साधण्याची ही संधी मुख्यत: ग्रामीण भागातून आलेल्या कलाकारांसाठी महत्त्वाची होती. यासोबतच चरख्यावर सूत कातण्याचे व वारली चित्र बनवण्याचे प्रात्यक्षिक व स्वत: करून पाहण्याची संधी यामुळे लहानथोर नागरिक सहभागाच्या स्टॉलकडे आकर्षित होत होते. कलारसिक नागरिकांनी या उपक्रमास भरभरून प्रतिसाद दिला.

या स्टॉलसोबतच महाराष्ट्रातील प्रसिद्ध पर्यटन स्थळे दर्शवणारा १५ फूट उंचीचा 'कल्पवृक्ष' आकर्षणाचा केंद्रबिंदू होता. महाराष्ट्र पर्यटन महामंडळाने या कल्पवृक्षासोबत सेल्फी काढण्याच्या स्पर्धेचे केलेले आयोजन व आकर्षक बक्षिसे यामुळे कल्पवृक्षाभोवती गर्दी झाली.

काळा घोडा महोत्सवातील हा सहभाग विविध सरकारी व खासगी संस्थांच्या समन्वयाने यशस्वी झाला. ग्रामीण कारागिरांना अशी संधी मिळवून देण्याची संकल्पना मांडली असता काळा घोडा असोसिएशनने आमचे स्वागतच केले व कोणतेही शुल्क न आकारता स्टॉल देऊ केला. महिला आर्थिक विकास महामंडळ (माविम), महाराष्ट्र राज्य खादी व ग्रामोद्योग मंडळ, चंद्रपूर येथील बांबू संशोधन व प्रशिक्षण संस्था, आदिवासी विकास विभाग या शासकीय यंत्रणांमुळे आदिवासी व महिला कारागिरांपर्यंत पोहोचता आले. विझक्राफ्ट या खासगी कंपनीने कोणताही मोबदला न घेता स्टॉल डिझाईन, कल्पवृक्षाची निर्मिती केली. विविध विभागांसोबत काम करणाऱ्या मुख्यमंत्री फेलोजनी स्वत:हून हजर राहत ग्रामीण कलाकारांना स्टॉलला भेट देणाऱ्यांशी संवाद साधण्यात मदत केली.



९ दिवसांमध्ये १० लाखांहून अधिक रकमेची विक्री करत सर्व कलाकारांनी चमकदार कामगिरी केली. मात्र त्याहीपेक्षा महत्त्वाचे होते या कलाकारांना प्रतिष्ठेच्या कला महोत्सवात आपली कला सादर करण्याची मिळालेली संधी. ग्राहकांशी थेट संवाद साधण्यातून मिळालेला आत्मविश्वास व कला रसिकांकडून मिळालेला प्रतिसाद. या महोत्सवाच्या निमित्ताने महाराष्ट्राची हस्तकला क्षेत्रातील क्षमता वाढवून अधिक रोजगार निर्मिती करण्यास असलेली संधी, शहरांकडे होणारे स्थलांतर रोखण्याची शक्यता व राज्यातून लुप्त होत असलेल्या हस्तकलांना जीवनदान देण्याची संधी अशा अनेक विषयांवर चर्चा झाल्या.

अभिनव

### महाट्राईब

आदिवासींनी तयार केलेल्या वस्तू वा इतर उत्पादनांचे ब्रॅन्डिंग व मार्केटिंग करून विविध बाजारपेठांपर्यंत पोहोचण्याची आवश्यकता या महोत्सवामुळे लक्षात आली. म्हणूनच आता आम्ही राज्यभरातील आदिवासी उत्पादनांसाठी 'महाट्राईब' हा ब्रॅण्ड तयार केला असून, मॅग्नेटिक महाराष्ट्र २०१८ या व्यापार परिषदेमध्ये आम्ही त्याचे अनावरण केले. राज्यभरातील आदिवासींनी तयार केलेल्या हस्तकलांच्या विकासासाठी 'महाट्राईब' काम करेल, असे आदिवासी विकास विभागाच्या सचिव मनीषा वर्मा यांनी सांगितले.

सध्या या महोत्सवात सहभागी झालेल्या सर्व यंत्रणा एकत्र येऊन, हस्तकला उद्योगाच्या क्षमता अधिक वृद्धिंगत करण्यासाठी काम करत आहेत. त्यांच्यातील समन्वयाचे काम 'सहभाग' करते. सर्व यंत्रणा एकत्र आल्यामुळे या प्रयत्नातून मोठे काम उभे राहील यात शंकाच नाही. एकात्मिक विकासासाठी 'सहभाग'ला पर्याय नाही.

### उपजीविकेची संधी

आदिवासी व महिला कारागिरांना उपजीविकेच्या संधी देण्याच्या उद्देशाने आम्ही हा उपक्रम हाती घेतला. येथे होणाऱ्या विक्रीसोबतच येथे येणाऱ्या ग्राहकांच्या संपर्कात राहून, या कलाकारांना भविष्यासाठी बाजारपेठ उपलब्ध व्हावी असा प्रयत्न होता. तो यशस्वी झाला. समन्वयाने काम केल्यास ते अधिक परिणामकारक होते हे या उपक्रमाने सिद्ध केले आहे. शासकीय यंत्रणा व खासगी संस्था एकत्र आल्यामुळेच हा उपक्रम यशस्वी झाला असून, आमचे काम केवळ सर्वांमध्ये दुवा साधण्याचे होते, असे मुख्यमंत्री कार्यालयातील विशेष कार्य अधिकारी प्रिया खान यांनी सांगितले.

**मुख्यमंत्री फेलो, सहभाग टीम सदस्य**

# येथे कर माझे जुळती...

स्मरण

**मे महिन्यात शासकीय व निमशासकीय स्तरावर स्वातंत्र्यवीर वि.दा.सावरकर आणि पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर यांची जयंती साजरी केली जाते. त्यांचे पुण्यस्मरण...**

## स्वातंत्र्यवीर विनायक दामोदर सावरकर



स्वातंत्र्यवीर विनायक दामोदर सावरकर यांचा जन्म २८ मे १८८३ रोजी भगूर (जि. नाशिक) येथे झाला. सन १९०० मध्ये त्यांनी नाशिक येथे मित्रमेळा ही क्रांतिकारकांची गुप्त संघटना स्थापन केली. १९०४ साली याच संघटनेला 'अभिनव भारत' असे नाव देण्यात आले. उच्च शिक्षण घेण्याच्या निमित्ताने स्वातंत्र्यवीर सावरकर इंग्लंडला गेले. तेथून त्यांनी अभिनव भारत संघटनेच्या भारतातील सदस्यांना क्रांतिकारी वाङ्मय, पिस्तुले आदी साहित्य पाठवण्यास सुरुवात केली. त्यांनी जोसेफ मॅझिनी या प्रसिद्ध इटालियन क्रांतिकारकाचे स्फूर्तिदायी चरित्र लिहिले, १८५७ चा उठाव हे पहिले स्वातंत्र्ययुद्ध होते, असे प्रतिपादन करणारा '१८५७ चे स्वातंत्र्यसमर' हा ग्रंथ त्यांनी लिहिला. ब्रिटिश सरकारला 'अभिनव भारत' संघटनेच्या कार्याचा सुगावा लागला. सरकारने स्वातंत्र्यवीर सावरकर यांचे बंधू बाबाराव सावरकर यांना अटक केली. त्यांना जन्मठेपेची शिक्षा झाली. या शिक्षेचा बदला घेण्यासाठी अनंत लक्ष्मण कान्हेरे या युवकाने नाशिकचे कलेक्टर जॅक्सन याचा वध केला. सरकारने अभिनव संघटनेशी संबंधित असलेल्या लोकांना अटक करण्यास सुरुवात केली. जॅक्सनच्या वधाचा संबंध सरकारने स्वातंत्र्यवीर सावरकरांशी जोडला आणि त्यांना अटक करून त्यांच्यावर खटला भरला. न्यायालयाने त्यांना पन्नास वर्षांची सश्रम कारावासाची शिक्षा फर्मावली. १९२३ मध्ये मुंबईचे राज्यपाल लाईड जार्ज यांची सावरकरांच्या मुक्ततेविषयी चर्चा करण्यात आली. १९२४ मध्ये राजकारणात भाग न घेणे व रत्नागिरी जिल्ह्यात राहणे या दोन अटींवर येरवडा कारागृहातून सुटका करण्यात आली. १९३७ मध्ये रत्नागिरी स्थलबद्धतेतून विनाअट संपूर्ण मुक्तता करण्यात आली. १९३८ मध्ये 'साहित्य संमेलना'चे अध्यक्ष म्हणून त्यांची निवड झाली. ऑगस्ट १९४३ मध्ये नागपूर-विद्यापीठाने तर १९५९ मध्ये पुणे विद्यापीठाने 'डी-लिट' पदवी दिली. २६ फेब्रुवारी १९६६ रोजी त्यांचे निधन झाले.

## अहिल्यादेवी होळकर



अहिल्यादेवी होळकर यांचा जन्म चौंडी येथे झाला. वडील माणकोजी शिंदे यांच्याकडे चौंडी गावाची पाटिलकी होती. अहिल्यादेवी यांचा सुभेदार मल्हारराव होळकर यांचा मुलगा खंडेराव यांच्याशी विवाह झाला. खंडेराव लढाईत मरण पावले. तेव्हा अहिल्यादेवी होळकर यांनी मल्हारराव होळकरांच्या सांगण्यावरून सती जाण्यास नकार दिला. वैधव्य आले असताना राजकीय सत्तेची सूत्रे हाती घेऊन, त्यांनी निर्भीडपणे राज्यकारभार केला. अहिल्यादेवी होळकरांवर इंदूर संस्थानच्या सुभेदारीची जबाबदारी पडली. कोणत्याही प्रसंगाला न डगमगता त्या दौलतीचा कारभार पाहू लागल्या. अहिल्यादेवी यांनी राज्यातील तत्कालीन आर्थिक स्थितीचा विचार करून कर पद्धतीमध्ये जनतेस सवलत दिली. उत्पन्नानुसार शेतसारा घेण्यास सुरुवात केली. गावोगावी न्यायपंचायती स्थापन केल्या. त्यांनी आदिवासी असलेल्या भिल्ल, गौंड जमातींना पडीक जमिनी लागवडीसाठी दिल्या. त्यांच्यावर राज्याच्या विशिष्ट भागांच्या संरक्षणाची जबाबदारी सोपवली. त्यांनी बारा ज्योतिर्लिंगांचा जीर्णोद्धार केला. बनारस, त्र्यंबकेश्वर येथे घाट बांधले. घृष्णेश्वर, गोकर्ण महाबळेश्वर, उज्जैनचा महाकालेश्वर, रामेश्वर, भीमाशंकर आदी ठिकाणी अन्नछत्रे उभारण्याचे कार्य केले. पंढरपूर, कोल्हापूर, नाशिक, जेजुरी, वेरुळ, चिंचवड, पुणतांबे, राजापूर, संगमनेर, पुणे, निमगाव, ओझर, रावेर आदी ठिकाणी नवीन मंदिरे व घाट बांधले. कोलकाता, काशी येथील रस्त्यांचे बांधकाम केले. द्वारका, बद्रीनारायण, जगन्नाथपुरी आदी ठिकाणी बाग, कुंड, अन्नछत्रे आदी सुविधांची सोय केली. गोरगरिबांना राहण्या-खाण्याच्या सुविधा पुरवण्याचे कार्य त्यांनी केले. यामुळेच त्यांना पुण्यश्लोक ही उपाधी देण्यात आली.

**(संदर्भ- मराठी विश्वकोश आणि इयत्ता ८वी इतिहास,** http://savarkar.org)

**संकलन: गजानन पाटील**

## दहशतवाद व हिंसाचार विरोधी दिवस

भारत सरकारच्या केंद्रीय गृहमंत्रालयामार्फत २१ मे हा दिवस दरवर्षी दहशतवाद व हिंसाचार विरोधी दिवस म्हणून पाळण्यात येतो. त्यानुसार राज्यातील सर्व सरकारी कार्यालयात हा दिवस पाळला जातो. दहशतवाद व हिंसाचार विरोधी दिन या कार्यक्रमात शाळा महाविद्यालयांमध्ये वादविवाद, चर्चासत्रे व व्याख्याने आयोजित केली जातात.

**प्रतिज्ञा:** आम्ही, भारताचे नागरिक, आपल्या देशाच्या अहिंसा व सहिष्णुतेच्या परंपरेविषयी दृढ निष्ठा बाळगून याद्वारे, सर्व प्रकारच्या दहशतवादाचा व हिंसाचाराचा आमच्या सर्व शक्तीनिशी मुकाबला करण्याची गांभीर्यपूर्वक प्रतिज्ञा करत आहोत. आम्ही प्रतिज्ञा करतो की, आम्ही सर्व मानवजातीमध्ये शांती, सामाजिक एकोपा आणि सामंजस्य टिकवू वर्धिष्णू करू, तसेच मानवी जीवित आणि मूल्य धोक्यात आणणाऱ्या विघटनकारी शक्तींचा प्रतिकार करू.


मुख्यमंत्री फेलोशिप कार्यक्रम
२०१८
Chief Minister Fellowship Maharashtra
सत्यमेव जयते
महाराष्ट्र शासन
"विकासाच्या वाटचालीत माझ्यासोबत सहभागी व्हा!"
देवेंद्र फडणवीस
मुख्यमंत्री
युवकांसाठी प्रशासनात सहभागी होण्याची व राज्याच्या विकासाला हातभार लावण्याची संधी.
२१ ते २६ वयोगटातील किमान एक वर्षाचा अनुभव असलेल्या प्रथम वर्ग पदवीधर युवकांचे या ११ महिन्याच्या फेलोशिप कार्यक्रमामध्ये स्वागत आहे.
अधिक तपशीलासाठी : https://mahades.maharashtra.gov.in

R.N.I.No. 14140/57/Postal Registration No. MCS-072/2018-20
Posted at Mumbai Patrika Channel Sorting Office, From 12th to 17th Every Month
Date of Publication : 10th of Every Month




प्रति/TO

O.I.G.S. भारत सरकार सेवार्थ
लोकराज्य LOKRAJYA

*If undelivered, please return to:*

प्रेषक / From

मीनल जोगळेकर
वरिष्ठ सहायक संचालक, माहिती व जनसंपर्क महासंचालनालय
लोकराज्य शाखा, ठाकरसी हाऊस, २रा मजला, मुंबई पोर्ट ट्रस्ट, पोर्ट हाऊसजवळ, शुरजी वल्लभभाई मार्ग, बेलार्ड इस्टेट, मुंबई - ४०० ००१

लोकराज्य हे मासिक महाराष्ट्र शासनाच्या वतीने मुद्रक व प्रकाशक मीनल जोगळेकर, वरिष्ठ सहायक संचालक, माहिती व जनसंपर्क महासंचालनालय, मंत्रालय, मुंबई यांनी प्री मीडिया सर्व्हिसेस प्रा.लि. प्लॉट नं. ईएल /२०१, टीटीसी इंडस्ट्रियल एरिया, एमआयडीसी, महापे, नवी मुंबई - ४०० ७०४ येथे मुद्रित करून माहिती व जनसंपर्क महासंचालनालय, मंत्रालय, मुंबई - ४०० ०३२ येथे प्रसिद्ध केले.
मुख्य संपादक: ब्रिजेश सिंह